# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४६

निर्णय दिनांक ०१-०४-२००८

श्री. सागरभाई कुंडलिकराव दळवी, : अपिलार्थी
रा. समतानगर, गंगापूर तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सागरभाई कुंडलिकराव दळवी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद श्री. प्रसाद महादेव महाजन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. सोमनाथ गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑक्टोंबर २००५ ते ११-०९-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकाराखाली प्राप्त झालेल्या अर्जाच्या व अपील संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. माहितीचा अधिकाराचा कायदा आस्तित्वात आल्यापासून आपल्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखालील एकूण किती अर्ज आज तारखेपर्यत आले ? त्या सर्व अर्जाच्या सर्टिफाईड सत्यप्रती मिळणेबाबत.

अ. माहितीचा अधिकाराखाली एकूण किती अर्ज दाखल झाले ?

ब. त्यापैकी किती अर्जावर ते मुदतीत कार्यवाही करुन संबंधितांना माहितीच्या कालावधीत पूर्ण माहिती दिली त्यांची नांवे पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

क. तसेच एकूण अर्जापैकी किती अर्ज पेंडींग आहेत ? त्यांची नांव, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.

ड. सदरील अर्जापैकी किती जणांना अपूर्ण माहिती दिली व किती जणांना अजून माहितीची दिली नाही त्यांची नाव, पत्त्यानिशी यादी मिळणे बाबत.

फ. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील प्रकरणाबाबतची खालील प्रमाणे माहिती मिळणेबाबत.

अ. किती अर्जदारांनी माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहिती न मिळाल्याबाबत अपिलीय अधिकारी यांच्याकडे किती प्रकरणात अपील दाखल

झाले ? त्यांची संख्या व त्या अपिलार्थीच्या अपिलीय प्रतीची सत्यप्रती मिळणेबाबत.

ब) सदरील अपिलापैकी किती प्रकरणात अपिलीय प्राधिकारी यांनी निर्णय दिलेला त्या निर्णयाच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

क) तसेच अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अजून किती प्रकारचे प्रकरणे प्रलंबीत आहेत त्यांची नांवे, पत्त्यानिशी यादी मिळणेबाबत.''

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये ८० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे शुल्क न भरता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १९-०१-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. तदनंतर दिनांक ०५-०२-२००७ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ८० रुपये इतके शुल्क नगरपरिषदेच्या पावती क्रमांक ००११३० दिनांक ०५-०२-२००७ व्दारे भरुन त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. सदर

माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिका-यास त्यांच्याकडे पोच सही दिली आहे. त्यामध्ये त्यांनी पूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय होऊन देखील संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे सदर अपील करण्याचे कारण, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेली अपूर्ण माहिती असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांना संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे आदेशीत करावे व त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे रुपये ८० /- इतके शुल्क दिनांक ०५-०२-२००७ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस पूर्णतः माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २८-११-२००६ रोजी प्राप्त झाल्या-नंतर त्यांनी या संदर्भातील आपले आदेश दिनांक १९-०१-२००७ रोजी निर्गमीत करुन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या

प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पाठविलेल्या पत्रामध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क रुपये ८० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास सूचित केले व अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात दिनांक ०५-०२-२००७ रोजी भरल्यानंतर त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली होती. तथापि सदर माहिती अपूर्ण आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांना क्ष्यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिी दिली याची विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती त्यांच्या कडे आज रोजी उपलब्ध नसल्याचे सांगितले. वास्तविकतः आयोगाने पाठविलेल्या नोटीसमध्ये जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ती मूळ कागदपत्रे आणण्याचे सूचित करुनही ते अपिलार्थीस पुरविलेली माहिती आयोगास दाखवू शकले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच अपूर्ण माहिती दिली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. तथापि त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विधानाचे कोणताही प्रकारे खंडण करण्यास अपिलार्थी हे आयोगासमोर सुनावणीस आज उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी त्यांच्या, माहिती अपूर्ण आहे या म्हणण्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही. अपिलार्थीचे म्हणणे सिध्द करण्यासाठी त्यांनी आयोगाकडे योग्य तो पुरावा सादर न केल्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आवश्यक त्या पुराव्या-अभावी फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सागरभाई कुंडलिकराव दळवी, रा. समतानगर, गंगापूर तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८७

निर्णय दिनांक ०१-०४-२००८

१ श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे, : अपिलार्थी
घाटे निवास, नारायण कॉलनी, काकडे
प्लॉट, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता (सिव्हील),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
आनंदनगर, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता (सिव्हील),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
आनंदनगर, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, चपने बिल्डींग, आनंदनगर, उस्मानाबाद
कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, चपने बिल्डींग, आनंदनगर, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे व जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी श्री. संजय मनोहर महात्मे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-१०-२००६ पर्यतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. आपल्या कार्यालयास १ जानेवारी ०६ पासून आतापर्यंत आलेल्या शिर्षक निहाय निधीची सविस्तर यादी मिळावी.

२. आपल्या विभागातंर्गत नियमास अनुसरुन केलेल्या काम वाटपाची यादी - मजूर संख्या, बेकार अभियंता व ठेकेदार मिळावी.

३. आपल्या कार्यालयातंर्गत निविदा प्रसिध्दीस दिलेल्या प्रसिध्द झालेल्या निविदाची वृत्तपत्राची कात्रणे व बी-१ टेंडर केल्याची यादी.

४. वरील कालावधीत निविदा निहाय काम पूर्ण झालेल्या व दिलेल्या धनादेशांची यादी.

५. वरील कालावधीत झालेल्या कार्यरंभ आदेशाच्या प्रती. वरील सर्व माहिती मिळावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २०० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०१-१२-२००६ रोजी पावती क्रमांक २३८७ व्दारे भरले. आवश्यक ते शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीबरोबर याविषयासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुनही व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात यासंदर्भात अपील करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचे कारण -- अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जासंदर्भात कोणतेही आदेश दिले नाही -- असे दर्शविले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात फेब्रुवारी २००७ मध्ये आले असता त्यांना त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती गोषावारा स्वरुपात देऊ केली होती. तथापि अपिलार्थीने सदर माहिती स्विकारण्यास नकार दिला व ते रागारागाने त्यांच्या कार्यालयातून निघून गेले. तदनंतर अपिलार्थीचा व त्यांचा या विषयासंदर्भात संपर्क झाला नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील अधिकारी माहितीचा अधिकार अधिनियमाचे कशा प्रकारे विडंबन करत आहेत हे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीप्रीत्यर्थ दिनांक ०१-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये २०० /- इतके आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार भरुनही अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. ही दुर्दैवाची बाब म्हटली पाहिजे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते असे दिसून येते. येथे एक बाब विशेषकरुन लक्षात घेतली पाहिजे की, जन अपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या वरील युक्तिवादाच्या पुष्ट्यर्थ ते आयोगाकडे कोणताही लेखी पुरावा सादर करु शकले नाहीत. त्यांच्या म्हणण्या-प्रमाणे अपिलार्थीस त्यांना तोंडी माहिती देऊ केली होती व अपिलार्थीने ती नाकारली. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद आवश्यक त्या पुराव्या अभावी आयोग पूर्णतः अमान्य करत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती फारशी मोठी नव्हती. ती अशी फारशी

मोठी नव्हती की जेणेकरुन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर सदर माहिती गोळा करण्यास वळवावे लागले असते. जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच केवळ अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होण्याचे कारण होऊ शकते असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मनात अपिलार्थीस माहिती देण्याची जरी इच्छा नसली तरी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ३ प्रमाणे प्रत्येक भारतीय नागरिकास त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागण्याचा हक्क आहे व सार्वजनिक प्राधिकरणाने अपिलार्थीस माहिती देणे हे या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांचे आद्य कर्तव्य आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच निर्णय न देऊन माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई सिध्द केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय -- या प्रकरणी कोणतेही कारण मुळात समर्थनीय असू शकत नाही -- वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आपल्या या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ मर्यादीत, मुंबई यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच त्यांनी अपिलार्थी यांच्याकडून घेतलेले शुल्क रुपये २०० हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीने सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क रुपये २०० हे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावेत.

४. व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन यासंदर्भातील आपला अहवाल तदनंतर आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

५. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या कडून शुल्क भरुन घेतल्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीत पेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्या वर विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास सरळ एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे, घाटे निवास, नारायण कॉलनी, काकडे प्लॉट, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अपने बिल्डींग, आनंदनगर, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अपने बिल्डींग, आनंदनगर, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३६

निर्णय दिनांक ०१-०४-२००८

१ श्री. तोताराम टिला बागूल, : अपिलार्थी
मु. डोमकानी पैकी तलावपाडा,
तालुका साक्री जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास),
पश्चिम धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक,
धुळे वनविभाग धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. तोताराम टिला बागूल व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे श्री. विलास गंगाधर कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या हजेरीपत्रका-संदर्भात ०१-०६-१९८९ ते १०-०४-२००६ पर्यतची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" मी दि. ०१-०६-१९८९ पासून पश्चिम धुळे वनविभागातील साक्री प्रादेशिक वनक्षेत्रात विविध ठिकाणी संरक्षण मजूर म्हणून कामे केलेले आहेत. तरी मला खालील प्रपत्रात माझ्या मजुरीची माहिती पुरविण्याची विनंती आहे. कृपया वर्षवार प्रत्येक महिन्याची माहिती द्यावी. "

महिना व वर्षे   हजर दिवस   रोजंदारी दर  अदा केलेली रक्कम    प्रमाणक क्र. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये अन्वये मागितली गेलेली माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००६ रोजी पुरविली. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती पोटीच्या आवश्यक त्या शुल्काच्या रुपये ३६ इतक्या चलनाच्या प्रती पाठविल्या. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थीने दिनांक २३-०५-२००६ रोजी सदर रक्कमेचा चलनाव्दारे शासकीय कोषागारात भरणा करुन नंतर सदर प्रमाणित चलन जन माहिती अधिकारी यांना दिनांक २३-०५-२००६ ला दिले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाठविली आहे.

सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. या अपील अर्जावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना विसंगत वाटल्याने त्यांनी हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले होते व त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील या विषयासंबंधीच्या कागदापत्राच्या तपासणीची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात खुलासा करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते व त्याचबरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये ते ज्या कालावधीमध्ये गैरहजर असल्याचे दर्शविले आहे त्या कालावधीमध्ये ते कामावर हजर असल्याबाबतचा पुरावा सादर करण्याचे त्यांना सूचित केले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध कागदपत्रावरुन माहिती दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील रेकॉर्डवरुन आवश्यक ती माहिती काढली नाही तसेच त्यांनी

कागदपत्राच्या पाहणीची मागणी केली होती. तथापि त्यावर त्यांच्या पत्रावर काहीही भाष्य केले नसल्याचे म्हटले आहे. ज्याअर्थी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलातील काही मुद्दयावर भाष्य केले नाही त्याअर्थी त्यांना जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालावयाचे होते. त्यामुळे त्यांचे अपील फेटाळण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती अन्यायकारक आहे. सबब त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी तसेच या प्रकरणी त्यांना नाहक खर्च करण्यास भाग पाडल्याबद्दल संबंधितांनी त्यांना ५०० रुपये इतकी नुकसानभरपाई अदा करावी.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे काही वर्षापुर्वी त्यांच्या विभागाकडे रोजंदारीवर मजूर म्हणून कार्यरत होते. ते ज्या कालावधीत कामावर होते त्या कालावधीचे वेतन त्यांना अदा करण्यात आले आहे. वन विभागातर्फे आवश्यक त्या अटी पूर्ण केलेल्या मजुरांना त्यांच्या सेवेमध्ये आता कायम करण्यात आले आहे. त्यामुळे व्यथित झालेल्या, ज्यांना कायम करण्यात आले नाही अशा उर्वरीत मजुरांनी अशा प्रकारचे अर्ज त्यांच्या कडे केले होते. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रावरुन माहिती दिली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही वनक्षेत्रपाल स्तरावर ठेवली जाते. वन क्षेत्रपाल यांच्या स्तरावर ठेवण्यात आलेल्या कापीबुकावरुन त्यांनी आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००६ रोजी पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती सत्य आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०२-२००६ रोजी पत्राने मागितलेली माहिती जुनी व विस्तृत होती. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचे योग्य त-हेने पालन केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे जमा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांकडील संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि सदर माहिती चुकीची आहे असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने निश्चित कोणत्या काळातील माहिती चुकीची आहे हे दर्शविण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे केलेल्या अपिलामध्ये संबंधीत कालावधी देखील दर्शविला आहे. सदर कालावधीतील मस्टरचा जन माहिती अधिकारी व वनक्षेत्रपाल यांनी पूर्ण तपशील तपासला असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांना कार्यालयीन कागदपत्राची पाहणी करण्यास परवानगी मागितली होती जेणेकरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीची शहानिशा करता येईल व त्यांचे म्हणणे – जन माहिती अधिकारी यांची माहिती चुकिची आहे -- हे खरे असल्याचे सिध्द करता येईल. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी या मुद्दयावर कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीस, त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पूर्ण संधी देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. या प्रकरणी अपिलार्थीस त्याचे म्हणणे सिध्द करण्याकरिता सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत किंबहुना अशा प्रकारच्या तपासणीची मागणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेली देखील

नव्हती. अपिलार्थीस त्यांचा प्रश्न सोडविण्याकरिता जन माहिती अधिकारी व वनक्षेत्रपाल यांच्या कार्यालयातील आवश्यक ते अभिलेखे तपासणीसाठी परवानगी देणे आयोगास या टप्प्यावर विशेषतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कारभाराच्या पारदर्शकतेसाठी, गरजेचे वाटते जेणेकरुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक वाटेल अशी माहिती, त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरिता या अभिलेख्यातून प्राप्त करुन घेता येईल व त्यांचे समाधान होऊ शकेल.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या संदर्भीय विनंतीप्रमाणे या विषयाशी संबंधीत सर्व अभिलेखे व नस्त्या त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यानी कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्याचे टाळल्याचे अथवा ती मुद्दाम दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या विषयाशी संबंधीत सर्व नस्त्या व अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. यासाठी अपिलार्थीने वेगळा अर्ज करण्याची या प्रकरणी आवश्यकता नाही.

औरंगाबाद
दिनांक ०१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तोताराम टिला बागूल, मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वनविभाग धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४५

निर्णय दिनांक ०१-०४-२००८

१ श्री. महादू दयाराम सोनवणे, : अपिलार्थी
मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका
साक्री जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास),
पश्चिम धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक,
धुळे वनविभाग धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. महादू दयाराम सोनवणे व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे श्री. विलास गंगाधर कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या हजेरीपत्रका-संदर्भात ०१-०६-१९८९ ते १४-०२-२००६ पर्यतची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" मी दि. ०१-०६-१९८९ पासून पश्चिम धुळे वनविभागातील साक्री प्रादेशिक वनक्षेत्रात विविध ठिकाणी संरक्षण मजूर म्हणून कामे केलेले आहेत. तरी मला खालील प्रपत्रात माझ्या मजुरीची माहिती पुरविण्याची विनंती आहे. कृपया वर्षवार प्रत्येक महिन्याची माहिती द्यावी. "

| महिना व वर्षे | हजर दिवस | रोजंदारी दर | अदा केलेली रक्कम | प्रमाणक क्र." |
|---|---|---|---|---|

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत वनक्षेत्रपाल यांच्याकडून दिनांक २१-०२-२००६ रोजी प्राप्त करुन घेतली व तदनंतर अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये ३१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित करुन सदर शुल्काचा भरणा दिनांक २३-०५-२००६ रोजी शासकीय कोषागारात भरल्यानंतर त्यांनी दिनांक २९-०५-२००६ रोजी माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००६ रोजी प्रथम अपील केल आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन

माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना विसंगत वाटल्याने त्यांनी हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केल्याचे म्हटले असून माहितीची अचूकता तपासण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे त्यांच्या कार्यालयातील कागदपत्रे तपासणीची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.  तथापि या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात खुलासा करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते व त्याचबरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये ते ज्या कालावधीमध्ये गैरहजर असल्याचे दर्शविले आहे त्या कालावधीमध्ये ते कामावर हजर असल्याबाबतचा पुरावा सादर करण्याचे त्यांना सूचित केले आहे.  थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध कागदपत्रावरुन माहिती दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालया तील रेकॉर्डवरुन आवश्यक ती माहिती काढली नाही तसेच त्यांनी कागदपत्राच्या पाहणीची मागणी केली होती.  तथापि त्यावर त्यांच्या पत्रावर काहीही भाष्य केले नसल्याचे म्हटले आहे.  ज्याअर्थी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलातील काही मुद्दयावर भाष्य केले नाही  त्याअर्थी त्यांना जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालावयाचे होते.  त्यामुळे त्यांचे अपील फेटाळण्याची जन

अपिलीय अधिकारी यांची कृती अन्यायकारक आहे. सबब त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी तसेच या प्रकरणी त्यांना नाहक खर्च करण्यास भाग पाडल्याबद्दल संबंधितांनी त्यांना ५०० रुपये इतकी नुकसानभरपाई अदा करावी.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे काही वर्षापूर्वी त्यांच्या विभागाकडे रोजंदारीवर मजूर म्हणून कार्यरत होते. ते ज्या कालावधीत कामावर होते त्या कालावधीचे वेतन त्यांना अदा करण्यात आले आहे. वन विभागातर्फे आवश्यक त्या अटी पूर्ण केलेल्या मजुरांना त्यांच्या सेवेमध्ये आता कायम करण्यात आले आहे. त्यामुळे व्यथित झालेल्या, ज्यांना सेवेत कायम करण्यात आले नाही अशा उर्वरीत मजुरांनी अशा प्रकारचे अर्ज त्यांच्या कडे केले होते. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रावरुन माहिती दिली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही वनक्षेत्रपाल स्तरावर ठेवली जाते. वन क्षेत्रपाल यांच्या स्तरावर ठेवण्यात आलेल्या कापीबुकावरुन त्यांनी आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००६ रोजी पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती सत्य आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०२-२००६ रोजी पत्राने मागितलेली माहिती जुनी व विस्तृत होती. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद देऊन माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचे योग्य त-हेने पालन केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे जमा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांकडील संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि सदर माहिती चुकीची आहे असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने निश्चित कोणत्या काळातील माहिती चुकीची आहे हे दर्शविण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे केलेल्या अपिलामध्ये संबंधीत कालावधी देखील दर्शविला आहे. सदर कालावधीतील मस्टरचा जन माहिती अधिकारी व वनक्षेत्रपाल यांनी पूर्ण तपशील तपासला असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांना कार्यालयीन कागदपत्राची पाहणी करण्यास परवानगी मागितली होती जेणेकरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीची शहानिशा करता येईल व त्यांचे म्हणणे – जन माहिती अधिकारी यांची माहिती चुकिची आहे -- हे खरे असल्याचे सिध्द करता येईल. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी या मुद्दयावर कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीस, त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पूर्ण संधी देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. या प्रकरणी अपिलार्थीस त्याचे म्हणणे सिध्द करण्याकरिता सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत किंबहुना अशा प्रकारच्या तपासणीची मागणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेली देखील नव्हती. अपिलार्थीस त्यांचा प्रश्न सोडविण्याकरिता जन माहिती अधिकारी व वनक्षेत्रपाल यांच्या कार्यालयातील आवश्यक ते अभिलेखे तपासणीसाठी परवानगी देणे आयोगास या टप्प्यावर विशेषतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कारभाराच्या पारदर्शकतेसाठी, गरजेचे वाटते जेणेकरुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक

वाटेल अशी माहिती, त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरिता या अभिलेख्यातून प्राप्त करुन घेता येईल व त्यांचे समाधान होऊ शकेल.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या संदर्भीय विनंतीप्रमाणे या विषयाशी संबंधीत सर्व अभिलेखे व नस्त्या त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यानी कोणत्याही असद्‌हेतूने माहिती देण्याचे टाळल्याचे अथवा ती मुद्दाम दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या विषयाशी संबंधीत सर्व नस्त्या व अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. यासाठी अपिलार्थीने वेगळा अर्ज करण्याची या प्रकरणी आवश्यकता नाही.

औरंगाबाद<br>दिनांक ०१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महादू दयाराम सोनवणे, मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वनविभाग धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६५

निर्णय दिनांक : ०१-०४-२००८

१ श्री. माणिक राघोजी पवार, : तक्रारदार

जुना लोहा,ता. लोहा, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,

लोहा, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. माणिक राघोजी पवार (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा, जि. नांदेड यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. स.गौस हैदरसाब व श्री. सेवनकर व्ही. आर. ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदाराने उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. ८.६.२००७ रोजी उत्तरवादी यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदर अर्जासंदर्भात त्यांना उत्तरवादी यांनी दि. १३.७.२००७ रोजी माहिती दिली. सदर माहिती चुकीची, दिशाभूल करणारी व अधिनियमाची पायमल्ली करणारी आहे.

तक्रारदार हे आज रोजी त्यांच्या वरील मुद्यांचे समर्थन करण्यास आयोगासमोर हजर नाहीत अथवा त्यांच्या म्हणण्यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही इतर पुरावा सादर केलेला नाही. आयोगाकडे केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी उत्तरवादी यांचेकडे माहितीसाठी केलेल्या ५ अर्जांची झेरॉक्स प्रत सादर केलेली आहे, त्यातील २ अर्ज माणिक राघोजी पवार व ३ अर्ज रत्नदीप संतराम जाधव यांनी केल्याचे दिसून येत आहे.

उत्तरवादी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी आयोगासमोर असा युक्तीवाद केला आहे की, त्यांनी तक्रारदाराच्या माहितीच्या अर्जावर दि. १२.७.२००७ रोजी माहिती दिलेली असून सदर माहिती तक्रारदार यांनी मिळाल्याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयीन पत्राच्या स्थळप्रतीवर पोचसही केलेली आहे. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत आयोगाकडे सादर केली असून त्यावर संबंधित तक्रारदाराच्या सहया असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार जन कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहिती विषयी काही आक्षेप असेल तर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करण्याची तरतुद आहे. या प्रकरणी तक्रारदार यांनी या मार्गाचा अवलंब न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांना जर उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती बनावट अथवा दिशाभूल करणारी वाटत असेल तर त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद हे आतापर्यंत काम पहात होते, तथापि यामध्ये आता बदल झाला असून, या प्रकरणी निश्चितपणे जन अपिलीय अधिकारी कोण आहेत, याची आयोगास आज रोजी माहिती नसल्याने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी तक्रारदारास संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचा पूर्ण पत्ता व ज्या प्रपत्रात अपिल सादर

करावयाचे आहे, त्या प्रपत्राची सत्यप्रत हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी, जेणेकरुन तक्रारदारास जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करणे व आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेणे सुकर होईल. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास तक्रारदार राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल करु शकतील. तक्रारदार यांनी, आता जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल केल्यास, सदर अपिल जन अपिलीय अधिकारी यांचेकडे विलंबाने प्राप्त होईल. तथापि सदर विलंब जन अपिलीय अधिकारी यांनी आता क्षमापित करुन तक्रारदार यांच्या या विषयातील तक्रारीबाबत त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यास त्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे जन अपिलीय अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) उत्तरवादी यांनी, तक्रारदारास, या प्रकरणातील निश्चित जन अपिलीय अधिकारी यांचे नाव, पत्ता व प्रथम अपिल ज्या प्रपत्रात करावयाचे आहे, त्या प्रपत्राची नमुना सत्यप्रत हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत पुरवावी. तद्नंतर तक्रारदार यांनी एक महिन्याचे आत संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करावे.

३) तक्रारदार यांचा जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल करण्यास होणारा विलंब जन अपिलीय अधिकारी यांनी क्षमापित करावा.

४) तक्रारदाराचा अपिल अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त होताच त्यांनी या अपिलावर अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माणिक राघोजी पवार,जुना लोहा,ता. लोहा, जि.नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९९

निर्णय दिनांक ०२-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेंद्र दिगंबर गजभारे,<br>घ. नं. ५-२२-४३, श्रीमान श्रीमती कापड<br>दुकानाच्या बाजुला, पैठणगेट, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपप्रबंधक (अस्थापना),<br>उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ,<br>औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा महाप्रबंधक, उच्च न्यायालय,<br>मुंबई | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेंद्र दिगंबर गजभारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक

(अस्थापना), उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद श्री. राजेंद्र राधाकिशन काकाणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. दाभोळकर एन. व्ही. मुख्य न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. मा. श्री. पळशीकरसाहेब यांनी ०१-१२-०४ ला माझ्यासमोर त्यांच्या सहिनिशी मा. श्री. राऊत स. क. मुख्य न्यायाधिश जिल्हा न्यायालय यांना दिलेल्या आदेशाची सत्यप्रत प्राप्त होणेबाबत (संदर्भ आर पी ए डी क्र. २४५० ने दि. २०-०१-०५ ला पाठवलेले पत्र).

२. श्री. वैद्य एम. टीं. यांनी मला सदरील आदेश माहिती अधिकाराने पाहण्याची परवानगी तात्काळ द्यावी. सदरील आदेशावर कोणता क्रमांक टाकलेला आहे ते दाखवणे व मला फाईल पाहून देणे.

३. दि. ०९-१२-०४ मा. पळशीकरसाहेबांनी माझी विनंती (मागणी) मान्य करुन जी की, “वरील सर्व बाबींचा विचार करुन (माझ्यावर दबाव टाकल्यामुळे) दावा क्र. १३२७/९९ व दावा क्र. १३४६/९९ चा मा. श्री. राजे डी. जे. यांचा ७-१२-०४ चा निर्णय रद्द करुन पून्हा चांगल्या न्यायाधिशामार्फत उलटतपासणीपासून केस चालवण्याची संधी द्यावी व मा. श्री. राजे डी. जे. यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी ” मान्य करुन मा. मुख्य न्यायाधिश, जिल्हा न्यायालय

औरंगाबाद यांना मा. श्री. राजे डी. जे. यांचा ७-१२-०४ चे निर्णय ०९-१२-०४ च्या आदेशाने थांबवयाचे आदेश देवून चौकशीसाठी प्रकरण पाठवलेले होते. मा. श्री. राजे यांचे ०७-१२-०४ चे निर्णय हायकोर्टाने ०९-१२-०४ ला थांबवण्याचे (Step) आदेश दिलेले असतांना, मला पुन्हा You make take apporiate steps or file appeal if you are dgrived by the Judgement and decree passed in the suit असे सांगू शकतात का ?

४. सदरील आदेशाची मला आवश्यकता असतांना व ती प्रत मी पैसे देवून घेत असतांना प्रबंधक यांना Not Necessary असे हुकूमशाहीने लिहता येते का ? आदेशाची प्रत कायद्यो कोणाला रोखण्याचा अधिकार नसतांना कसे नाकारता येईल ?

५. माझा ०५-०१-०५ चा अर्ज सत्यप्रतिसाठी असतांना सत्यप्रतीचा विभाग मा. श्री. धोंगडे (उप प्रबंधक न्यायिक) मा. श्री. वालचाळे (प्रबधक न्यायिक) मा. श्री. महमंद मग्गुत (सहाय्यक प्रबंधक) यांना अधिकार असतांना मा. श्री. पाटील (प्रशासन) मला उत्तर कसे देवू शकतात ?

६. मा. मुख्य न्यायाधिश साहेबांना नागरिकांना दुपारी ४-३० वाजेनंतर गेटवर पोलिसाजवळ रजिस्टरवर नाव लिहून भेटण्याचा अधिकार आहे किंवा नाही ?

७. मा. श्री. राऊत स. क. यांनी दोन वेळेस एकतर्फी चौकशी करुन खोटा अहवाल का दिला ? चौकशीत मला का बोलवले नाही ? दावा क्र. १३४६ व दावा क्र. १३२७ मध्ये न. भू. क्र. ५०९० अविभक्त मालमत्ता असल्याबाब निशानी क्रमांक दिलेचे पुरावे यांना काही महत्व नाही का

? न. भू. क्र. ५०९० चे रजिस्टर्ड वाटणी पत्रक उपलब्ध पुरावा नसतांना त्याची वाटणी कशाच्या आधारे खोटी दाखवली जात आहे ?

८. दावा क्रमांक १३४६ मधून फाईल मधून A.I.R. 1990 Suprem Court 867 Dorab cawaji warden V cocomi sorab warden S.C. 867 चा निर्णय का काढून फेकला ? मा. न्र्यायालयात निवडणूक यादी पूरावा ग्राह्य धरला जावू शकतो का ?

९. मा. न्यायाधीश पूरावेकडे दुर्लक्ष करुन पूरावे नसतांना खोटे निर्णय देत असतील व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नसतील तर त्यांची तक्रार कोणाकडे करावी ? व त्यांच्यावर काही कार्यवाही होती का ? ”

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार पुनश्चः मुख्य न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडे दिनांक ०८-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक ०५-०१-२००६ रोजी दिलेल्या माहितीचा अधिकार अधिनियमानुसार दिलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ९ ची माहिती त्यांना देण्यास

उच्च न्यायालयाला आदेश पारीत करावे. तसेच महाप्रबंधक मा. न्यायमुर्ती त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी जेणेकरुन गरीब लोकांना न्याय मिळेल व मा. न्यायाधिशांची मनमानी बंद होईल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील चालविण्यायोग्य नाही कारण अपिलार्थीने दिलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात केलेल्या अपिलावर कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही. याचे कारण विचारले असता त्यांनी आयोगास असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०९-१२-२००६ रोजी अधिसुचनेव्दारे त्याची पध्दत निश्चित केली आहे. हा कायदा त्यांना दिनांक ०९-१२-२००६ पासून लागू झाला. अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जाव्दारे अपील अर्ज, सदर कायदा त्यांना लागू होण्यापुर्वी केला असल्यामुळे अपिलार्थीचे अपील चालविण्यायोग्य नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मा. न्यायाधीश श्री. पळशीकर यांनी दिनांक ०९-१२-२००४ रोजी दिलेल्या आदेशाच्या प्रतीची मागणी त्यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००५, ०५-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये केली होती. अपिलार्थीचा दिनांक ०५-०१-२००५ रोजीचा अर्ज त्यांनी प्रशासकीय कारणास्तव नस्तीबंद केला. अपिलार्थीने केलेला दिनांक ०५-०१-२००६ रोजीचे अर्ज देखील मा. उच्च न्यायालयाने प्रशासकीय कारणास्तव परत नस्तीबंद केलेला आहे. अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी मा. न्यायमुर्ती श्री. पळशीकर यांनी अपिलीय अधिकारी असे समजून प्रथम अपील केले. तथापि अपिलीय अधिका-याच्या नेमणूका सदर कायद्यासंदर्भात उच्च न्यायालयाची अधिसूचना त्यावेळी जारी झाली नव्हती. अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी त्यावेळी थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्यासंदर्भात आपली कार्यपध्दती शासनाच्या दिनांक ०९-१२-२००६ रोजीच्या अधिसुचनेव्दारे निश्चित केली आहे अशा अर्थाचे लेखी विधानही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या म्हणण्यामध्ये केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २८ नुसार सक्षम प्राधिकरणाला माहितीचा अधिकार अधिनियमातील कार्यपध्दती ठरविण्याबाबत स्वायत्तता दिली आहे. या तत्वानुसार यांनी आपली कार्यपध्दती दिनांक ०९-१२-२००६ रोजीच्या अधिसुचनेव्दारे निश्चित केली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६-१२-२००६ रोजी केलेल्या आहेत. प्रश्नाधीन अपिलामध्ये अपिलार्थीने मूळ अर्ज दिनांक ०५-०१-२००६ रोजी केला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका झाल्या नव्हत्या. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात जर आता नव्याने अर्ज दिला तर ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासंदर्भात कारवाई करण्यास तयार आहेत. (उच्च न्यायालयाने ठरविलेल्या नमुन्यामध्ये) हे पाहता अपिलार्थी यांनी उच्च न्यायालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना सुचविलेल्याप्रमाणे उच्च न्यायालयाने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये अर्ज करावा असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

प्रसंगवशात असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात केलेले नियम इंग्रजीमध्ये आहेत. कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने त्यांनी सदर अधिसुचनेचे पूर्णतः मराठी भाषांतर करुन ते प्रसिध्द केल्यास ते जनतेच्या अधिक उपयोगाचे ठरेल असे वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेंद्र दिगंबर गजभारे, घ. नं. ५-२२-४३, श्रीमान श्रीमती कापड दुकानाच्या बाजुला, पैठणगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक (अस्थापना), उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१२

निर्णय दिनांक ०२-०४-२००८

श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, : अपिलार्थी
मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो.
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी
विद्यालय, कडा, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव अमोलक जैन विद्या प्रसारक
मंडळ कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोल्हार अशोक सयाजीराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा श्री. बडे नानाभाऊ बाबुराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव

अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा श्री. उत्तमचंद जुगराज श्रीश्रीमाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत काही कागदपत्रांची खालील प्रमाणे मागणी केली होती.

"१. आपण Book Post ने पाठविलेली जावक नं. ७५८ ही नोटीस दि. २९-१२-०६ रोजी मिळाली. या नोटीसवर दिनांक व साल नाही तेव्हा सदर नोटीस कोणत्या दिनांकास काढलेली आहे त्याची माहिती द्यावी.

२. जावक क्र. ७५८ ही नोटीस आपण आपले पत्र क्र. १८७/०६-०७ दि. १९-०८-२००६ च्या संदर्भावरुन दिलेली आहे. तरी या पत्राची मला आजपर्यत कोणतीही कल्पना नाही तेव्हा पत्र क्र. १८७/०६-०७ दि. १९-०८-२००६ या पत्राची मला सत्यप्रत देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याबाबत मुख्याध्यापक मोतीलाल कोठारी विद्यालय यांना आदेश दिले असल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००७ रोजी संपूर्ण माहिती योग्य त्या खुलाशासह दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागितलेल्या पत्र क्रमांक १८७/०६ दिनांक १९-०८-२००६ या पत्राच्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना दिनांक २९-१२-२००६ रोजी प्राप्त झालेल्या नोटीशीवर जावक क्रमांक ७५८ असा लिहिला होता परंतु कोणताही दिनांक लिहिलेला नव्हता व नक्की दिनांक कोणता याची त्यांना माहिती हवी होती व त्याचबरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील पत्र क्रमांक १८७/०६ दिनांक १९-०८-२००६ ची सत्यप्रत हवी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सदर माहिती दिनांक १३-०२-२००७ पर्यत देखील प्राप्त झाली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील पत्र क्रमांक १८७ दिनांक १९-०८-२००६ ची प्रत आजही हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल व

त्यांच्यापासून माहिती दडविल्याबद्दल त्यांच्यावर नियमाप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १७-१२-२००६ रोजीच्या नोटीस वरील संदर्भ क्रमांक १८७ हा चुकीने लिहिला असून प्रत्यक्षात तो संदर्भ १८८/०६ या क्रमांकाचा आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील दोन्ही माहितीसंदर्भात योग्य तो खुलासा दिलेला आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या ७५८ क्रमांकाच्या नोटीशीवर दिनांक २७-१२-२००६ ही तारीख टाकण्याचे नजरचुकीने राहून गेले होते. त्यांनी अपिलार्थीस या नोटीसमध्ये कळविलेला संदर्भ क्रमांक १८७ हा नजरचुकीने कळविल्याचा खुलासा त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या पत्रामध्ये केलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेला अपील अर्ज हा त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल झालेले पहिलेच प्रकरण होते त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली नाही व सरळ जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील

दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली २ मुद्दयावरील माहितीपैकी फक्त मुद्दा क्रमांक १ ची माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमधील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्याबाबत कोणतेही अभिप्राय जन माहिती अधिकारी यांनी दिलेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तदनंतर दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भाप्रमाणे माहिती पुरविल्याचे दिसून येते. यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ चा सविस्तर खुलासा केला असून त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात असा खुलासा केला की त्यांना पाठविण्यात आलेल्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिलेला संदर्भ नजरचुकीने दिला असून तो प्रत्यक्ष १८८/०६/०७ असा होता. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे क्रमांक १८७ च्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती ती न देता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र क्रमांक १८८ ची प्रत दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली. सदर प्रत प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले. अपिलार्थीने पत्र क्रमांक १८७ ची मागणी केली असून त्यांना त्या पत्राची प्रत न पुरविता अपिलार्थीस क्रमांक १८८ च्या पत्राची प्रत देणे म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिली आहे असे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे जावक क्रमांक १८७ दिनांक १९-०८-२००६ चे पत्र आज रोजी उपलब्ध आहे या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या जिवितास धोका असल्याबद्दल पोलीस आऊट पोस्ट कडा यांच्याकडे तक्रार केल्याचे दिसून येते. वास्तविकतः अपिलार्थीने १८७ क्रमांकाचे पत्र मागविल्यानंतर त्यांना त्याच्या मागणी प्रमाणे १८७ क्रमांकाचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरवावयास हवे होते. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीस सदर पत्र देण्यासाठी

व याव्दारे अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविण्यास टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी ११ दिवसाचा विलंब लावला आहे. एवढे करुनही अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी दिनांक १३-०२-२००७ रोजी पूर्णतः दिलेली नसल्याचे दिसून येते. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जावदारे मागितलेली मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या ११ दिवसाच्या विलंबामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी यांनाही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे इतर सर्व कर्मचारी या सर्वांना मिळून अपिलार्थीस कोणत्याही वैध कारणा शिवाय माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (११ दिवसाकरिता) एकूण रुपये २७५० /- (अक्षरी- रुपये दोन हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये, शासकीय कोषागारात, लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,

(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली भरावी. सदर रक्कमेची कर्मचारीनिहाय विभागणी अध्यक्ष अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी. जन माहिती अधिकारी हे सदर शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात नियमीतपणे करतील याची दक्षता अध्यक्ष अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी घ्यावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास मे २००८ पासून पुढे, दरमहा पूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरली जाईपर्यंत पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती तील मुद्दा क्रमांक २ च्या संबंधात संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संबंधात संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये २७५० /- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

४. सदर रक्कमेची कर्मचारीनिहाय विभागणी अध्यक्ष अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी.

औरंगाबाद<br>
दिनांक ०२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अध्यक्ष अमोल संस्था कडा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२०

निर्णय दिनांक ०२-०४-२००८

श्री. गायकवाड नरसिंग निवृत्तीराव, : अपिलार्थी
४/२ जिल्हा परिषद निवास, बार्शी रोड,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विकास आयुक्त (उद्योग), उद्योग
संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयासमोर, मुंबई - ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, उद्योग व उर्जा व कामगार,
मंत्रालय, मुंबई - ३२

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उद्योग उपसंचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी : उद्योग सह संचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२

<u>**निर्णय**</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गायकवाड नरसिंग निवृत्तीराव व जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सह संचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय श्री. वाल्मीक दौलत देसले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या जेष्ठता सूचीसंदर्भात दिनांक १८-०९-१९९१ ते २२-१२-१९९४ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“अ) १) आदेश क्रमांक २११/आस्था/उनि/वि.अ.(उ) /जेसु/१९९१/ई-२५०८८ दि. १८-९-१९९१ च्या आदेशातील अनुक्रमांक ६५० वर कोण आहे, त्याचा रुजू दिनांक काय.

२) अनुक्रमांक ६०५ वर कोण आहे व त्याचा रुजू दिनांक काय आहे.

ब) ३) आदेश क्रमांक २६८/आस्था-१//उनि/वि.अ.(उ) /जेसु/९४/सी-१५९६९ दि. २२-१२-१९९४ च्या आदेशातील अनुक्रमांक ६२३ वर कोण आहे, त्याचा रुजू दिनांक काय.

४) उपरोक्त आदेशात ५८२ वर कोण आहे, त्याचा रुजू दिनांक काय आहे.

५) उपरोक्त (अ) व (ब) या दोन्ही प्रसिध्द केलेल्या जेष्ठता सूचित दोन्ही आदेशातील तपासणी करुन जेष्ठतम उद्योग निरीक्षक कोण आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. ”

अपिलार्थीचे सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००५ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१२-२००५ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील त्यांनी सचिव (उद्योग व उर्जा) यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. तथापि त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या दिनांक १७-१२-२००५ च्या पत्राची प्रत पाठविली व सदर माहिती प्राप्त झाल्यानंतरही अपील चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य आहे किंवा कसे याबाबतचा माहिती त्यांना विचारली. अशा प्रकारचे पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०५-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या

या पत्रावर अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिला नाही असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १५-११-२००५ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १९-११-२००५ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या सदर अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी दिनांक ०२-०१-२००६ रोजी हीच माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतरही अपिलार्थीस अपील चालवावयाचे आहे किंवा कसे असे विचारले असता यावर अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद न देता आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस पूर्णतः संधी दिली होती. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे अपील करणे पसंत केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील दिलेला पत्त्यावर त्यांनी अपिलार्थीशी यासंदर्भातील

पत्रव्यवहार केला असून अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद दिलेला आहे. मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना त्यांच्याकडे उद्योग विभागाच्या ०९/१९९१ व १२/९४ रोजी प्रसिध्द केलेल्या सेवाजेष्ठता याद्या उपलब्ध असाव्यात असे अनुमान काढण्यात येत आहे. तथापि असे असूनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७-१२-२००५ रोजी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत परविली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन समर्पक माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या माहितीतील निश्चित कोणती माहिती त्यांना आक्षेपार्ह वाटते याचा ऊहापोह जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलात केला नाही तसेच अशा प्रकारचे कोणतेही अभिप्राय त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये देखिल दिलेले नाहीत. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही माहिती दिलेली नाही एवढेच म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या जावक नोंदवहीच्या रजिस्टरची झेराक्स प्रत पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १७-१२-२००५ रोजीच्या क्रमांक

३३०६२ ने जन माहिती अधिकारी यांनी साध्या पोस्टाने, त्यांनी प्रथम अर्जावर दिलेल्या पत्त्यावर, ही माहिती पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याबद्दल त्यांचे म्हणणे योग्य त्या पुराव्यासह सिध्द केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती पुरविल्याच्या विधानाचे खंडण करण्या-करिता अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्या बाबत त्यांनी या प्रकरणाशी सलग्न कोणताही लेखी पुरावा आयोगाकडे सादर केला नाही.

सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात योग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेतांना योग्य त्या पध्दतीचे पालन केलेले नाही. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपला आदेश जारी करणे हे “अपील ठरविणे” या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता ते अपिलार्थीशी पत्रव्यवहार करत राहिले. इतःपर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपिलावर या सुचनेप्रमाणे कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड नरसिंग निवृत्तीराव, ४/२ जिल्हा परिषद निवास, बार्शी रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सह संचालक (आस्थापना), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३८

निर्णय दिनांक ०२-०४-२००८

श्री. बाबुराव रामभाऊ ताजनपूरे, : अपिलार्थी
"वरुण" अपार्टमेंट, शान्तीपार्क,
उपनगर, नाशिक रोड - ४२२ १०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक वन संरक्षक (प्रादेशिक),
पश्चिम भाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, पश्चिम भाग,
नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), पश्चिम भाग, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बाबुराव रामभाऊ ताजनपूरे व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक हे गैरहजर आहेत

तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), पश्चिम भाग, नाशिक यांचे प्रतिनिधी कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक श्री. लक्ष्मण दामू जगताप (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ मौजे पाथर्डी ता. नाशिक राखीव वन कंपार्टमेंट क्र. २२५ या क्षेत्रावर सन १९७० पासून केलेल्या वृक्ष लागवडीच्या रोपवन नोंदवह्याची प्रत व कंपा. ने २२५ ची कंपा. हिस्ट्रीशीट.”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक १०-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २८ मे २००६ च्या पत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रुपये २४ अधिक टपाल खर्च असे रुपये ७५ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. तसेच सदर शुल्क भरल्याशिवाय त्यांना माहिती टपालाने पाठविता येणार नसल्याचीही कल्पना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १३-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ११-०९-२००६ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रपये ९९ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेश पारीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०१-०५-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक १०-०५-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर व अपिलार्थीने मागितलेली माहिती वन क्षेत्रपाल स्तरावरील असल्यामुळे त्यांनी दिनांक १२ मे २००६ रोजी संबंधीत वनक्षेत्रपाल यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठवून त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २०-०५-२००६ च्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना केल्या. तथापि अपिलार्थीस दिनांक ३१ मे २००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ते शुल्क भरणा करण्याचे सूचित

करुनही सदर शुल्क न भरल्यामुळे त्यांना सदर माहिती देता आली नाही. सदर माहिती आज त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये, जे पत्र त्यांनी प्रत्यक्षात अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००६ रोजी पाठविले, आवश्यक तो प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३१-०५-२००६ चे पत्र अपिलार्थीस दिनांक २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या निर्णयावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच दिनांक ३१-०५-२००६ रोजी पत्र लिहिले किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राअभावी कळण्यास मार्ग नाही. तथापि जन माहिती अधिका-याचे पत्र अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ३१-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयातील जावक लिपिकाच्या सहीवरुन दिसून येते. सदर पत्राची नोंद अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात ०६ जून २००६ रोजी झाल्याचे दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचे अनुमान आयोग काढत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगाकडे पुरावा सादर केला आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थी यांनी आयोगाकडे कोणताही लेखी पुरावा सादर केला नाही व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेचे खंडण करण्यासाठी आज

सुनावणीस अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर आहेत हे पाहता पुराव्याअभावी अपिलार्थीचे म्हणणे अग्राह्य धरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये प्रतिसाद दिला हे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याने व अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क न भरल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगवशात असे दिसून येते की, वन विभागाच्या अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक दर्जाच्या कर्मचा-याला आज आयोगासमोर सुनावणीस पाठविण्याच्या या कृतीवर आयोग तीव्र नाराजी व्यक्त करत असून येथून पुढे ज्या अधिका-यांना आयोगाने नोटीस काढली असेल त्या अधिका-याने आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय सुनावणीस गैरहजर राहू नये अशी त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुराव रामभाऊ ताजनपूरे, “वरुण” अपार्टमेंट, शान्तीपार्क, उपनगर, नाशिक रोड - ४२२ १०१.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), पश्चिम भाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक, पश्चिम भाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३९

निर्णय दिनांक ०२-०४-२००८

१ श्री. उत्तम शिवाजीराव कदम, : अपिलार्थी
लासलगाव ता. निफाड जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण विभाग)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित,
चांदवड जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित,
सं. व सु.मंडळ (ग्रामीण) नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. उत्तम शिवाजीराव कदम, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण विभाग) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित सं. व सु. मंडळ (ग्रामीण) नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ईलेक्ट्रीसिटी ॲक्ट, २००३ संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " Electricity Act २००३ चे कलम १२७ प्रमाणे अपिल अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अपिल दाखल करण्याचा संदर्भ, अपिल दाखल करणेसाठी लागणारी फि.
>
> २) APPEAL TO THE APPELLATE AUTHORITY RULES,२००४ RULE-३ प्रमाणे notification published by the state Government in his official Gazette."

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.६.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ची अंशतः व मुद्दा क्र.२ ची माहिती दिल्याचे दिसून येत आहे.जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दिनांक १७.६.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून सहायक जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना कोणत्याही कारणाशिवाय माहिती देण्याचे हेतूतः नाकारले असून, सदर माहिती नाकारण्याचे कारण त्यांनी त्यांचे पत्रात नमुद केले नाही. सहायक जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचा भंग केला असल्याचे याच अर्जामध्ये त्यांनी पुढे म्हटले आहे.सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी

घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस या अपिल अर्जासंदर्भात पाठविलेल्या दि. ११.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून, राहून गेलेली माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २.९.२००६ रोजी द्वितीय अपिल सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व बेकायदेशीर असून त्यांनी दिलेली माहिती खोटी असल्याचे तसेच त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यास शास्ती न लावल्याने व अपिलार्थीस नुकसान भरपाई देण्याचे आदेश न दिल्याने त्यांचा आदेश चुकीचा व बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचेही त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत, त्यामुळे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या सुनावणीसंदर्भात निर्णय घेण्यात येत आहे. या प्रकरणात असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहितीअधिकारी यांचेकडे दि.१७.४.२००६ रोजी माहितीसाठी प्रथम मूळ अर्ज दाखल केला होता.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.५.२००७ रोजी किंवा तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे कार्यवाही करुन माहिती देणे भाग होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस देणे अत्यंत सोपी व सरळ होती, असे आयोगाचे मत आहे, तथापि एवढी साधी माहिती देखिल अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ४३ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येत आहे. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस विलंबाने देखिल जो प्रतिसाद दिला आहे, त्यामध्ये मुद्दा क्र.

२ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस आवश्यक माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मध्ये, अपिल दाखल करण्याचा फॉर्म व अपिल दाखल करण्यासाठी लागणारी फी या संदर्भात माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यांवर अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत नाही. तदवितच जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस दि. ११.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेली अपिल फॉर्म विषयी कोणताही उल्लेख नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपूरी असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना, शास्ती लावली नाही, त्यांचे नुकसान भरपाईचे आदेश दिले नाहीत म्हणून जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश चुकीचे व बेकायदेशीर आहेत, असे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये म्हटले आहे. तथापि अपिलार्थी यांचा हा दावा आयोग फेटाळून लावत आहे, कारण मूळात जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे अधिकार जन अपिलीय अधिकारी यांना नाहीत. तसेच त्यांचेकडे केलेले दि. १७.६.२००६ रोजीच्या अपिल अर्जाची पहाणी करता, त्यामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे नुकसान भरपाईची मूळात मागणीच केली नव्हती, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यांवर कोणतेही भाष्य करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४३ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाने तसेच अर्धवट माहिती दिल्याचे येथे निसंशयपणे सिध्द होत असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. आज सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातर्फे लेखी नोटीस पाठविल्यानंतर पुन्हा दि. २६.३.२००८ रोजी दुपारी २.३० वा.दूरध्वनीवरुन त्यांचे कार्यालयातील कनिष्ट अभियंता, श्रीमती सविता कुटे यांचे मार्फत निरोप देऊनही ते आज सुनावणीस हजर झाले नाहीत. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी देऊनही ते आयोगासमोर प्रत्यक्षतः स्वतः देऊन अथवा

त्यांचे प्रतिनिधीमार्फत उपस्थित झाले नाहीत, यावरुन त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याचे दिसून येत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी ४३ दिवस इतका असमर्थनीय विलंब लावल्याबाबत त्यांचेवर विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण रु. १०७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात जास्तीत जास्त ५ हप्त्यात, खालील लेखाशीर्षाखाली भरावी

लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी,

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमधील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ४३ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना विलंबाचे प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १०७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

४. वरील आदेश क्र.३ च्या अनुपालनासंदर्भात अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, चांदवड जि. नाशिक यांनी मे,२००८ पासून पुढे सदर शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत दरमहा अनुपालन अहवाल  नियमितपणे पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उत्तम शिवाजीराव कदम, लासलगाव ता.निफाड जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण विभाग) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित चांदवड ता.चांदवड जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित चांदवड जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कोषागार अधिकारी, चांदवड जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९९

निर्णय दिनांक : ०२-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बी. डी. मिरचंदानी,<br>प्रशांती, टागोरनगर,<br>नाशिक-४२२ ००६ | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा तहसीलदार, शहापूर<br>जि.ठाणे. | : | उत्तरवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. बी. डी. मिरचंदानी (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, शहापूर जि.ठाणे यांचे प्रतिनिधी अव्वल कारकुन श्री. शरद भास्कर पाटील ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदारा यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे दि. २४.४.२००७ रोजीच्या तक्रारअर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांच्या मुलाने जन्म तारखेच्या संदर्भात उत्तरवादी यांचेकडे ९/११.१.२००७ रोजी अर्ज केला होता. तथापि त्या अर्जावर तक्रारीच्या दिनांकापर्यन्त कोणतीही कार्यवाही झाली नव्हती. उत्तरवादी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील

तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडे दि. २४.२.२००७ रोजी त्यांच्या मुलाने केलेल्या अर्जाच्या वस्तुस्थितीची माहिती मागितली होती. तक्रारदार यांचा सदर अर्ज उत्तरवादी यांचे कार्यालयात दि. २६.२.२००७ रोजी स्वीकृत झाला आहे. (तक्रारदार यांनी त्यांचे म्हण्यापृष्टयर्थ उत्तरवादी यांचेकडे पाठविलेल्या अर्जाच्या रजिस्टर्ड पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे) तथापि ३० दिवस ओलांडून गेल्यानंतरही उत्तरवादी यांनी त्यांना या संदर्भात कोणतीही माहिती पुरविली नाही. सदर माहितीची त्यांना त्यांच्या नातीच्या प्रवेश परीक्षेकरिता आवश्यकता होती. त्यांची या माहितीची गरज पाहता, उत्तरवादी यांनी या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करुन, आवश्यक ती माहिती पुरविण्यासाठी उत्तरवादी यांना, आदेशित करण्याची त्यांनी आयोगास अर्जामध्ये शेवटी विनंती केली आहे.

तक्रारदाराच्या तक्रारीवर उत्तरवादी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, तक्रारदार यांनी संदर्भित केलेला ९/११.१.२००७ चा अर्ज त्यांचे कार्यालयात आढळून आला नाही, तसेच तक्रारदार यांनी दि. २४.२.२००७ रोजी केलेला व दि. २६.२.२००६ रोजी पोहच असलेला अर्ज देखिल त्यांचे कार्यालयातील दप्तरात शोध घेऊनही आढळून आला नाही, तथापि राज्य माहिती आयोगाचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तक्रारदार यांचेशी समक्ष संपर्क साधून त्यांनी उत्तरवादी यांचेकडे केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत मागितली असता, तक्रारदार यांनी दोन्ही अर्जाच्या प्रती देण्यास त्यांना नकार दिला आहे. प्रत देण्यास नकार देतांना तक्रारदाराने ते ८२ वर्षांचे वयोवृध्द असल्याने व तक्रारीबाबत त्यांना आता स्वारस्य उरले नसल्याचे उत्तरवादी यांना त्यांनी सांगितले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात केलेल्या अर्जांची प्रत त्यांचे कार्यालयात प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांचेकडील रजिस्टर्ड पोस्टाची पावतीची झेराक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात अर्ज केल्याचे

सिध्द होत आहे. तथापि आता तक्रारदारास आवश्यक ती माहिती पुरविण्याचे दृष्टीने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या तक्रार अर्जासोबत असलेल्या त्यांच्या अर्जांच्या झेरॉक्स प्रती उत्तरवादी यांना देण्यात येत आहेत व उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांना त्यांच्या दि. २४.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच तक्रारदारास अपेक्षित असलेल्या जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात आवश्यक ती सकारात्मक कार्यवाही याच कालावधीमध्ये त्यांनी करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांना त्यांच्या दि. २४.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच तक्रारदारास अपेक्षित असलेल्या जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात आवश्यक ती सकारात्मक कार्यवाही याच कालावधीमध्ये त्यांनी करावी.

**( वि. बा. बोरगे )**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०४-२००८**

**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बी. डी. मिरचंदानी, प्रशांती, टागोरनगर, नाशिक-४२२ ००६

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, शहापूर जि. ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१६

निर्णय दिनांक ०३-०४-२००८

श्री. राजेंद्र बन्सीलाल पुसे, : अपिलार्थी
रा. इंदिरानगर, हनुमान मंदिराजवळ,
जुना जालना, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता,
लघुसिंचन उपविभाग, जिल्हा परिषद,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, सिंचन, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र बन्सीलाल पुसे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, जिल्हा परिषद श्री. मोहम्मद फैय्याज मोहम्मद ईब्राहीम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा

परिषद, सिंचन श्री. उदय दिनकरराव पुराणकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनातंर्गत घेतलेल्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या उपविभागा अंतर्गत S.G.R.Y. मध्ये झालेल्या जवसगाव तलावाचे मस्टर व पेड रजिस्टर झेरॉक्स प्रत मिळणेबाबत. ”

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निश्चित कालावधीचा उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीस नेमकी कोणत्या कालावधी तील माहिती हवी आहे यासंबंधी विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन

दिसून येत नाही. तथापि अपिलार्थी यांच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्या कडील दिनांक २२-०३-२००७, ०९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या कामाचे मस्टर्स का उपलब्ध करुन दिले नाही याची विचारणा केली व दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस असे सूचित केले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील निश्चित कालावधी त्वरीत कळवावा.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय कसा प्रकारे घेऊ नये याचे उत्तम उदाहरण जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी घालून दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन व ते नोंदवून नंतर प्रकरणातील आपले निर्णय पारीत करणे हे या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई जन अपिलीय अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही. इतःपर त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गत अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी याप्रमाणे कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे असलेल्या उपलब्ध मस्टरच्या प्रती दिनांक २७-०४-२००७ रोजी दाखविल्या असून अपिलार्थीने सदर माहिती त्यांना तोंडी स्वरुपात मिळाल्याचे एका पत्रामध्ये नमूद केले आहे. याच पत्रामध्ये त्यांनी सदर अर्जाबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नाही असे देखील त्यांना लिहून दिले आहे. त्यांच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी लेखी स्वरुपात सदर माहिती मिळाल्याचे व याविषयावर त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे पत्र आयोगास दाखविले. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये निश्चित कालावधी नमूद केला नव्हता. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस स्मरणपत्र देऊनही अपिलार्थीने निश्चित कालावधी नमूद न केल्याने त्यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अपील अर्ज करतवेळेस सध्याचे जन माहिती अधिकारी हेच जन अपिलीय अधिकारी अधिकारी होते. उपरोक्त प्रकरणाची त्यांना काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना निश्चित कोणत्या कालावधीतील माहिती हवी होती याचा कोणताही उल्लेख न केल्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत. तथापि त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीकडे त्यांच्या दिनांक ०५-०२-०७ रोजीच्या पत्रान्व्ये अपिलार्थीस याची कल्पना दिली होती. जन माहिती अधिकारी यांनी कल्पना देऊनही अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचा कालावधी कळविला नाही ही बाब येथे प्रामुख्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. अपिलार्थीने मागितलेल्या

माहितीची व्याप्ती पाहता ही बाब विशेष करुन जाणवते कारण संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ही ०१ एप्रिल २००४ पासून सुरु झाली. अपिलार्थीने कालावधी नमूद न केल्याने अपिलार्थीस सदर योजना सुरु झाल्याच्या दिवसापासून ते त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यापर्यतच्या संपूर्ण कालावधीची माहिती अपिलार्थीस अपेक्षित असल्याचे ग्रहीत धरले तर या माहितीची अंदाजे १० ते १२ हजार इतकी पृष्ठे होतात असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने (अरुण छगनराव पोलकर कनिष्ठ सहाय्यक या पदावर असलेल्या कर्मचा-याने) सांगितले. आता सदर मस्टरची पाहणी अपिलार्थीने केली असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाबद्दल त्यांची काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०४-२००७ रोजी लिहून दिले आहे. तथापि असे लिहून दिल्यानंतरही अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून खरोखरच काही माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे व मूळात त्यांना ही माहिती खरोखरीच हवी आहे का हे कळण्यास मार्ग नाही. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस त्यांनी माहिती दाखविली या विधानाचे खंडण करण्या-करिता अपिलार्थी आज आयोगासमोर अनुपस्थित आहेत हे पाहता अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगवशात या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी ज्या पध्दतीने हे प्रकरण हाताळले आहे ती पध्दत पाहता त्यांनी या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य दक्षतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब आयोगातर्फे जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे माहितीसाठीच्या प्राप्त होणा-या अर्जासंदर्भात

पत्रव्यवहार करतांना सतर्क राहावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र बन्सीलाल पुसे, रा. इंदिरानगर, हनुमान मंदिराजवळ, जुना जालना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४०

निर्णय दिनांक ०३-०४-२००८

श्री. रामेश्वर रोहितलाल मिश्रा, : अपिलार्थी
शाहूनगर, हनुमान मंदिराजवळ,
जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नगर रचनाकार जळगाव शहर
महानगरपालिका, जळगाव
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव
जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामेश्वर रोहितलाल मिश्रा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार जळगाव शहर महानगरपालिका श्री. देविसिंग हिलाल पाटील (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), जळगाव शहर महानगरपालिका श्री. रावसाहेब रंगनाथ काळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १ शामप्रसाद मुखर्जी उद्यान या जागेची मालकी कुणाची आहे.

२. सदर जागा ही कोणत्या कामासाठी काही विशिष्ट हेतूसाठी राखून ठेवण्यात आलेली आहे काय ?

३. सदर जागेवर काही बांधकाम झालेले आहे का ? व केव्हा ? व कोणाच्या परवानगीने ? बांधकाम केलेले संपूर्ण क्षेत्रफळ व सदर झालेले बांधकाम नियमानुसार आहे काय ? व नियमानुसार नसल्यास कोणकोणत्या अधिका-याने सदर बांधकामांना परवानग्य दिलेल्या आहेत. व कोणत्या तारखांना याबाबत संपूर्ण तपशील.

४. सदरहू जागेतील काही जागा कोणत्या संस्थेला देण्यात आलेला आहे का ? व कोणत्या संस्थेला किती क्षेत्रफळ जागा दिली व कोणत्या कारणासाठी ? विशिष्ट हेतूसाठी शिल्लक राहिलेली जागा किती ? व उद्यानासाठी आरक्षित जागा देता येते काय ? व कोणत्या नियमानुसार देण्यात आली. दिली असल्यास ठरावाच्या सर्व प्रती देण्यात याव्यात.

५. सदरहू जागेवर जळगाव म.न.पा.चे बांधकाम असलेले किती आहे ? व ते सर्व बांधकाम नियमानुसार आहे का ? व त्या बांधकामावर एकूण

खर्च किती झालेला आहे. व कोणत्या तारखेला व कोणत्या अधिका-याच्या मंजुरीने.

६. सदरहू उद्यानाचे मूळ क्षेत्रफळातून मूळ बांधकाम किती क्षेत्रफळ आहे. उद्यानासाठी शिल्लक किती क्षेत्रफळ आहे याचे संपूर्ण तपशील देण्यात यावा.

७. सदरहू उद्यानच पूर्वेला व उत्तरेला रस्ता आहे का ? असल्यास किती मिटरचा रस्ता आहे. सदर रस्ता जुना हायवे आहे का ? सदर रस्ता शहराच्या महत्वाच्या (रेल्वे स्टेशन, जिल्हा परिषद, रेल्वे क्रॉसींग या मार्गावर आहे का ?)

८. सदर जागेचे मूळ क्षेत्रफळ किती ?

९. सदर जागेवर झालेले बांधकाम हे नियमानुसार आहे काय ? नसल्यास कोणत्या कोणत्या अधिका-याच्या मंजुरीने झालेले आहे व त्यांचे संपूर्ण नांव व पत्त्यांसह माहिती द्यावी. ”

अपिलार्थीचे सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०९-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५, ६, ९ बाबत अपेक्षित असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात नसल्याने देता येत नाही असे कळविले. याच अर्जामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात अपिलार्थीस खुलासा केला आहे व अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ४ व ८ बाबत त्यांना दिनांक ०२-०९-२००५ रोजी कळविल्याचे स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २१-०७-२००६ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५, ६ व ९ बाबत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसात माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती देऊन व तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावून माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. त्यांनी या प्रकरणी केलेली कृती जाणूनबुजून त्रास देणारी असल्याने माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे दंडात्मक कारवाईस पात्र आहेत. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या सुनावणीच्या दिनांक २९-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अपील क्रमांक ११७ असा उल्लेख केला आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार हा कालबाह्य झालेला मनपाच्या अधिका-यांना अजूनही वाटत नाही.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांना अपूर्ण माहिती दिली व अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ३ व ९ च्या संदर्भात बांधकाम परवानगीची प्रत त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नसल्याने सदर माहिती अपिलार्थीस त्यांना देता येणार नाही. मुद्दा क्रमांक ५ व ६ च्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही. तथापि सदर माहिती महानगरपालिके-च्या इतर विभागाकडे उपलब्ध असल्यास ती अपिलार्थीस देता येईल. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस का कळविले नाही असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १६-०६-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०७-२००६ रोजी पारीत केले. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या मुद्दयासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीच्या सुनावणीस हजर राहण्यासाठीच्या पत्रात महाराष्ट्र माहितीचा अधिकार असा उल्लेख केला नसल्याने त्यांनी आयोगास सांगितले. यापुष्ट्यर्थ त्यांनी दिनांक २९-०६-२००६

रोजीचे पत्र आयोगास दाखविले. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे कोठेही महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लेख केलेला नाही असे आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने विचारलेली बहुतांशी माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, जळगाव महानगरपालिका २००३ सालापासून आस्तित्वात आली. अपिलार्थीने संदर्भिय केलेले बांधकाम २० ते २५ सालापूर्वीचे असून याबाबतचे कोणतेही अभिलेख आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३, ५, ६ व ९ मधील माहिती २० ते २५ वर्षाची जुनी असल्याने व यासंदर्भात नगर रचना, बांधकाम विभाग महानगरपालिका जळगाव यांनी कसोशीने शोध घेऊनही सदर प्रकरण संबंधीत अभिलेखे त्यांना आढळत नसल्याचे शपथपत्र त्यांनी आयोगासमोर सादर केले. यावरुन सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येते हे पाहता अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकणार नाही हे उघड आहे. तथापि अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी जितकी वस्तुस्थितीवर आधारीत माहिती तयार करुन देणे जन माहिती अधिकारी यांना आता शक्य असेल तितकी जास्तीत जास्त माहिती, जन माहिती अधिकारी यांनी सध्या आस्तित्वात असलेल्या बांधकामावरुन अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात काहीही न कळवून या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब आयुक्त महानगरपालिका जळगाव यांना असे

आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती नव्याने तयार करुन ती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर आयुक्त महानगरपालिका जळगाव यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामेश्वर रोहितलाल मिश्रा, शाहूनगर, हनुमान मंदिराजवळ, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार जळगाव शहर महानगर पालिका, जळगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त महानगरपालिका जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४१

निर्णय दिनांक ०३-०४-२००८

श्री. सुकेशीराज सदाशिवराव कु-हाडकर, : अपिलार्थी
श्री. क्लिनिक, गणपती चौक, बोलठाण,
तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
पंचायत समिती कार्यालय, नांदगाव,
तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव जिल्हा नाशिक

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुकेशीराज सदाशिवराव कु-हाडकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य

अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव श्री. तानाजी जगराम चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. के. पी. कलाणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कासारीघाट नांदगाव दुर्घटनेच्या वेळी बोलठाण येथील वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२००५ ची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " सदर वैद्यकीय अधिकारी यांचेवर म. गट विकास अधिकारी / तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली. सदर वैद्यकीय अधिकारी यांना काढलेल्या प्रतिनियुक्तीचा आदेश, त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी. "

अपिलार्थीचे सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज दिनांक २९-१२-२००५ रोजी जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यांच्या कडील दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०१-२००६ रोजी रजिस्टर पोस्टाच्या पावती क्रमांक ०८०६ ने पाठविल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०२-२००६ रोजी

प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती व प्रत्यक्षात त्यांना माहीत असलेली वस्तुस्थिती यामधील विसंगती जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०५-२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि या सुनावणीचे जन अपिलीय अधिकारी यांनी काही आदेश दिले आहेत किंवा कसे हे आयोगास कळण्यास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे मार्ग नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात प्रस्तावित सुनावणीपूर्वी दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या अपिलावरील निर्णय कळविल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावासोबत जोडल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न दिला नाही, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी एकतर्फी व दिशाभूल करणारी असल्याने त्यांना रुपये २५० प्रमाणे प्रतिदिनी शास्ती लावण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातम्यांची कोणतीही शहानिशा न करता आपला निर्णय दिला व सत्य शोधण्यासाठी हेतूपुरःस्सर टाळले. डॉक्टर शेलार यांच्या दिनांक ०९-०५-०५ रोजीच्या रजेची छायांकीत प्रतीवर गट विकास अधिकारी यांच्या मंजुरीच्या

सह्या नाहीत म्हणजे छायांकीत प्रत देतांना जन माहिती अधिका-याने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, उपरोक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सदोष व एकतर्फी चौकशी केली असल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कारवाई व्हावी व त्यांना विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिली असल्याबाबत तक्रार केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २७-१२-२००५ चा अर्ज त्यांना २९-१२-२००५ रोजी प्राप्त झाला. त्यावर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-१-२००६ रोजीच्या पत्रान्वये संपूर्ण माहिती दिली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००६ रोजी देण्यात आली. अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेली माहिती सत्य आहे. अपिलार्थी हे प्राथमिक आरोग्य केंद्र बोलठाण येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर पूर्वी कार्यरत होते. तथापि प्रशासकीय कारणास्तव त्यांची बदली करण्यात आल्यावर त्यांनी या पदाचा राजीनामा दिला असून तदनंतर ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे अशा प्रकारच्या वेगवेगळे विषयवर माहिती मागवीत असतात. यामागे अपिलार्थीचा त्यांना त्रास देण्याचा उद्देश आहे. डॉक्टर शेलार यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००५ रोजीच्या पत्रान्वये त्यांना दिनांक १०-०५-२००५, ११-०५-२००५ या कालावधीतील रजेचा अर्ज गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर केला होता. अपघात दिनांक १०-०५-२००५ रोजी रात्री झाला त्यावेळी डॉक्टर परशूरामी हे सदर रुग्णावर उपचार करण्याकरिता नांदगाव येथे हजर होते. डॉक्टर परशूरामी हे त्या

घटनास्थळी व दवाखान्यात हजर असल्याने त्यांच्यावर कोणतीही प्रशासकीय कारवाई करण्यात आली नाही व त्याचप्रमाणे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. डॉक्टर परशूरामी यांना डॉक्टर शेलार यांच्या गैरहजेरीत काम पाहण्याचे आदेश तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००५ रोजी दिले व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. याप्रमाणे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पुरविण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २७-१२-२००५ रोजीच्या अर्जावर, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २९-१२-२००५ रोजी प्राप्त झाला त्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस दिनांक २७-०१-२००६ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ ८०६ क्रमांकाची पावती आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होते. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाध्ये या प्रकरणी उपरोक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या चौकशीसंदर्भात काही आक्षेप नोंदविले आहेत व या प्रकरणाची चौकशी त्यांनी राज्य माहिती आयोगाने करण्याचे अपेक्षिले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस उपरोक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या चौकशीवर काही आक्षेप असतील तर ते त्यांनी आरोग्य खात्यातील वरीष्ठ अधिका-याकडे नोंदवून आपल्या तक्रारीचे निराकरण त्यांच्या कडून करुन घेणे योग्य राहील असे अपिलार्थीस सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील आरोपामध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य न आढळल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यायोग्य आहे.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडण करण्याकरिता आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत व आयोगासमोर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली आहे त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुकेशीराज सदाशिवराव कु-हाडकर, श्री. क्लिनिक, गणपती चौक, बोलठाण, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९८

निर्णय दिनांक ०३-०४-२००८

श्री. अशिष अविनाश देसाई, : अपिलार्थी
जेथलिया टॉवर्स, दिवाण देवडी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सिडको, नवीन औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे),
सिडको, नवीन औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहयोगी नियोजनकार सिडको, नवीन औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको, नवीन औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशिष अविनाश देसाई हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहयोगी नियोजनकार सिडको श्री.

वाय. एस. रेड्डी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको यांचे प्रतिनिधी सहाय्यक वसाहत अधिकारी सिडको श्री. जगदीश लक्ष्मणराव राठोड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"1. The copy of (approval letter/order received by CIDCO Waluj Mahanagar, Aurangabad from the Government of Maharashtra regarding) levy of development charges, their rates at the time of getting the layout permission and building permission for land situated in Waluj, Mahanagar, Aurangabad under MRTP Act.)

2. The copy of the (approval letter/order received by CIDCO Waluj Mahanagar, Aurangabad from the Government of Maharashtra regarding) levy of service charges, their rates for net plotted area of land by CIDCO Waluj, Mahanagar, Aurangabad for land situated Waluj, Mahanagar, Aurangabad.

3. The copy of the public Notice as advertised in the Local New Paper regarding effective date of levy Development Charges, service charges, their rates for wide publicity as per MRTP Act.

4. The copy of the approval letter/order/GR received by CIDCO Waluj Mahanagar, Aurangabad issued land FREE OF COST by the land owner while getting the approval of layout plan of

the land situated in Waluj Notified Area, Waluj Mahanagar, Aurangabad. "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती व त्याच बरोबर माहिती तयार ठेवल्यानंतर तसे त्यांना अवगत करण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविले. तदनंतर अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ०४-१२-२००६ रोजी दूरध्वनीव्दारे त्यांनी मागितलेली माहिती तयार असून आवश्यक ते शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे त्यांना कळविले. तदनंतर अपिलार्थी परत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०६-१२-२००६ रोजी हजर झाले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १४-११-२००६ रोजीचे पत्र त्यांना पोस्टाने पाठविण्याचे सूचित केले. अपिलार्थी यांच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-१२-२००६ रोजी परत शुल्क भरण्यास पत्र पाठविले. त्यावर अपिलार्थी दिनांक १२-१२-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन गेले. अपिलार्थीस सदर माहिती दिनांक १२-१२-२००६ रोजी मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या पत्रावर स्वाक्षरी घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम

अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.  तसेच त्यांना माहिती नाकारणा-या अधिका-याविरुद अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याची विनंती देखील त्यांनी जन अपिलीय अधिका-याकडे केलेली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.  तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे ३ मुद्दयावर खुलासा केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सदर निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-११-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रुपये २५ इतके शुल्क भरण्याचे सूचित केले.  अपिलार्थीस या पत्रानंतर त्यांनी दिनांक ०४-१२-२००६ रोजी परत दूरध्वनीवरुन शुल्क भरण्याचे कळविले.

तदनंतर परत अपिलार्थी यांच्या विनंतीनुसार दिनांक ०७-१२-२००६ रोजी शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात पत्र पाठविले. दिनांक ०७-१२-२००६ रोजी दिनांक १४-११-२००६ रोजीचेच पत्र पाठविले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक १२-१२-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती घेतली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये शासन आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या त्याप्रमाणे त्यांना सदर आदेशाच्या प्रती पुरविण्यात आल्या. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील केल्यानंतर त्यांना हीच माहिती परत देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या काही शंकांना उत्तरे देखील दिली आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस मागितल्याप्रमाणे मिळाली आहे तसेच त्यांच्या शकांना त्यांनी वेळोवेळी उत्तरे दिलेली आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. माहिती मागण्याच्या विहित प्रपत्रामध्ये अपिलार्थीस सदर माहिती व्यक्तिशः हवी आहे की पोस्टाने हवी असे विचारल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती तयार असल्याबाबत कळविल्यानंतर ते माहिती घेऊन जातील अशा अर्थाचे विधान केले आहे ते मुळात अपिलार्थी यांच्या कडून अपेक्षित नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची

मागणी केल्यानंतर सदर माहितीसंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर महिती तयार झाली आहे किंवा कसे याची विचारणा करणे हे जास्त उचित ठरते. एवढे असूनही या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे, तसेच वेळोवेळी दूरध्वनी-वरुनही अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे कळविले आहे. अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता त्यांनी २५ रुपये या शुल्काचा भरणा करण्यास सूचित केले असता त्यांनी हे पत्र पोस्टाने पाठवावे असे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्रत्युत्तर केले. यावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य होते किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात शंका आहे. अपिलार्थीस माहितीत जर स्वारस्य असते तर त्यांनी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन तात्काळ माहिती हस्तगत करुन घेतली असती. परंतु त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून शुल्कासंदर्भात पत्राव्दारे माहिती अपेक्षित केली ही अपिलार्थी यांची चूक आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील चारही मुद्दयावर त्यांनी शासनाकडून मान्यता प्राप्त झालेल्या आदेशाच्या प्रती, जाहीर अधिसूचनेच्या प्रती मागितल्याचे दिसून येते. या चारही मुद्दयावरील सर्व प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पाहता ती अपिलार्थीच्या मागणीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती निश्चितपणे अपूर्ण कशी आहे हे सांगण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर सुनावणीस उपस्थित नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती समपर्क असल्याचे आढळल्यावरुन अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे

मत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रत्येक टप्प्यावर स्वतः होऊन सकारात्मक योग्य तो प्रतिसाद दिला असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आशिष अविनाश देसाई, जेथलिया टॉवर्स, दिवाण देवडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहयोगी नियोजनकार सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२००

निर्णय दिनांक : ०३-०४-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर, अग्रवाल, : तक्रारदार
मु.पो. मेनराड बोदवड
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, जळगाव.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. दिलीपकुमार गौरीशंकरअग्रवाल (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, जळगाव. श्री. प्रशांत भामरे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २२.१२.२००७ रोजीच्या तक्रारअर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००७ रोजी द्वितीय अपिल क्र. ६३४ च्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाचे अद्यापि उत्तरवादी यांनी अनुपालन केले नाही. तसेच उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून तक्रारदार यांना जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. ३१२८/८७१ दि. २३.६.२०० रोजी बाबतची

त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या कारभारासंदर्भात त्यांनी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात व ग्राम पंचायत कार्यालयाने वेळोवेळी केलेले बेकायदेशीर ठराव रद्द करण्याबाबत उत्तरवादी यांनी अद्यापि काहीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी आयोगाने दिलेले निर्णयाचे उत्तरवादी यांनी पायमल्ली करुन व योग्य ती माहिती त्यांना न देऊन त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली आहे. त्यामुळे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन त्यांना पुन्हा माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी या अर्जाचे शेवटी विनंती केली आहे. तसेच त्यांना शारिरीक, मानसिक व आर्थिक नुकसानीची भरपाई देखिल करण्याची विनंती त्यांनी या अर्जामध्ये आयोगास केली आहे.

उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या या युक्तीवादासंदर्भात असा युक्तीवाद केला आहे की, त्यांनी तक्रारदार यांना आवश्यक त्या नस्त्या अवलोकनार्थ विहित मुदतीत उपलब्ध करुन दिल्या होत्या. तथापि तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, उत्तरवादी यांनी कोणत्याही प्रकारच्या नस्त्या पहाणीसाठी उपलब्ध करुन दिल्या नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पहाणी करता तक्रारदारा अथवा उत्तरवादी यापैकी नेमका कोणाचा युक्तीवाद खरा आहे, हे कळण्यास आयोगास मार्ग नाही, त्यामुळे उत्तरवादी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांना पहाणीसाठी आवश्यक असलेल्या नस्त्याची विषयासह यादी प्राप्त करुन घ्यावी. तक्रारदार यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना पहाणीसाठी आवश्यक असलेल्या नस्त्यांची विषयसूची त्यांनी उत्तरवादी यांना दि. ८.४.२००८ रोजी सादर करावी, तद्नंतर दि. २ जून, २००८ रोजी कार्यालयीन वेळेत तक्रारदार यांना, त्यांनी दिलेल्या विषयसूचीप्रमाणे, सदर विषयसूचिशी संबंधीत नस्त्या, पहाणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, असे उत्तरवादी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१)	तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२)	तक्रारदार यांनी उत्तरवादी यांना दि. ८.४.२००८ रोजी त्यांना पहाणीसाठी आवश्यक असलेल्या नस्त्यांची विषयसूची सादर करावी. तद्नंतर दि. २ जून, २००८ रोजी कार्यालयीन वेळेत उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी दिलेल्या विषयसूचीप्रमाणे सदर विषयसूचीशी संबंधीत सर्व नस्त्या त्यांना पहाणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक	०३-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. दिलीपकुमार गौरीशंकर, अग्रवाल,मु.पो. मेनरोड बोदवड जिल्हा जळगाव

२	जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.),जिल्हा परिषद, जळगाव. यांना  या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२०१

निर्णय दिनांक : ०३-०४-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर, अग्रवाल, : तक्रारदार
मु.पो. मेनरोड बोदवड
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, जळगाव.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. दिलीपकुमार गौरीशंकरअग्रवाल (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, जळगाव श्री. प्रशांत भामरे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, आयोगाने दि. २३.१०.२००७ रोजी दिलेल्या अपिल क्र. ६३६ च्यासंदर्भातील आदेशाची उत्तरवादी यांनी काही अंशी पूर्तता करुन दि. २३.१०.२००७ रोजी माहिती दिली, तथापि त्यांनी ज्या मुद्दयानुसार माहिती मागितली आहे, त्यानुसार मुद्देनिहाय माहिती त्यांना उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झाली नाही. उत्तरवादी यांनी दिलेल्या माहितीतील विसंगतीबाबत त्यांनी

उत्तरवादी यांचेकडे विचारणा केली असता उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. १.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक असलेली माहिती ११.१२.२००७ पावेतो देण्याचे आश्वासित केले. तथापि आजतागायत उत्तरवादी यांचेकडून त्यांनी या संदर्भात माहिती प्राप्त झाली नाही तेव्हा त्यांनी या तक्रारीची योग्य ती चौकशी करुन/दखल घेऊन संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदार यांच्या वरील तक्रारीवर उत्तरवादी यांनी आयोगापुढे असा युक्तीवाद केला की, तक्रारदाराने मागितलेल्या माहिती देण्याचे दृष्टीने यामधील काही प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने बऱ्याच कायदेशीर अडचणी येत आहे व त्यामध्ये, बरेच कायदेशीर बारकावे असल्याने व त्याचा अभ्यास करण्यासाठी वेळ लागणार आहे व त्यामुळे त्यांनी, तक्रारदार यांना माहिती देण्यासही २ जून, २००८ पर्यन्त मुदत देण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे. उत्तरवादी यांची सदर विनंती मान्य करण्यात येत असून त्यांनी, दि.२.६.२००८ पर्यन्त संपूर्ण माहिती तक्रारदारास द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) उत्तरवादी यांनी तक्रारदारास, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती तक्रारदारास दि. २.६.२००८ पर्यंत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर, अग्रवाल,मु.पो. बोदवड जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.),जिल्हा परिषद,

जळगाव. यांना  या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१७

निर्णय दिनांक ०४-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. शंकर व्यंकटेश वादोने,<br>ताज कॉम्प्लेक्स समोर,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकर व्यंकटेश वादोने (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (संगायो) श्री. पी. के. कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद श्री. विकास वामनराव

नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकारी यांची नेमणूक व उपस्थितीसंदर्भात दिनांक २८-११-२००६ मधील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. आपल्या कार्यालयाचा माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी कोण आहेत ? त्यांच्या पदांचा उल्लेख असलेला फलक आपल्या कार्यालयात दि. २८-११-०६ रोजी होता का ?

२) माहिती अधिकारी / सहा. माहिती अधिकारी उपलब्ध नसल्यास त्यांचे अधिकार दि. २८-११-२००६ कोणाला प्रदान करण्यात आले होते.

३. मा. जिल्हाधिकारी, उ, बाद यांचे पत्र ज्ञापन क्र. २००६/केमाआ/ अभिलेख-कक्ष, दि. १२-०९-०६ प्रमाणे आपल्या कार्यालयाने पुर्तता केली आहे का ? असल्यास त्याची सीडी उपलब्ध आहे का ? "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

अपील करतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती चुकीची आहे. माहिती पुरविण्यासाठी विहित नमुना वापरण्यात आलेला नाही, माहितीने समाधान झाले नाही तर कोणाकडे व किती दिवसात अपील करावे याचा उल्लेख नाही. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः तपासणी करतांना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या नावाचा फलक आढळला नसल्याचे देखील त्यांनी या अपील अर्जात नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि यासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावर आपले आदेश दिनांक २५-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांचे प्रथम अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी कारणे दर्शविली नाहीत, अपिलाचा निर्णय करतांना अपिलार्थीचे समाधान न झाल्यास कोणाकडे व किती दिवसात अपील करावे याचा उल्लेख नाही, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची असतांना तिची शहानिशा केली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची बाजू घेऊन सदर निर्णय दिल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते उस्मानाबाद येथील तहसील कार्यालयामध्ये माहितीचा अधिकारांतर्गत त्यांचा माहितीसाठीचा अर्ज तहसील कार्यालयात घेऊन गेले असता

त्यांचा अर्ज कोणत्याही कर्मचा-याने, माहिती अधिका-याच्या सहीशिवाय स्विकृत करण्यास नकार दिला. तसेच त्यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी यांचा उल्लेख करणारे फलक नव्हते. सदर फलक अपिलार्थीचे पत्र त्यांना पोहोचल्यानंतर एक आठवड्याच्या आत लावले. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये "अपिलार्थी यांचा हेतू माहिती मिळविण्यापेक्षा तक्रार करण्याचा दिसून येतो. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती घेण्याच्या सवबीखाली तक्रार करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तसेच अपिलार्थी यांचा हेतू अधि का-यांना विनाकारण त्रास देण्याचा आहे हे दिसून येते" असे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अभिप्रायावर अपिलार्थी यांचा आक्षेप आहे. सदर अभिप्राय जन अपिलीय अधिकारी व्यक्त करतांना अपिलार्थी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली गेली नव्हती. त्यांचे कोणतेही म्हणणे न ऐकता जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अभिप्राय त्यांच्या निर्णयामध्ये दिले आहेत असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रास त्यांनी दिनांक २२-१२-२००६ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना सदर अपिलावर निर्णय देतेवेळी अपिलार्थीस या बाबींची माहिती दिली गेल्याचे आढळून आल्याने त्यांनी अपिलार्थीस सुनावणीस बोलाविले नाही व त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्राआधारे सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी दिनांक २५-०१-२००७ रोजी निर्णय दिला आहे.

वरील घटनाक्रम, दोनही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये

प्रतिसाद दिला आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांच्या मते दिनांक २८-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या पदाचा उल्लेख करणारे फलक त्यांच्या कार्यालयात नव्हते तर जन माहिती अधिकारी यांचे मत सदर फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावले गेले होते त्यामुळे कदाचित ते अपिलार्थीच्या निदर्शनास आले नसावेत असे आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २८-११-२००६ रोजीच्या अनुपस्थितीमध्ये त्यांचे अधिकार कोणाला प्रदान केले होते त्या व्यक्तीचे नांव व तारखेच्या मागणीची माहिती मागितली होती. तथापि शासकीय कार्यालयामध्ये ज्या अधिका-यांना दौ-यावर जावे लागते त्यांच्या मुख्यालयीन अनुपस्थितीमध्ये त्याच्या कार्यालयातील त्यांचा नंतर जे जेष्ठ अधिकारी आहेत त्यांनी सर्वसाधारणपणे कार्यालयाचे काम पाहण्याचे संकेत आहेत. याकरिता विशेष आदेश कोणत्याही कार्यालयाने आजवर काढल्याचे पाहण्यात नाही. दिनांक २८-११-२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी हे उस्मानाबाद व ढोकी येथे उपस्थित असल्याचे त्यांच्या जीपच्या लॉगबुकवरुन दिसून येते. (ही माहिती अपिलार्थीने माहिती अधिकार तरतूदीचा वापर करन वेगळ्या अर्जाव्दारे प्राप्त करुन घेतली आहे) त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिलेली माहिती सुसंगत वाटते. अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील जन माहिती अधिकारी यांनी सुसंगत माहित दिली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा दुसरा आक्षेप जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-०१-२००७ रोजी दिलेल्या निकालपत्रा-तील त्यांच्या हेतूबद्दल शंका व्यक्त करणा-या विधानाबाबत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची सूचना दिली नाही ही बाब

वस्तुस्थितीवर आधारित आहे. हे पाहता व अपिलार्थी यांचे कोणतेही म्हणणे ऐकून न घेता त्यांच्या हेतूबद्दल निर्णयपत्रामध्ये शंका व्यक्त करण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती चुकीची आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २५-०१-२००७ च्या प्रथम अपिल निर्णयातील दुस-या परिच्छेदातील ओळ क्रमांक ४ मधील, " वादी यांचा हेतू ....... ते ७ व्या ओळीतील ........ त्रास देण्याचा आहे हे दिसून येते" हा भाग या निर्णयाव्दारे वगळण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्याप्रमाणे हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत शुध्दीपत्रक निर्गमीत करावे. तसेच येथून पुढे अपिलाची सुनावणी घेतांना अपिलार्थी यांना देखील बोलावण्याची पध्दत त्यांनी येथून पुढे अंमलात आणावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील कोणत्या मुद्दयावरुन फेटाळण्यात आले हे त्यांच्या अपील निर्णयावरुन स्पष्ट होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती देणे त्यांना बंधनकारक नसतांनाही त्यांना विहित मुदतीत माहिती दिली असल्याचा स्पष्ट उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात केल्याने अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग ग्राह्य धरत नाही. येथे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना फक्त अंतीम आदेशाची प्रत दिली असून त्यांच्या अपील अर्जातील निर्णयाचे विवेचन करणा-या निर्णयाची प्रत त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांना येथून पुढे त्यांच्या अपील निर्णयासंबंधी कळवितांना तो फक्त अंतीम आदेश या स्वरुपात न देता संपूर्ण तपशिलासह कळवावा अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

प्रसंगवशात येथे असे दिसून येथे की, या अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे अशा प्रकारच्या लहानसहान गोष्टीकरिता यावे लागले ही बाब खेदजनक आहे. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, यांनी येथून पुढे माहिती अधिकारातंर्गत कोणत्याही नागरिकांचा अर्ज कोणत्याही हरकतीशिवाय त्वरेने स्विकारुन यासंदर्भात सकारात्मक कारवाई करावी व तसे आदेश आपल्या हाताखालील कर्मचा-यांना लिखीत स्वरुपात द्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर व्यंकटेश वादोने, ताज कॉम्प्लेक्स समोर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४२

निर्णय दिनांक ०४-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. इम्तीयाज अहमद सिराज अहमद,<br>स. नं. १३४/२, प्लॉ. नं. ५, रजापुरा,<br>मालेगाव, जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत विभाग,<br>मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा नगर रचनाकार,<br>मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. इम्तीयाज अहमद सिराज अहमद हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव श्री. जयपाल लक्ष्मण त्रिभुवन (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव श्री. राजेंद्र काशीनाथ बावीस्कर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१२-२००१ ते त्यांना माहिती प्राप्त होण्यापर्यतच्या कालावधीतील मालेगाव महानगरपालिका हद्दीतील बांधकामासंदर्भात खालील प्रमाणे एकूण ९ मुद्यावर माहिती मागितली होती.

“ १. दिनांक १७-१२-२००१ पासून ते आजपर्यत देणेत आलेल्या ५२, ५३, ५४ ची नोटीसाप्रमाणे संबंधीत खात्याने काय काय कारवाई केली त्यांची कारवाईची, नोटीसीची संपूर्ण माहिती कागदपत्रांची छायांकित प्रतसह द्यावी.

२. दिनांक १७-१२-२००१ पासून ते आजपर्यत देणेत आलेल्या ५२, ५३, ५४ ची एकूण नोटीसापैकी किती नोटीसप्रमाणे संबंधीत अनाधिकृत बांधकाम मालकाविरुध्द कारवाई करणेत आली नाही. यांची नावे, पत्तेसह नोटीसची छायांकित प्रतह सविस्तर माहिती द्यावी.

३. दिनांक १७-१२-२००१ पासून ते आजपर्यत देणेत आलेल्या ५२, ५३, ५४ ची एकूण नोटीसापैकी कारवाई ना केलेल्या नोटीसासंबंधी संबंधीत अधिकारी विरुध्द प्रशासनाने काय कारवाई केली याची संपूर्ण माहिती कागदपत्राची छायांकित प्रतसह मिळावी व संबंधीत कसूर केलेल्या अधिका-यांचे नांव, हुद्यासह माहिती मिळावी.

४. दैनिक शामनामामध्ये दिनांक ०२/२/२००६ रोजीच्या बात्मीप्रमाणे जाखोटिया कॉम्प्लेक्स, महेशनगर येथील ओपन स्पेस मध्ये १/१० ची

जागा महेशनगर ट्रस्ट यांना ८/८/८८ ला तत्कालीन नगरपालिका जनरल बोर्डाने ठराव क्र. ९० अन्वये देणेस मंजूरी दिली. मात्र तेथे शॉपींग कॉम्प्लेक्स बांधून अनाधिकृत रित्याने आर्थिक लाभ घेत असल्याने श्री. शर्मा यांनी माहिती अधिकाराने मागितलेली माहितीवरुन मा. न. पा. यांनी संबंधीत ट्रस्टला महा. प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ अन्वये नोटीस देणेत आली आहे. तसेच संबंधीत पोलीस स्टेशनला देखील त्याची प्रत देणेत आली असल्याचे वर्तमानपत्रात उल्लेख आहे. ही बात्मी खरी आहे का ? खरी असल्यास यासंबंधीचे सर्व कागदपत्र म्हणजे काढण्यात आलेली नोटीसीची छायांकित प्रत व ठराव क्र. ९० दिनांक ८/८/८८ ची छायांकित पत्र व शहर पोलीस स्टेशनची प्रतची छायांकित प्रत द्यावी.

५. महेशनगर ट्रस्ट यांनस सन १९८८ मध्ये १/१० ची उपलब्ध करुन देणेत आली अथवा जागाची डिमार्केशन करुन देणेत आललेले अधिकारीचे नांव हुद्दासह माहिती द्यावी. तसेच उक्त ठिकाणी १/१० पेक्षा जास्त जागा गेल्याने १० ते १२ वर्षापासून अनाधिकृत रित्याने बांधलेल्या इमारतीला तोडण्याची कारवाई या भागाचे संबंधीत वॉर्ड निरिक्षक, इमारत पर्यवेक्षक व नगररचनाकार यांनी का केली नाही. याचा लेखी स्वरुपात खुलासा द्यावा व प्रशासनाने त्याच्या विरुध्द काय काय कारवाई केली याचा लेखी खुलासा होणेस विनंती आहे.

६. दिनांक १७/१२/२००१ पासून आजपर्यत मालेगाव महानगरपालिका हद्दीतील प्लॉट मालकांनी विना परवानगी बांधकाम करुन घेतल्याने मालेगाव महानगरपालिकेचे एकूण किती रुपयांचे आर्थिक नुकसान झाले याचा हिशोब मालेगाव महानगरपालिकेचे चिफ ऑडीटर यांच्या

कडून हिशोब करुन एकूण किती रुपयांचे आर्थिक नुकसान झाले याचा लेखी खुलासा ऑडीटरकडून मिळालेल्या हिशोबत पत्रकाच्या साक्षांकित नकलेसह करावा. ”

अपिलार्थीचे सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०४-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २७-०४-२००६ रोजी पारीत केले आहे. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील ते सुनावणीस गैरहजर असल्याने फेटाळल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कागदपत्राच्या साक्षांकीत नकला दिल्या नाहीत, अपूर्ण उत्तरे दिली आहेत, महासभेच्या आवश्यक त्या ठरावाचा क्रमांक व दिनांक याचा त्या माहितीमध्ये उल्लेख नाही. ठरावाची नक्कल दिली

नाही, अपिलीय अधिका-याचा पत्ता दिला नाही असे नमूद केले आहे व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्या ते सुनावणीस गैरहजर होते म्हणून अपील फेटाळले या कृतीस त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये आक्षेप घेतला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना परिच्छेद ३ मध्ये विनोदकुमार गिरीधारीलाल मित्तल असे अपिलकर्त्याचे नाव दिले आहे ते कसे आले हे अपिलार्थीस समजून येत नाही असे अपिलार्थीने व्दितीय अपीलामध्ये म्हटले आहे. याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती करुन त्यांना सर्व माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची त्यांनी अंतीमतः त्यांनी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक २८-०२-२००६ रोजी दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी त्यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००६ रोजी हजर न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जास

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००६ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्दयावर माहिती मागविली होती. यापैकी मुद्दा क्रमांक ४ मधील माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारलेली प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती आहे. यातील ‘‘ही बातमी खरी आहे काय’’ हा भाग माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ‘‘माहिती’’ होऊ शकत नाही. तसेच अपिलार्थीने या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे विचारलेल्या माहितीबाबत अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती तोडण्याची कारवाई का केली नाही असे म्हटले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. या व्याख्येप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक ५ ची माहिती या व्याख्येशी सुसंगत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस, जरी त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती " माहिती " या व्याख्येशी सुसंगत नव्हती तरी, त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे / खुलासा केला आहे. या माहितीचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या प्रश्न क्रमांक १ व २ मधील नोटीसची छायांकीत प्रत जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रासोबत जोडली असल्याचे आढळून येत नाही. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये फी भरुन प्रती घेऊन जाव्यात असा मोघम उल्लेख केला आहे. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना द्यावयाची प्रस्तावित माहिती निश्चित किती पृष्ठांची आहे व ती देण्याचा दर काय आहे याचा उल्लेख केलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये उल्लेखिलेले श्री. विनोदकुमार गिरधारीलाल मित्तल हे नाव टंकलेखनातील चुकीमुळे त्यांच्या निर्णयात पडले असल्याचे आयोगासमोर कबूल केले. एकंदरीत जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिलेल्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणारी माहिती किती पृष्ठांची आहे व ती देण्याचा दर या तपशीलाचा उल्लेख न केल्याने तसेच अपिलार्थीने मागितलेल्या ठराव व नोटीसीच्या प्रती अपिलार्थीस त्यांनी या पत्रासोबत जोडल्या नसल्यामुळे सदर माहिती त्रोटक ठरते. माहितीचा हा भाग अशा प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविण्याचे दिसून येत नाही. माहितीच्या पृठांची संख्या व दर हा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (a) प्रमाणे अनिवार्य आहे. तथापि अशा प्रकारची कोणती माहिती न देऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (a) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) अन्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिलेला सकारात्मक प्रतिसाद पाहता विशेषतः अपिलार्थीस प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देखील त्यांनी पुरविण्याचा प्रयत्न केला असल्याने या प्रकरणी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती सहेतूक दडविण्याचा त्यांचा मानस होता किंवा यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कोणतीही कारवाई आदेशीत करण्यात येत नाही. मात्र येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात त्यांनी विशेष सतर्क राहून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात

येत आहे.  जन अपिलीय अधिकारी यांची केवळ अपिलार्थी गैरहजर आहेत म्हणून त्यांचे अपील फेटाळण्याची कृती बरोबर नाही असे आयोगास वाटते.  जर अपिलार्थी गैरहजर असतील तर त्यांच्या गैरहजेरीमध्ये देखील त्यांनी केलेल्या अपील अर्जातील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद गृहीत धरण्यात येऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय देणे अपेक्षित आहे.  येथून पुढे अशा प्रकारच्या चूका न करता त्यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपील अर्जावर सकारात्मक दृष्टीकोनातून कारवाई करावी अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक 	०४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. इम्तीयाज अहमद सिराज अहमद, स. नं. १३४/२, प्लॉ. नं. ५, रजापुरा, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगर पालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४३

निर्णय दिनांक ०४-०४-२००८

श्री. सुधाकर यादव भंगाळे, : अपिलार्थी
परशुराम ३३ प्रोफेसर कॉलनी, बियाणी
चेंबरच्या मागे, जामनेर रोड, भुसावळ

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापिका, आनंद एज्युकेशन
सोसायटी संचलीत प्राथमिक विद्यामंदीर,
आनंदनगर, भुसावळ, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव आनंद एज्युकेशन प्राथमिक
शिक्षण मंदीर, आनंदनगर भुसावळ जिल्हा
जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधाकर यादव भंगाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आनंद एज्युकेशन सोसायटी संचलीत प्राथमिक विद्यामंदीर सौ. पुष्पा

दिनकर जावळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अध्यक्ष आनंद एज्युकेशन प्राथमिक शिक्षण मंदीर तथा त्रयस्त श्री. दिनकर तुकाराम जावळे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९२ ते २००२ या कालावधी-तील त्यांच्या शाळेशी संबंधीत माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" १. आनंद अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसा. चेअरमन दिनकर तुकाराम जावळे यांनी यांचे सहीनिशी कर्जदारांना चेक देतांना कर्जदारांकडून संबंधीत एज्युकेशन सोसायटीसाठी घेतलेल्या डोनेशन इ. चा तपशीलवार अहवाल द्यावा.

२) दर महिन्याला मिळणारे शासकीय अनुदान व त्याचे संस्थेमार्फत होणारे वाटप याचा चार्ट. "

अपिलार्थीचे सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने लिहिलेला अशा प्रकारचा अर्ज त्यांनी सत्वर संस्थेच्या अध्यक्षा-

कडे सुपुर्द केला आहे. त्यांच्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्या कोणताही पुरावा सादर करु शकल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे देखिल आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन प्रश्नाधीन संस्थेच्या १९९० ते २००५ या कालावधीतील ऑडिट रिपोर्टची मागणी केली आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती फक्त आयोग येथे विचारात घेत असून अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील या जादा माहितीच्या मागणीचा आयोग कोणताही विचार करत नाही.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. सदर

माहिती त्यांना आजपावेतो मिळालेली नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मागणी संदर्भात भुसावळ नगरपालिका प्रशासकीय अधिकारी व जिल्हापरिषद शिक्षणाधिकारी प्राथमिक जळगाव यांच्याशी यासंदर्भात पत्रव्यवहार केला असता त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले होते. या पत्राच्या प्रती त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अग्रेषित केल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, नगरपरिषदेकडून त्यांना अपिलार्थी यांच्या पत्रासंदर्भात कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही. मात्र शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडून त्यांना अपिलार्थीने संदर्भिय केलेल्या पत्राची प्रत प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना मानसीक त्रास दिल्याने तसेच त्यांच्या शैक्षणिक कार्यामध्ये अडथळे आणल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. तसेच अपिलार्थी यांनी पैशासाठी स्त्रीची अवलेहना देखील केली असून त्यांचे पती, जे या संस्थेचे अध्यक्ष आहेत, त्यांना, अपिलार्थीने जीवे मारण्याची धमकी दिली होती. या पार्श्वभूमीवर त्या अपिलार्थीस माहिती पुरवू शकल्या नाहीत. त्यांच्या शाळेस शासनाकडून सन १९९६-९७, १९९७-९८ व १९९८-९९ या ३ वर्षामध्ये फक्त अनुदान प्राप्त झाले. ते अनुक्रमे १३५४, ९८५६ व १४०५४ रुपये इतके आहे. त्याचा विनियोग त्यांनी शैक्षणिक कार्याकरिता केलेला आहे. तदनंतर शासनाकडून त्यांना कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या माहितीशी त्यांचा कोणताही संबंध नाही व या मुद्दयाविषयी त्यांना काहीही माहिती नाही.

त्रयस्त पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते स्वतः नाहाटा न्यू कॉलेज भुसावळ येथे प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. आनंद एज्युकेशन

सोसायटीची त्यांनी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेली आहे. तसेच आनंद अर्बन को ऑपरेटिव्ह सोसायटी या संस्थेची देखील सहकार खात्याकडे नोंदणी केलेली आहे. या दोनही संस्थांचे अध्यक्ष ते स्वतः आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांचा असा समज झाला आहे की, त्यांनी कर्जदारांकडून आनंद शिक्षण संस्थेकरिता देणग्या घेऊन त्यांना आनंद को ऑपरेटिव्ह सोसायटीमार्फत कर्ज वितरण केले आहे. अपिलार्थीच्या झालेल्या या गैरसमजातून त्यांचा दुराग्रह झाला आहे. अपिलार्थी हे आनंद को ऑपरेटिव्ह सोसायटीचे ठेवीदार आहेत. मात्र ते शिक्षण संस्थेचे सभासद नाहीत. सदर आनंद को ऑपरेटिव्ह सोसायटीचे प्रकरण सध्या ग्राहक मंचाकडे प्रलबीत आहे. आनंद को ऑपरेटिव्ह सोसायटी व आनंद शिक्षण संस्था यांचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

वरील घटनाक्रम, दोनही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी ह्या त्रयस्त पक्षाच्या पत्नी आहेत. त्रयस्त पक्ष हे आनंद एज्युकेशन सोसायटी व आनंद अर्बन को ऑपरेटिव्ह सोसायटी या दोनही प्राधिकरणाचे अध्यक्ष असून अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्रयस्त पक्षाने त्यांच्या शिक्षण संस्थेकरिता एका बाजुने नागरिकांकडून रक्कमांच्या स्वरुपात देणग्या स्विकारल्या व नंतर देणगीदारांना ते अध्यक्ष असलेल्या पत संस्थेव्दारे कर्ज मंजूर केले. अपिलार्थी यांना सदर शिक्षण संस्थेने स्विकारलेल्या या देणग्यांचा तपशील आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी व त्रयस्त पक्ष यांचे म्हणणे असे आहे की, आनंद को ऑपरेटिव्ह संस्था व आनंद एज्युकेशन संस्था या दोनही संस्था पूर्णतः वेगळ्या असून त्यांचा एकमेकांशी कोणताही दुरान्वयाने देखील संबंध नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्यांनी शासनाकडून दरमहा मिळणारे अनुदान व त्याच्या वाटपा-

संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आपल्या वरील युक्तिवादा-मध्ये दिलेली आहे. मात्र त्यांनी ती अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात लिखीत स्वरुपात पुरविलेली नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे त्यांनी त्यांच्या आजच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्त पक्ष यांच्यात आपसात असलेल्या वैयक्तीक मतभेदामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविण्यापुष्ट्यर्थ आयोगासमोर केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीनुसार प्रत्येक भारतीय नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती मागणे हा त्यांचा हक्क आहे. जन माहिती अधिकारी यांची शाळा शासन मान्यताप्राप्त असल्याने व त्यावर शिक्षण खात्याचे नियंत्रण असल्याने ही सार्वजनिक प्राधिकरण आहे त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य ठरते. या प्रकरणी जन माहिती अधिका-याने त्यांचे अपिलार्थीशी असलेले वैयक्तीक मतभेद मनात ठेऊन अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविणे म्हणजेच त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीपासून सहेतूपूरःस्सर दडविणे असे सिध्द होते. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती प्राप्त होण्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूतः वंचित ठेवल्याचे वरील प्रमाणे सिध्द झाल्याने त्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय हेतूतः वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी यांना प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यात शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली करावा. जन माहिती अधिकारी हे सदर शास्तीचा भरणा मे २००८ पासून शासकीय कोषागारात करतील याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगाव यांनी करुन घ्यावी व तसा अहवाल आयोगास जून २००८ पासून ते शास्तीची रक्कम पूर्णतः शासकीय कोषागारात भरली जाईपर्यत पाठवावा. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून हेतूतः वंचित ठेवल्याने त्यांच्यावर एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर यादव भंगाळे, परशुराम ३३ प्रोफेसर कॉलनी, बियाणी चेंबरच्या मागे, जामनेर रोड, भुसावळ.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आनंद एज्युकेशन सोसायटी संचलीत प्राथमिक विद्यामंदीर, आनंदनगर, भुसावळ, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव आनंद एज्युकेशन प्राथमिक शिक्षण मंदीर, आनंदनगर भुसावळ जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४९

निर्णय दिनांक ०४-०४-२००८

श्री. तंबोली निसार अहमद शेर मंहमद, : अपिलार्थी
३५, अविष्कार कॉलनी,
चाळीसगाव रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा
परिषद, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. तंबोली निसार अहमद शेर मंहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. भगवान सदाशिव सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. संजय किशनराव

सावरीकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व त्यांच्या तक्रारीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ 1. Details of the surplus teachers of Urdu Medium private secondary schools in Dhule District from 1-1-2005 in the format as below.

Format

| Sr. No. | Name of the Teacher | Qualification | Name of the schools from which declared surplus | Absorbed in any other school or not Yes/No | Total Salary paid from 1-1-2005 to 31-1-2006 |
|---|---|---|---|---|---|

2. Details of the teachers given approval by the department to them in Urdu Medium Secondary Schools of Dhule district from 1-1-2005 till 24-4-02-2006 in the format as below.

Format

| Sr. No. | Name of the Teacher s | Qualification | Date from which approval given | Name of the schools | Total payment disbursed till 31-1-2006 |
|---|---|---|---|---|---|

अपिलार्थीचे सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे स्पष्टपणे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणा-या शुल्काचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जात केला नाही, माहिती कोणत्या कारणास्तव हवी आहे त्याबाबतचा खुलासा त्यांच्या अर्जात नाही व या दोन्ही बाबींचा खुलासा अपिलार्थीच्या अर्जात नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्यात येत असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस सदर

माहिती नाकारुन अपिलार्थीचा दिनांक २७-०२-२००६ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीशी अथवा जन माहिती अधिकारी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती देण्याचे नाकारले, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज करुनही जन माहिती अधिकारी यांच्या कडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

दिनांक ०१-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांच्याकडून या अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी नाइलाजाने दिनांक २०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना आज दिनांक ०४-०४२००८ रोजी सदर माहिती विनामूल्य प्राप्त झाली आहे. या प्रकरणी त्यांना आयोगाकडे येण्यासाठी लागलेल्या १५०० रुपये इतक्या खर्चाची, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेशीत करावे अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये विनंती केली आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

अपिलार्थीने त्यांना या प्रकरणी त्यांना आलेल्या १५०० रुपये खर्चाचे विवरण आयोगास पुढील प्रमाणे दिले आहे. धुळे औरंगाबाद व परत असा ३०० किलोमीटर रस्त्याने व खाजगी वाहनाने कराव्या लागलेल्या प्रवासासाठी प्रति किलोमीटर ४ रुपये प्रमाणे १२०० रुपये व या प्रकरणी त्यांना लागलेला पोस्टाचा खर्च रुपये ३०० असे एकूण रुपये १५००.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे केला त्यावेळी ते माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत नव्हते ते सध्याच्या पदावर दिनांक २७-०४-२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची कल्पना त्यांना आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रथम आली व तदनंतर त्यांनी लगेच दिनांक २९-०३-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोस्टाने पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी कोणतेही शुल्क आकारले नाही. अपिलार्थीपासून सदर माहिती लपवून ठेवण्याची

त्यांची कोणतीही इच्छा नव्हती. तथापि सदर प्रकरणी संबंधीत लिपिकाकडून त्यांना अपिलार्थीचा सादर न केला गेल्याने ते अपिलार्थीच्या या अर्जावर निर्णय घेऊन शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कारवाई केली नाही हे त्यांना मान्य आहे. तथापि शिक्षण विभागाने दिनांक ०६-६-२००६ रोजीच्या त्यांच्या आदेशान्वये संबंधीत शिक्षणाधिका-याने सदरची नस्ती (शिक्षण विभाग) त्यांच्याकडे सादर न केल्याने, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना पुढील निर्णय घेता आला नाही. अपिलार्थीने केलेले अपील शिक्षण विभागाकडे विनाकारवाई तसेच पडून होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली सहज सोपी व सरळ होती. सदर माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रमाणाबाहेर मनुष्यबळ बाबत वळवावे लागत होते अशातला भाग या प्रकरणी लागू होत नव्हता. मुळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिलेल्या दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्याने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती स्पष्टपणे नाकारली होती. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी पहिले कारण असे दिले आहे की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणा-या खर्चाचा उल्लेख त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये केला नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांना लागणा-या माहितीचा खर्च कळविणे हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चे जन माहिती अधिकारी यांनी अवलोकन केले असते तर कदाचित अशा प्रकारचे नेमके उलटे उत्तर त्यांनी अपिलार्थीस दिले नसते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना दिलेले पहिले कारण अशा प्रकारे चुकीचे ठरते. अपिलार्थीस माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी दुसरे कारण असे दिले आहे की, अपिलार्थीने त्यांना माहिती कोणत्या कारणास्तव हवी आहे याचा उल्लेख त्यांच्या अपील अर्जामध्ये केलेला नाही. येथे देखील जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ६ चे नीट अवलोकन केले असते तर अशा प्रकारचे कारण त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना दिले नसते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (२) मध्ये अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करतांना कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नाही असा स्पष्ट उल्लेख आहे. किंबहुना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची ही तरतूद वैशिष्ट्यपूर्ण अशी तरतूद आहे. या तरतुदीचा ब-याच पातळीवर बोलबाला देखील झाला आहे. एवढे असून देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना नेमकी अधिनियमातील तरतुदींच्या विरुध्द भूमिका येथे घेतल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना दिलेले तिसरे कारण वरील २ कारणाप्रमाणेच चुकीचे ठरते. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी थोडाही सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडील केवळ इच्छाशक्तीचा अभाव हेच एकमेव कारण असावे असे वाटते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. या प्रकरणी त्यांनी

अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांनी, विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे मागविलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याने जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे इतर कर्मचारी / अधिकारी हे सर्व जण येथे जबाबदार ठरत आहेत अशा प्रकारे अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी निश्चितपणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सहाय्यक / कर्मचारी या सर्वांनी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यात शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली करावा. जन माहिती अधिकारी हे सदर शास्तीचा भरणा एप्रिल २००८ पासून शासकीय कोषागारात करतील याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी करुन घ्यावी व तसा अहवाल आयोगास मे २००८ पासून ते शास्तीची रक्कम पूर्णतः शासकीय कोषागारात भरली जाईपर्यत पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी या प्रकरणातील शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ७ विसाच्या

आत पाठवावा. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील माहिती संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती त्यांना आता दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत आता कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना या आलेल्या खर्चाचा तपशील त्यांच्या युक्तिवादात दिला आहे. सदर खर्चासंबंधी आवश्यक तो पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या पुराव्याची तपासणी करुन अपिलार्थी यांना जास्तीत जास्त १५०० रुपये पर्यत या प्रकरणातील नुकसानभरपाई त्यांना, अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक तो पुरावा सादर केल्यानंतर जास्तीत जास्त ७ दिवसाचे आत अदा करावी. सदर आदेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदींचा भंग केल्याचे येथे स्पष्ट होते. त्यांना सूचना देण्यात येते की त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुीनुसार प्राप्त होणा-या अपील अर्जावर त्यांनी इतःपर अधिनियमातील विहित मुदतीत कारवाई करुन आपले आदेश पारीत करावेत व या प्रकरणी केलेल्या चुकांची पुनरावृत्ती त्यांनी इतःपर करु नये.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५०

प्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी करुन तसा अहवाल आयोगास मे २००८ पासून ते शास्तीची रक्कम पूर्णतः शासकीय कोषागारात भरली जाईपर्यत दरमहा पाठवावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणातील प्रवासाशी संबंधीत कागदपत्रांची तपासणी करुन अपिलार्थीस १५०० रुपये इतक्या मर्यादेपर्यत, ७ दिवसाच्या आत नुक्सान भरपाई अदा करावी.

औरंगाबाद
दिनांक ०४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तंबोली निसार अहमद शेर मंहमद, ३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अरिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२०२

निर्णय दिनांक : ०४-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भास्कर किसनराव जोशी,<br>साईनगर, कोपरगाव जि.अहमदनगर | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा सहसंचालक,<br>उच्च शिक्षण, पुणे विभाग,<br>पुणे. | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. भास्कर किसनराव जोशी (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), तर जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. भालचंद्र जगन्नाथ कोदे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी दि. २१.९.२००६ रोजीच्या तक्रारअर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्याचे सेवानिवृत्तीचे प्रकरण प्रलंबित ठेवल्याच्या कारणाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार सहसंचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडे त्यांच्या दि. २.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली होती. तथापि सदर माहिती जन माहिती

अधिकारी यांनी दि. १.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये, म्हणजेच ६० दिवसांचे उशिराने त्यांना दिली. त्याचबरोबर त्यांना अद्यापि ग्रॅच्युईटीची रक्कम न मिळाल्याने व याबाबत त्यांनी उपसचिव, उच्च शिक्षण व उच्च शिक्षण संचालनालयास दि. ११.९.२००६ च्या पत्राद्वारे कळवूनही काही उपयोग न झाल्याने, त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी आयोगास विनंती केली आहे. तक्रारदाराच्या या दि. ११.९.२००६ रोजीच्या अर्जास उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या दि. २१.९.२००६ रोजी उत्तर दिल्याचे सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी तक्रारदारास पाठविलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन तक्रारदारास उत्तरवादी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार यांचा आक्षेप त्यांना मिळालेल्या ग्रॅच्युईटीच्या रकमेसंदर्भात आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना धनादेशाद्वारे दिलेली रक्कम चुकीची असल्याचे त्यांना वाटल्यावरुन, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असे अनुमान काढले आहे. ग्रॅच्युईटीची रक्कम निश्‍चित ठरविण्याकरिता अथवा सेवानिवृत्तीच्या प्रकरणातील ग्रॅच्युईटीची रक्कम किंवा तत्संबंधीच्या उपदानाविषयी निर्णय घेण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही. तक्रारदारास उत्तरवादी यांनी दिलेल्या ग्रॅच्युईटीबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी शिक्षण विभागातील योग्य त्या प्राधिकरणाकडे अर्ज करुन आपल्या आक्षेपाचे निराकरण करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणात असे दिसून येते की, महालेखापाल यांनी, दि. १५.५.२००६ रोजीच्या त्यांच्या आदेशान्वये तक्रारदारास रु.२,४५,०००/- इतकी ग्रॅच्युईटीची रक्कम मंजूर केली आहे, तथापि त्यांनी सदर ग्रॅच्युईटीची रक्कम दि. २५.९.२००६ रोजी प्राप्त झाली आहे. महालेखापालानी पारित केलेल्या मंजूरीचे आदेश व तक्रारदारास प्रत्यक्षतः हातात धनादेश मिळणे या मधील व्यपगत झालेल्या कालावधीबद्दलही तक्रारदार यांचे आक्षेप आहेत. तथापि तक्रारदारांनी उपस्थित केलेले वरील मुद्दे संपूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचे असल्याने या मुद्यांवर राज्य माहिती आयोग कोणतेही अभिप्राय देऊ इच्छित नाही. मात्र या विलंबाची शिक्षण

संचालकांनी त्यांच्या स्तरावर चौकशी करुन आवश्यक त्या उपाययोजना त्यांच्या कार्यालयात कार्यान्वित केल्यास अशा प्रकारच्या तक्रारींना यापुढे वाव राहणार नाही व त्यांच्या कार्यालयीन कारभारामध्ये पुरेशी पारदर्शकता येऊ शकेल, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर किसनराव जोशी, साईनगर, कोपरगाव, जि. अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५०

निर्णय दिनांक : ०४-०४-२००८

१ श्री. भगिरथ सुगनचंद गोयनका, : अपीलार्थी
मु.पो.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर
जि. जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कुऱ्हा,
ता. मुक्ताईनगर जि.जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुक्ताईनगर,
जि. जळगाव

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. भगिरथ सुगनचंद गोयनका (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास

अधिकारी,ग्राम पंचायत, कुऱ्हा ता. मुक्ताईनगर श्री.सुनिल देवचंद दांडगे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) , तर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर जि.जळगाव श्री. सुनिल वामनराव आहिरे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २१.१.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे घ.नं.४९२ च्या सेस, दिवाबत्ती व घरपट्टी टॅक्स बाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मौजे कुऱ्हा येथील ग्रा.घ.नं. ४९२ ला जुना सेस दिवाबत्ती टॅक्स ३०/ रु. होता. दि. ३०.५.२००० ला सदरचा टॅक्स ७८०/- रु. केला तसेच जुनी घरपट्टी १५०/- रु. वरुन ५००/- रु. आकारणी कोणत्या नियमाने व कायदयाने केली व ती करण्याचा कायदयाचा कोणता आधार लावला ते सविस्तर कळविणे."

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. या पत्राबरोबर त्यांनी ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या नकला १९९५-९६ ते २००५-०६ चे नं. ८ चे उतारे व घरपट्टी, जनरल सेस व दिवाबत्ती संबंधी कर आकारणी दर्शविणाऱ्या माहितीचा तक्ता इ.माहिती सोबत जोडली होती. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. १८.३.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.४.२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय नोंदवून ठेवला अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे दि. ७.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये

दिलेली माहिती अपूर्ण आहे. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांनी ती मिळण्यासाठी अर्ज दिल्या नंतर २-३ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती द्यावी. कोणत्याही अपिल अर्जावर निर्णय कसा असू नये, याचा जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला हा निर्णय म्हणजे उत्तम नमुना ठरेल, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.९.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलाची मुंबई कार्यालयात दि. १५.९.२००६ रोजी नोंद झाली आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांनी केलेल्या टॅक्सेस मधील वाढ समान आधाराने का केली नाही, याची माहिती मागितल्याचे नमुद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर कोणताही निर्णय न घेतल्यामुळे त्यांना न्याय मिळावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, कुऱ्हा ग्राम पंचायतीने त्यांचे हद्दीमधील सर्व घरांना सन १९९५ - १९९६ ते १९९८-१९९९ या कालावधीमध्ये जनरल सेस पाचपट वाढविला, दिवाबत्ती कर दहापट वाढविला व १९९९ मध्ये घरपट्टी १५०/- रुपयांवरुन ५००/-रु. अशी वाढविली. सदर वाढ ग्रामपंचायतीने कोणत्या नियमाच्या आधारे केली, याची त्यांना सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित आहे. याच वेळी काही लोकांची घरपट्टी ग्रामपंचायतीने कमी केल्याचे त्यांना आढळून आल्याने सदर व्यक्तींची घरपट्टी कमी का केली याची कारणे जाणून घ्यावयाची आहेत.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दि.७.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेल्या माहिती मध्ये

ग्रामपंचायतीच्या सदर दरवाढ करण्याच्या ठरावाच्या प्रती जोडल्या आहेत. त्यांचेकडे जेवढी माहिती उपलब्ध होती ती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, १९९९ च्या ग्राम विकास विभागाच्या निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक ग्राम पंचायतीला उत्पन्नाच्या बाबीमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. कुऱ्हा ग्रामपंचायतीने घरपट्टी आकारणीमध्ये मोठया प्रमाणात वाढ केल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणात असे स्पष्ट होते की, दि. २१.१.२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ७.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविलेली माहिती चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांना कोणत्या मुद्यावर माहिती हवी आहे, याचा त्यांच्या अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेला नियम व कायदा न कळविता, ग्रामपंचायतीने घरपट्टी वाढविण्याचे संदर्भात केलेल्या ठरावाच्या प्रती पुरविल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर निकाल देतांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाचा विचार केल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती काही प्रमाणात चुकीची जरी असली तरी अपिलार्थीस कायदा व निर्णयाची प्रत न देण्यामागे त्यांचा कोणताही असद्हेतू असावा असे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. अपिलार्थी यांना माहिती देण्याकरिता त्यांची वैचारिक क्षमता अपूरी ठरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस निर्णय व कायद्याच्या प्रती दिल्या नसाव्यात, असे दिसून येते. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीस चुकीची माहिती देऊन त्यांनी स्पष्ट केलेल्या

त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, या ताकीदीची नोंद गट विकास अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देतील, याची दक्षता गट विकास अधिकारी यांनी घ्यावी. या प्रकरणी अपिलार्थीचे कुऱ्हा गावातील असमान दर वाढीबाबत जे म्हणणे आहे, त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी जातीने तपासणी करुन कुऱ्हा, ग्राम पंचायतीने १९९५ पासून केलेल्या दरवाढी योग्य आहेत किंवा कसे व तसेच या ग्रामपंचायतीने केलेल्या असमान आकारणीबाबत सखोल चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही पुढे करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे,

## निर्णय

१) अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी कुऱ्हा ग्रामपंचायतीने केलेल्या असमान घरपट्टीबाबतच्या प्रकरणाची त्वरित चौकशी करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भगिरथ सुगनचंद गोयनका,मु.पो.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर जि. जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कुऱ्हा,ता. मुक्ताईनगर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, ता. मुक्ताईनगर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४६

निर्णय दिनांक ०५-०४-२००८

१ श्री. अनिल बालकिसन मणियार, : अपिलार्थी

रा. १६ अ, शारदा कॉलनी, महाबळ एरिया,

जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उप परिवहन आयुक्त (अंमलबजावणी-१)
परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सह परिवहन आयुक्त, (म.राज्य)
परिवहन आयुक्त कार्यालय,
वांद्रे (पूर्व),मुंबई-५१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अनिल बालकिसन मणियार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुकत (अंमलबजावणी-१) परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ श्री. अरुण नारायण भालचंद्र (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सह परिवहन आयुक्त (म.राज्य) परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे

(पूर्व) मुंबई-५१ श्री. सतीश बाळकृष्ण सहस्त्रबुध्दे  (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५.०६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, सन २००० ते २००६ या कालावधीतील त्यांचे कार्यालयाशी संबंधित खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " विषय क्र.१- उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव या कार्यालयात प्रवेश करतांना नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद केल्या शिवाय प्रवेश करु नये अन्यथा कायदेशिर कारवाई करण्यात येईल-- हुकूमावरुन -- या आदेशाची साक्षांकित प्रत माहितीस्तव द्यावी तसेच महाराष्ट्र शासनाच्या ठरावाची प्रत द्यावी.
> विषय क्र. २ - मान्यता प्राप्त एजंट साठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे ज्या व्यक्तिंनी १००५/-रुपयाचा भरणा केलेला असून प्रादेशिक परिवहन कार्यालय नासिक येथे रु.५०००/- चे ओरिजनल राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र सदर कार्यालयाने जमा करुन घेतलेले आहे. तरी आजपर्यंत मान्यता प्राप्त एजंटसाठी भरणा केलेल्या व्यक्तिंना लायसन्स मिळालेले नाही म्हणून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय नासिक यांनी फसवणूक का केली याबाबत खुलासेवार व कायदेशिर माहिती द्यावी.
> विषय क्र.३ - सदर कार्यालयानी फसवणूक केल्या प्रकरणी फसवणूकीचा गुन्हा का दाखल करु नये ? याबाबत माहिती द्यावी. "

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०५.०७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रु. ४६/- अधिक टपालखर्च रु.४०/- असे एकूण रु.८६/- इतक्या रकमेचा भरणा त्यांचे कार्यालयात करण्याचे सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनांप्रमाणे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात न भरता अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दिनांक ११.७.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दि. २.८.२००६ रोजी सुनावणी घेऊन या प्रकरणात आपले

आदेश दि १७.८.२००६ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी, अपिलार्थी यांनी, अपिलार्थींना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रु. ८६/- जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात न भरल्याने अपिलार्थीचे सदर अपिल फेटाळून लावले. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील ८.८.२००६ रोजी स्मरणपत्रान्वये आवश्यक ते शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे स्मरण करुन दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येत आहे. तदनंतर अपिलार्थीने दि. १२.९.२००६ रोजी रु. ८६/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दि. १२.९.२००६ रोजी आवश्यक ती माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने व्यथित झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम मधील १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१०.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कार्यालयीन पध्दतीबद्दल आक्षेप घेतले आहेत. तसेच त्यांनी असे म्हटले आहे की, मान्यताप्राप्त एजंटसाठी भरणा केलेल्या व्यक्तींच्या संख्येवर निर्बंध असतांनाही या निर्बंधाचा उल्लेख जाहीरात देतांना, त्यांच्या जाहिरातीत केला नाही व सुशिक्षित बेरोजगारांची त्यांनी फसवणूक केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला आहे की, जळगाव येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद केल्याशिवाय प्रवेश करु नये अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, या आदेशाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या परिपत्रकाची साक्षांकित प्रत हवी होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून सदर प्रत प्राप्त झाली नाही. तसेच त्यांनी त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना शासनाकडून अथवा त्यांचे वरिष्ठांकडून अशा प्रकारचे फलक लावण्याचे कोणतेही आदेश प्राप्त झाले नव्हते. तथापि सदर फलक लावण्याचा निर्णय उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव यांनी सदर आदेश त्यांचे कार्यालयाच्या सोईसाठी व त्यांचे तत्कालीन प्रशासकीय सोईसाठी म्हणून लावला होता. सदर फलक लावण्याचा निर्णय नरेंद्रकुमार नाशिने विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर घेतला होता. सदर निर्णय पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र. २ बाबत स्पष्टीकरण करतांना त्यांनी असे सांगितले की, मान्यताप्राप्त अर्ज करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येवर प्रती कार्यालय ५ असे निर्बंध शासनातर्फे घातले गेल्याने त्यांनी मान्यताप्राप्त अर्ज भरणाऱ्या व्यक्ती या पदासाठी ५ अर्जदारांनाच पात्र ठरविले. या पदासाठी अर्ज करणाऱ्या इतर अर्जदारांकडून रु. १००५/- प्रोसेसींग फी म्हणून घेतले आहेत. व त्यांचेकडून अनामत रक्कम म्हणून घेण्यात आलेले रु. ५०००/- इतक्या रकमेचे नॅशनल सेव्हींग सर्टीफिकेट त्यांना परत करण्यात आले. परिवहन आयुक्त कार्यालयातर्फे कोणत्याही अर्जदाराची फसवणूक करण्यात आली नाही.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजुनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, असे दिसून येते की, परिवहन खात्याने मोटार वाहन विभागातील कामकाजासंदर्भात सामान्य जनतेला परवाने, अनुज्ञप्ती इ. साठी आवश्यक असलेल्या अर्जाचा नमुना भरण्यास काही अडचणी असल्यास त्यांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने व अनधिकृत व्यक्तीकडून त्यांची लुबाडणूक होऊ नये, या दृष्टीने मान्यताप्राप्त अर्ज भरणाऱ्या व्यक्ती म्हणून काही व्यक्तिंच्या नेमणूका करण्याचे ठरविले होते. सदर नेमणूका करण्यासाठी त्यांनी वर्तमानपत्रातून जाहीरातीद्वारे अर्ज मागविले होते. अपिलार्थी हे अशा अर्जदारापैकी एक आहेत. अर्ज करतांना सुरवातीला परिवहन खात्याने त्यांच्याकडून रु.१००५/- रुपये इतकी प्रोसेसींग फी व रु.५०००/- इतक्या रकमेचे नॅशनल सेव्हींग सर्टीफिकेट अनामन रकमेपोटी घेतले होते.या योजनेस सुशिक्षित बेरोजगारांकडून प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला, तथापि सदर

पदांची संख्या मर्यादित असल्याने या योजनेस पात्र न झालेल्या अर्जदारांची संख्या प्रचंड प्रमाणात उरली. अपिलार्थी हे त्यापैकी एक असून अपिलार्थीस त्यांची अनामत रक्कम रु.५०००/- परिवहन खात्याकडून परत घेण्यास बरेच प्रयास पडले. यासाठी पाठपुरावा करतांना त्यांना अनेक अर्ज व निवेदने करावी लागली. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचेकडील दि.५.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करतांना देखिल संबंधित प्राधिकरणाकडून खुलासा अपेक्षित केल्याचे दिसून येते तसेच भारत देशात प्रत्येक आर.टी.ओ. कार्यालयात प्रवेश नोंद पुस्तिका कोण कोणत्या कार्यालयात ठेवलेल्या आहेत याबाबतची माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे. तथापि या माहितीची मागणी त्यांनी आपले मूळ माहितीच्या अर्जामध्ये केली नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सविस्तर उत्तर न देता अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नावर नागपूर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत जोडली आहे.यामध्ये या निकालपत्रामध्ये केवळ प्रशासकीय बाब म्हणून (जन माहिती अधिकारी यांनी, ज्या पध्दतीचे फलक त्यांचे कार्यालयात लावले आहेत) असे फलक लावणे बरोबर आहे, असा निकाल दिला होता. अपिलार्थींच्या या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही बाब प्रशासकीय स्वरुपाची व कार्यालयाच्या सोयीची असल्याने कार्यालय प्रमुख म्हणून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे कळविले असते तर ते अधिक योग्य झाले असते. त्यांनी अपिलार्थीस नागपूर उच्च न्यायालयाच्या निकालपत्राची अनावश्यक प्रत देऊन त्यांना नाहक भुर्दंड पाडला, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थींनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षित केल्याचे दिसून येत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च)मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली आहे. ती खालीलप्रमाणे आहेः-

" 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना,प्रसिध्दीपत्रके, आदेश,रोजवहया, संविदा, अहवाल,कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती "

वरील व्याख्येचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कोणत्याही प्रशासकीय निर्णयाचे समर्थन अथवा खुलासा अपिलार्थीस वेगळा देण्याची तरतुद नाही, हे पाहता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ व ३ हा अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.९.२००६ रोजी मुद्दा क्र. १ वगळता काहीशी योग्य माहिती दिली असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी येथून पुढे त्यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जावर अर्जदाराना सरळ माहिती पुरवावी, तसेच सविस्तर माहिती पुरवितांना अनावश्यक कागदपत्रे अर्जदारांना देऊ नयेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल बालकिसन मणियार, रा. १६ अ, शारदा कॉलनी, महाबळ एरिया, जळगाव.

२. जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त (अंमलबजावणी-१) परिवहन आयुक्त कार्यालय,प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह परिवहन आयुक्त (महाराष्ट्र राज्य) परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४७

निर्णय दिनांक ०५-०४-२००८

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे, : अपिलार्थी
'जय योगेश्वर' शिवाजी नगर नं.२ वागदर्डी रोड
मनमाड ता. नांदगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,मनमाड
ता.नांदगाव जि. नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (रोहयो),
मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत शंकरराव कवडे, जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम मनमाड उपविभाग ता.नांदगाव जि.नाशिक श्री. अनिल उत्तमराव निकम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (रोहयो) मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक श्री. शरद नागनाथ राजभोज (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दिनांक ०३.०२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. १.१.२००५ ते ३१.१२.२००५ या कालावधीतील, त्यांचे कार्यालयाशी संबंधित खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ माहिती चा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ४) मधिल पोटकलम (१) मधिल (क) (ख) मधिल एक ते सतरा (ग) (घ) कलम ४) मधिल पोटकलम (२) प्रमाणे कलम ४) मधिल पोटकलम (३) प्रमाणे कलम ४) मधिल पोटकलम (४) प्रमाणे वरील सर्व कलमांचे अवलोकन करुनआपन आपल्या कार्यालयात शासनाने दिलेल्या विहीत नमुन्यात माहीती ठेवली आहे का? पोटकलम ३) व ४) प्रमाणे कोणत्या माध्यमाने माहिती प्रसारीत केली आपन ठेवलेल्या माहिती मधुन,कलम ४)(१)(ख)(दोन)ची माहिती विहित नमुन्यात,कलम ४) (१)(ख)(तीन) ची माहिती विहित नमुन्यात, तसेच कलम ४) (१) (ख)(अकरा) प्रमाणे वरील दिलेल्या कालावधीमधील माहीतीची नक्कल झेरॉक्स करुन साक्षांकित करुन. ”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, असे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ४.४.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.५.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु अपिलार्थी हजर न झाल्याने सदर सुनावणी होऊ शकली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दि.

१५.५.२००६ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याच्या सूचना दिल्या. तदनिंतर अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित झाल्यानंतर दि. ३०.५.२००६ रोजी उपविभागाकडून प्राप्त झालेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली. सदर माहिती अर्धवट असल्याचे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणल्यानंतर दि. १.९.२००६ रोजी उपविभागीय अभियंता कार्यालयाकडून अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यात आली, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दोन टप्प्यात दि. ३०.५.२००६ व १.९.२००६ रोजी देण्यात आलेली आहे. मध्यंतरीच्या कालावधीत अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या दि. ३०.५.२००६ रोजीच्या माहितीने व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी  झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला आहे की. त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अंतिमतः दि. १.९.२००६ रोजी प्राप्त झाली असून त्याबद्दल त्यांचे काहीही म्हणणे नाही तथापि सदर माहिती त्यांना उशिरा प्राप्त झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती, त्यावेळी त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे फारसे ज्ञान नव्हते. तसेच सदर माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांना त्यांचे कार्यालयातील इतर सहकाऱ्यांचे सहाय्य घेणे क्रमप्राप्त होते, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते  त्यांचे सहाय्यकांवर अवलंबून होते. त्यांना जेवढी माहिती तयार करुन देता येणे

शक्य होते तेवढी माहिती त्यांनी दि. ३०.५.२००६ रोजी तयार करुन दिली. तदनिंतर त्यांची तेथून बदली झाल्याने या प्रकरणातील पुढील कार्यवाही काय झाली हे त्यांना माहित नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जुने जन माहिती अधिकारी बदलल्यानंतर अपिलार्थीने नवीन जन माहिती अधिकारी यांचेकडे वेगळा अर्ज केला. त्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली व सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी अपिलार्थी यांचेकडून आवश्यक ती पोच घेतली आहे.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजुनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ३.२.२००६ रोजी मागितलेली माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीस दि. २.३.२००६ रोजी प्राप्त होणे आवश्यक होते, तथापि जन माहिती अधिकारी त्यांना दि. ३०.५.२००६ पर्यन्त माहिती देऊ शकले नाहीत. दि. ३०.५.२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीतील त्रूटी लक्षात आणून दिल्यानंतर, त्यानुसार त्यांनी अपिलार्थीस दि. १.९.२००६ रोजी संपूर्णतः माहिती दिली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा दि. १५.६.२००५ पासून अंमलात आला असून अधिनियमातील कलम ४ प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना त्यानंतर १२० दिवसांची मुदत यामध्ये दिलेली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतरच्या कालावधीतील आहे, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती ३० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे येथे बंधनकारक होते. तथापि अधिनियमामध्ये नमुद केलेल्या कालावधीत अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना न पुरवून या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबाबतचे सादर केलेले स्पष्टीकरण, आयोगास मान्य नाही. अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी

यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक/कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतुद आहे.त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यास संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक सारखेच जबाबदार ठरत आहेत. आपल्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी या कामी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे कार्यालयातील संबंधित सहाय्यक/कर्मचारी यांचेवर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक विभाग यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस दि. १.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी व त्यांचे सहायक यांचेवर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक विभाग यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनिंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०५-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हेमंत शंकरराव कवडे 'जय योगेश्वर' शिवाजी नगर नं.२ वागदर्डी रोड मनमाड ता. नांदगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मनमाड ता.नांदगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (रोहयो), मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक, बांधकाम भवन, त्रिंबक रोड, नाशिक-पिन कोड क्र. ४२२ ००२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५३

निर्णय दिनांक ०८-०४-२००८

श्री. शेख नसीर बेगाजी, : अपिलार्थी
३३, सावली सोसायटी, गुलमोहोर रोड,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम
उपविभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम
दक्षिण विभाग, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उप अभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख नसीर बेगाजी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्री. राजेंद्र नारायण लोखंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्री. अनिल गणपतराव लाटणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग श्री. व्ही. बी. भाले हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामा-संदर्भात ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " सर्व कामाची व खर्चाची यादी, कामाचे नांव, खर्च, एजन्सीचे नाव, काम पूर्ण झाल्याची तारीख, बील अदा केल्याची तारीख, वर्क ऑर्डर नंबर तसेच देयक नोंदवहीची झेरॉक्स. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ चा पोटकलम (ङ) आणि ४-टी प्रमाणे माहिती देता येत नसल्याचे कळविले. सदर माहितीस नकार देतांना, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीमध्ये खाजगी व्यक्ती व ठेकेदारांची नांवे व पत्ते मागविल्यामुळे त्यांच्या खाजगीपणाचे विनाकारण

उल्लंघन होणार असल्याचे कारण देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदर अपील अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे केला होता. तथापि कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये उप अभियंता जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांच्याकडेच परत पाठविला.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये, म्हणजेच अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर, अपिलार्थीस सुनावणीसाठी व चर्चेसाठी दिनांक १०-११-२००६ रोजी त्यांच्याकडे बोलाविले. अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये उप अभियंता यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे त्यांना त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील कागदपत्रे दाखविण्यात येतील.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय

अधिकारी यांनी जाणुन बुजून माहिती नाकारल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००६ रोजी माहिती दाखविली व सदर माहिती पाहून अपिलार्थीचे समाधान झाले. त्यांच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी उपविभागाचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक ०२-११-२००६ रोजीचे पत्र दाखविले. त्या पत्रामध्ये अपिलार्थीने सदर माहिती समक्ष पाहण्यासाठी मिळाली असे अभिप्राय देऊन त्याखाली आपली सही केली आहे. सदर सहीखाली तारीख नाही त्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या तारखेस माहिती पाहण्यासाठी उपलब्ध झाली हे कळण्यास मार्ग नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक १०-११-२००६ रोजी बोलाविले होते त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस समक्ष माहिती दाखविली. ती माहिती पाहून अपिलार्थीचे समाधान झाले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी सार्वजनिक प्राधिकरणाचे सदर कर्मचारी माहितीचा अधिकाराच्या अधिनियमा-तील तरतुदीची कशा प्रकारे पायमल्ली करतात हे स्पष्ट होते. जन माहिती

अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या नेमणुकीचे आदेश आयोगाने मागितले असता ते सदर आदेश आयोगास सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने उपविभागीय स्तरावरची माहिती मागविली असल्याने प्रत्यक्षः उप अभियंता हे जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता हे अपिलीय अधिकारी या प्रकरणी असावयास हवे होते. तथापि मुळात या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण हे उपस्थित अधिका-यांना आयोगास स्पष्टपणे सांगता आले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी या प्रकरणी वैयक्तीक लक्ष घालून त्यांच्याकडील बांधकाम विभागाच्या कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका त्वरेने कराव्यात व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास १५ दिवसाच्या आत पाठवावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना दिनांक ०१-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णतः नकारात्मक प्रतिसाद दिला. अपिलार्थीस माहिती देतांना त्यांनी अधिनियमातील कलम ८ मधील पोटकलम ड आणि ४ टी चा आधार घेऊन सदर माहिती नाकारल्याचे म्हटले आहे. तथापि या उपक्रमांकाची कोणतीही कलमे अधिनियमामध्ये मुळात आस्तित्वात नाही असे दिसून येते. तसेच अपिलार्थीय लिहिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती लोकहिताच्या दृष्टीने समथनीय नाही असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे सर्वतया अयोग्य आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये ठेकेदारांची नांवे व पत्ते मागितले होते. ठेकेदारांची नोंदणी करण्याचे व त्यांना काम करण्याचे परवाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिले जातात. अशा नोंदणीकृत ठेकेदाराची नांवे व पत्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या mahapwd.com या

वेबसाईटवरही उपलब्ध आहेत. ठेकेदारांना नोंदणी प्रमाणपत्र देतांना त्याच्या प्रती सर्व मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांना पाठविल्या जातात. या प्रमाणपत्रामध्ये ठेकेदाराचे नाव व पत्ता उपलब्ध असतो त्यामुळे ही माहिती खाजगी व गोपनीय स्वरुपाची राहत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याचे कारण म्हणून जे समर्थन आपल्या दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या पत्रामध्ये केले आहे ते सर्वथा अयोग्य ठरते. किंबहुना अपिलार्थीस माहिती न देण्याकरिता त्यांनी हे कारण मुद्दाम शोधून काढले असे वाटण्यास येथे भरपूर वाव असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहितीसाठी नकार देतांना जन माहिती अधिका-याने ज्या कलमांचा उल्लेख केला आहे ती कलमेच मूळी आस्तित्वात नाहीत. त्यामुळे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेले दिनांक ३१-०८-२००६ चे पत्र पूर्णतः निराधार ठरते. जन माहिती अधिकारी म्हणून उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी हे पत्र लिहिले आहे. अर्थात या पत्रावर माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या पदाचा उल्लेख नाही. उप अभियंता यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले होते. कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांनी ज्यांच्या आदेशाविरुध्द केला होता त्यांच्याकडेच परत पाठवून दिला. ही कार्यकारी अभियंता यांची कृती तर संबंधीत प्राधिकरणाच्या संवेदना किती बोथट झाल्या आहेत याचे ज्वलंत उदाहरण आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. कार्यकारी अभियंता यांनी या प्रकरणी सदर अपील अर्ज उप अभियंता यांच्याकडे पाठवितांना आपल्या कोणत्याही प्रकारच्या विचारशक्तीचा वापर केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक १०-११-२००६ रोजी दाखविली असे त्यांचे म्हणणे केवळ वादाप्रीत्यर्थ जरी सत्य धरले तरी अपिलार्थीस जी माहिती

दिनांक ०१-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना प्रत्यक्ष मिळणे अपेक्षित होते तीच माहिती त्यांना दिनांक १०-११-२००६ रोजी प्रत्यक्षात पाहण्यासाठी मिळाली. (अपिलार्थीस येथे माहिती दिली नाही) सदर माहिती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ७० दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. मूळात अपिलार्थीने माहिती मागितली असता ती फक्त अपिलार्थीस दाखविण्याचे नेमके प्रयोजन काय असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता आयोगाच्या या प्रश्नावर ते काहीही उत्तर देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांची ही कृती, अपिलार्थीने मागितलेली सदर माहिती खरोखरच तयार होती किंवा कसे याबद्दल आयोगाच्या मनात संदेह निर्माण करत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचे विहित कालावधीत सदर अपिलावर निर्णय देण्यसाठीचे पालन केले नाही व त्यायोगे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला आहे. हे सर्व पाहता जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सर्व सहाय्यक ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजले जाते, हे त्यांच्या वरील कृतीव्दारे अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीस पात्र झाले आहेत असे आयोगाचे मत झाले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व सहकारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ७० दिवसाच्या विलंबाप्रीत्यर्थ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये

प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (७० दिवसासाठी) एकूण रुपये १७५०० /- (अक्षरी- रुपये सतरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यात पुढील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात करावा.

लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीची विभागणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. संबंधीत कार्यालयासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन आपला अंतीम अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांनी अपिलार्थी हे सदर शास्तीचा भरणा मे २००८ पासून शासकीय कोषागारात सुरु करतील असे पहावे. व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल दरमहा नियमीतपणे मे २००८ पासून आयोगास सदर शास्तीची रक्कमेचा भरणा पूर्ण होइपर्यत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत येत आहे.

# आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या ७० दिवसाच्या विलंबाप्रीत्यर्थ प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे ७० दिवसासाठी एकूण रुपये १७५०० /- (अक्षरी- रुपये सतरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्याचा भरणा त्यांनी निकालपत्रात केलेल्या विवेचनाप्रमाणे करावा.

४. संबंधीत कार्यालयासाठी विविध पातळीवरील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन आपला अंतीम अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा.

५. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे सदर शास्तीचा भरणा मे २००८ पासून शासकीय कोषागारात नियमितपणे करतील असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास दरमहा नियमीतपणे सदर शास्तीच्या रक्कमेचा भरणा पूर्ण होइपर्यत मे २००८ पासून पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ०८-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख नसीर बेगाजी, ३३, सावली सोसायटी, गुलमोहोर रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५४

निर्णय दिनांक ०८-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. राकेश पंडित सोमवंशी,<br>१९, विरल विहार, खोडाइ माता रोड,<br>नंदुरबार | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी,<br>तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,<br>जिल्हा नंदुरबार | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राकेश पंडित सोमवंशी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी, तालुका अक्कलकुवा श्री. रविंद्रसिंग भगतसिंग परदेशी (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामा-संदर्भात २००५ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ पुढील कामांची माहिती, बजेटची कामे, आमदार निधीची कामे, खासदार निधीची कामे, विशेष निधीची कामे (सी. एम. फंड) एस. आर. प्रोग्रामची कामे, सी. आर. प्रोग्रामची कामे, डीपॉजीट वर्कची कामे, केंद्रीय मार्ग निधीची कामे (सी. आर. एफ.) प्रत्येक ठेकेदाराचे, एजन्सीचे नाव, प्रत्येक कामाच्या मोजणीपुस्तकातील ठराविक पानांच्या प्रति अथवा नोंदी / निविदाच्या प्रति, वर्क ऑर्डरच्या प्रती वरील ठराविक लेखाशिर्षातंर्गत आपल्या कार्यालयातर्फे (अ) खडीकरण डांबरीकरण एकूण ९ कामे (ब) लहान पूल एकूण ४ कामे (क) मोठे पूल एकूण ५ कामे (ड) संरक्षक भिंत एकूण २ कामे (इ) कॉजवे एकूण ७ कामे (अ) लादी मो-या एकूण कामे (ब) मो-या एकूण ३ कामे (क) फरशी एकूण ६ कामे (ड) रस्ता विस्तार एकूण ३ कामे (इ) रस्ता ३ कामे (अ) पूर हानीची ४ कामे (ब) खड्डे भरण्याची २ कामे.
>
> डांबर प्लान्टवरील माहिती :- डांबराचे चलन, लोड रजिस्टर, तापमान रजिस्टर, ॲशपाल्ट रजिस्टर, कंझम्पशन रजिस्टर खपा नोंदी.
>
> प्रत्यक्ष कामावरील माहिती :- लोड रजिस्टर, आर. एम. आर. रजिस्टर (रोड मेटल रिर्टन रजिस्टर) क्रस्ट थिकनेस रजिस्टर, ॲसपाल्ट जिस्टर,

डांबराचे तापमान रजिस्टर, रोलर पासेस रजिस्टर, जर खाजगी बाजारातील डांबर असेल तर त्याचे गुणनियंत्रण मंडळाचे टेस्ट झल्ट (शासकीय चाचणी अहवाल) झेरॉक्स, ज्या डांबर प्लान्टवरुन डांबर लोड वाहतूक केली त्या लोडच्या वजन काट्याच्या मूळ पावत्यांची झेरॉक्स, डांबराच्या बाउझरचा क्रमांक त्यासोबत असणा-या कंपनीच्या चलनाच्या प्रती.

पुलांच्या कामातील माहिती :- सिमेंट रजिस्टर, मेटल रजिस्टर (आर. एम. आर. नोंदी), स्टिल रजिस्टर, सिल्ट कन्टेन रजिस्टर (वाळू नोंद) प्रत्येक कामाचे मोजणी पुस्तक (एम. बी.)

संरक्षक भिंतीच्या कामाची माहिती :- अ) बांधकामात वापरलेल्या सिमेंटचे प्रमाण एकूण (सिमेंट रजिस्टर)

कॉजवे, लादी मो-या, मो-या, फरशी :- या कामांमध्ये वापरलेले सीसीएम प्रमाण, वाळूचे प्रमाण.

खडीकरणाच्या कामातील माहिती :- रोलर पासेस रजिस्टर, खडी आणि मुरुम यांच्या लेयरच्या नोंदी, पाणी मारल्याच्या नोंदी नियमानुसार वापरात घेतलेल्या इतर मानांकाच्या नोंदी. ”

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळवून त्यासाठी १५ दिवसाची मुदत अपिलार्थीकडे मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ मध्ये निर्देशीत केलेल्या कालावधीपूर्वी केला असल्यामुळे निकाली काढला व तसे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

यावर व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २५-०८-२००६ रोजी रुपये २५० प्रतिदिनी याप्रमाणे एकूण ७३ दिवसांकरिता १८२५० रुपये इतकी शास्ती ठोठावली आहे. परंतु त्यांना माहिती मिळण्यास विलंब झाल्याने या दिरंगाई विरोधात राज्य माहिती आयेगकडे अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून त्यांनी कोणत्याही विशिष्ट कामाचा त्यामध्ये उल्लेख केलेला नाही त्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने निश्चित कामाची मागणी केल्यास त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविता येईल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये १८२५० इतकी शास्ती लावल्याचे म्हटले आहे. तथापि सदर आदेश

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या संदर्भात आहे. आज रोजी अपिलार्थीचा दिनांक २६-०६-२००६ रोजीचा अर्ज विचाराधीन आहे. त्यामुळे अपिलार्थीने व्दितीय अपील अर्ज करतांना ज्या प्रपत्र "अ" ची प्रत जोडली आहे ते या सुनावणीसाठी लागू होत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे दिनांक ११-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. सदर अपील अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपुर्वी केले असल्याने त्यांनी ते निकाली काढले व तसे अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोनही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपिलातील मूळ अर्ज दिनांक २६-०६-२००६ रोजीचा असून अपिलार्थीने आयोगाकडे अपील अर्ज करतांना संदर्भ मात्र त्यांच्या दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाचा केला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थीने त्यांना कोणत्या कामासंदर्भात माहिती हवी आहे याचा उल्लेख त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत दाखल केलेली चुकीची कागदपत्रे, सुनावणीसाठी अपिलार्थीची अनुपस्थिती व माहितीचे स्वरुप अपिलार्थीस निश्चितपणे माहिती नसणे या गोष्टी पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस निश्चितपणे ज्या कामाची माहिती हवी आहे त्या कामांचा तपशिल कळवून त्यांनी तशा प्रकारची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यास जन माहिती अधिकारी यांनी तशा प्रकारची माहिती देण्याची तयारी देखील दर्शविली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद

पाहता व वरील वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठ्या प्रमाणात असून त्यांनी संबंधीत उपविभागातील जवळ जवळ सर्व कामाच्या संदर्भातील सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागविल्याचे दिसते. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडे काही विशिष्ट कामाची मागणी केल्यास त्यांना सदर माहिती त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०८-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राकेश पंडित सोमवंशी, १९, विरल विहार, खोडाइ माता रोड, नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/८३

निर्णय दिनांक : ०८-०४-२००८

१ श्री. परवीज अहेमद अब्दुल रऊफ सिध्दीकी, : तक्रारदार
नाळवंडी रोड, सबना मीरा सॉ मील, बीड
ता.जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा ग्राम विकास अधिकारी,
ता.जि.बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. परवीज अहेमद अब्दुल रऊफ सिध्दीकी, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी श्री. रामभाऊ गणपतराव वाघुले ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाने त्यांच्या दि. २.८.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती दिली नाही. तसेच राज्य माहिती आयोगाने उत्तरवादी यांनी तक्रारदाराचा अर्ज न स्वीकारण्याचे कारण शोधून संबंधितांविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना दिले होते. तथापि राज्य माहिती आयोगाने आदेश देऊनही

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून काहीही कार्यवाही झाली नाही, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तक्रारदार यांच्या तक्रारीवर उत्तरवादी यांचेतर्फे असा खुलासा करण्यात आला की, आयोगाच्या दि. २.८.२००७ रोजीच्या आदेशाचे त्यांनी पालन केले असून त्यांनी तक्रादारास दि. ६.८.२००७ रोजी विनामूल्य माहिती दिली आहे. तसेच राज्य माहिती आयोगाने आदेशित केल्या प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी गट विकास अधिकारी यांना त्यांचेकडील दि. ३.९.२००७ रोजीच्या आदेशानुसार या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी चौकशी करुन तत्कालीन ग्राम विकास अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविला.

उत्तरवादी यांनी केलेला युक्तीवाद, त्यांनी तक्रारदारास माहिती दिली आहे, या मुद्यापुरता स्वीकृत करण्यात येत आहे, तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज का स्वीकारला नाही याची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पातळीवर होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. उत्तरवादी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये गट विकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज स्वीकृत केला किंवा कसे, न केल्यास त्याची काय कारणे होती, यावर कोणतेही भाष्य नाही, यावरुन सदर अहवाल आयोगाने दिलेल्या आदेशाच्या अनुपालनाच्या दृष्टीने अपूर्ण आहे, असे दिसून येत आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी सादर केलेला सदर अहवालासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांनी या प्रकरणात त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिपत्त्याखालील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर याची एक महिन्याचे आत फेरचौकशी करुन स्वतः निर्णय घ्यावा व या संदर्भातील आपला अहवाल हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत आयोगास पाठवावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी सादर केलेला सदर अहवालाची मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिपत्त्याखालील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर एक महिन्याचे आत फेरचौकशी करावी व या संदर्भातील अहवाल त्यानंतर एक महिन्याचे आत आयोगास पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परवीज अहेमद अब्दुल रऊफ सिध्दीकी,नाळवंडी रोड, सबना मीरा सॉ मी, बीड ता.जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, नाळवंडी जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५५

निर्णय दिनांक ०९-०४-२००८

श्री. अच्युत जनार्दन इनामदार, : अपिलार्थी
जुने सीबीएस जवळ, पोलीस मुख्यालय,
मोटार परिवहन विभाग, नाशिक शहर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, मुंबई

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप सहाय्यक (गुन्हे) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप महानिरिक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अच्युत जनार्दन इनामदार व जन

अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप महानिरिक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक कार्यालय हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक (गुन्हे) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य श्री. सदाशिव ज्ञानेश्वर सहस्त्रबुध्दे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपर पोलीस महासंचालक रागु/अवि म. रा. पुणे यांच्या चौकशी अहवालाबाबत झालेल्या कार्यवाही व आदेशाच्या प्रती मिळण्याबाबत दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " पोअधी/राग/अवि/नाशिक/चौकशी/क्रिरिपि/५०२४/३२१/०६ दिनांक ९-३-२००६ अन्वये मा. अपर पोलीस महासंचालक रागु/अवि म. रा. पुणे यांचे चौकशी अहवालाबाबत झालेल्या कार्यवाही व आदेशाच्या प्रती मिळणेबाबत. "
>
> मा. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशानुसार आता मा. पोलीस महासंचालक कार्यालयाने काय कारवाई केली त्याबाबतच्या आदेशाच्या प्रती मिळण्याबाबत विनंती आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार मी होणा-या खर्चाची रक्कम भरण्यास तयार आहे. "

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्ट / दूरध्वनीव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १९-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०७-२००६ रोजी घेतली असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपले आदेश पारीत केले असून त्यामध्ये अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी फेटाळून लावला आहे. सदर अपील फेटाळतांना या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, " तत्कालीन अपिलीय पोलीस उप महानिरिक्षक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर प्रकरणी आपले म्हणणे ऐकून घेण्यासाठी आपणास दिनांक १९-०७-२००६ रोजी व्यक्तिशः बोलाविले होते. त्याप्रमाणे आपण दिनांक १९-०७-२००६ रोजी त्यांच्यासमोर उपस्थित राहिला होता त्यावेळी आपण अर्जात नमूद केलेल्या गुन्हा अन्वेषन विभागा-कडील चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून सदर अहवाला-नुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याचे आपले निदर्शनास आणून देण्यात आले आहे" असे नमूद केले आहे.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीने माहितीसाठी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी

यांनी काहीही कारवाई केली नाही. या माहितीकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या निर्णया मध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जावर म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यांना बोलाविले होते. जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे पूर्णतः चुकीचे असून अपिलार्थीस दिनांक १९-०७-२००६ रोजी त्यांच्या दिनांक १७-०४-२००६ च्या अर्जावरील सुनावणीसाठी बोलाविले होते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या अर्जास उत्तर द्यावयाचे चुकीने राहून गेले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती म्हणून त्यांनी सदर माहिती संबंधितांकडून मागवून घेतली होती. तथापि संबंधितांकडून त्यांना ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने या प्रकरणी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले होते व अपिलार्थीस दिनांक १९-०७-२००६ रोजी ते अपिलीय अधिकारी यांच्याकडे हजर झाले असता अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात दिनांक २०-०९-२००६ रोजी लेखी अवगत करण्यात आले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, सबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या

अपील अर्जावर निर्णय देतांना त्यांच्या दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्याच दिवशी पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय दिला असे कागदपत्र आयोगास सादर केली आहे. तथापि अपिलार्थी यांच्या मते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ते दिनांक १९-०७-२००६ रोजी दुस-या प्रकरणासंदर्भात हजर झाले होते व त्यांच्या दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या म्हणण्यात तथ्यांश आढळतो. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठी मूळ अर्जामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशनुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने काय कारवाई केली याबाबतच्या आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. पोलीस महासंचालक कार्यालयाने या अर्जासंदर्भात काय कारवाई केली हे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या निर्णयान्वये कळविले आहे. शासनाने या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास चौकशी करण्याचे आदेश पारीत केले आहेत. तथापि या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यायात उपलब्ध नाही. सदर आदेश शासनाने लाचलुचपत विभागाकडे सरळ पाठविले. त्याची प्रत देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास पाठविली गेली नाही. सदर प्रत लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी यांना मिळविता येईल असे त्यांनी आयोगास सांगितले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांची प्राथमिक कर्तव्य जे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मध्ये निर्देशीत केले आहे ते देखील पार पाडले नसल्याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून अपिलार्थीच्या

अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांनी या प्रकरणी दाखविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना अयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक ०९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अच्युत जनार्दन इनामदार, जुने सीबीएस जवळ, पोलीस मुख्यालय, मोटार परिवहन विभाग, नाशिक शहर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक (गुन्हे) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप महानिरिक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५७

निर्णय दिनांक ०९-०४-२००८

श्री. मनोज चंद्रकांत करपे, : अपिलार्थी
सक्कर चौक, तांबटकर चाळ,
स्टेशन रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा संचालक क्रिडा व युवक सेवा
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव क्रिडा मंत्रालय, मुंबई

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सह संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे

जन अपिलीय अधिकारी : संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनोज चंद्रकांत करपे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सह संचालक

क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य श्री. नरेंद्र मनाय सोपल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य श्री. लक्ष्मीकांत देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्केटींग असोशिएशन ऑफ महाराष्ट्रच्या मान्यतेसंदर्भात ०१-०४-२००० ते ०१-०८-२००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. क्रिडा व युवक सेवा संचालनालयाने स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेला कोणत्या वर्षी मान्यता प्रदान केली व ती मान्यता किती वर्षे देण्यात आली.

२. क्रिडा व युवक सेवा संचालनालयाने स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेला मान्यताप्राप्त कालावधीमध्ये प्रती वर्षी किती अनुदान दिले व एकूण किती अनुदान दिले.

३. क्रिडा व युवक सेवा संचालनालयाने स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेची मान्यता कोणत्या कागदपत्रांच्या आधारे रद्द केली, अधिका-याच्या अभिप्रायासह झेरॉक्स प्रत.

४. क्रिडा व युवक सेवा संचालनालयाने स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेची मान्यता रद्द करुन कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दिली व ती कधी दिली त्याची झेरॉक्स.

५. ज्या स्केटिंग संघटनेला मान्यता दिली त्या मान्यता पत्राची एक झेरॉक्स प्रत.

६.  आपण दिलेल्या माहीतीवरुन आमचे समाधान न झाल्यास अपिली अधिकारीचे नाव व पत्ता. ''

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने अपिलार्थीस माहिती देता येणार नाही असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर न मिळाल्याने त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना क्रीडा संचालकाकडून त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात एकही पत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही.  त्यांना फक्त शालेय व

क्रीडा विभागाकडून त्यांचा अर्ज संबंधीत विभागाकडे पाठविला गेला असल्याचे पत्र (दिनांक १६-१०-२००६) मिळाले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन जन माहिती अधिकारी आता सेवानिवृत्त झाले असून अपिलार्थीने ज्या संस्थेसंदर्भात माहिती मागविली आहे त्या संस्थेसंदर्भात एक प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस देणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देणे योग्य वाटले नसावे म्हणून त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नसावी असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ज्यावेळी अपिलार्थीने अपील अर्ज केला त्यावेळी ते जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करता आले असते तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीती कारवाई केली नाही. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय का दिला नाही हे त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या ६ मुद्दयावर माहिती मागविली आहे त्या सर्व मुद्दयासंदर्भातील माहिती ही सरळ व सोपी होती. सदर माहिती देण्याने न्यायालयाचा अवमान होण्यासदृष्य परिस्थिती निर्माण होण्याची सुतरामही शक्यता नव्हती. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याचे मनात आणले असते तर ही माहिती त्यांना अपिलार्थीस एका दिवसातही देता आली असती. तथापि त्यांनी अपिलार्थीस केवळ सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे म्हणून ही माहिती देण्याचे नाकारले ही त्यांची कृती पूर्णतः चुकीची आहे असे आयोगास वाटते. अर्जदारास सर्वसाधारणपणे कोणत्या स्वरुपाची माहिती देता येणार नाही याचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८, ९ व २४ (४) मध्ये विवेचन केले आहे. या तरतुदी पाहिल्या असता त्यातील कोणत्याही तरतुदीस अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविल्यास छेद जात नव्हता. आता संबंधीत जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाले आहे तर संबंधीत जन अपिलीय अधिकारी हे सध्या राज्यसेवेमध्ये कार्यरत नाहीत. अपिलाथीने मागितलेल्या माहितीसंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता सदर माहिती ते अपिलार्थीस तात्काळ देऊ शकतील असे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. संबंधीत जन माहिती अधिकारी आता सेवानिवृत्त झाले असल्याने अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याप्रीत्यर्थ त्यांच्यावर कारवाई बाबत आदेश आयोगास आता देता येणार नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोज चंद्रकांत करपे, सक्कर चौक, तांबटकर चाळ, स्टेशन रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सह संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५८

निर्णय दिनांक ०९-०४-२००८

कु. शेख फरहत मिराबक्ष, : अपिलार्थी
नशेमनव्हिला, वाबळे कॉलनी चौक,
फकीरवाडा, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्य अहमदनगर कॉलेज,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी कु. शेख फरहत मिराबक्ष यांचे प्रतिनिधी श्री. शेख मिराबक्ष (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य अहमदनगर कॉलेज यांचे प्रतिनिधी कनिष्ठ लिपीक श्री. महाजन मिलींद निवृत्ती (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सह संचालक (उच्च शिक्षण) पुणे श्री. नरेंद्र मारोतराव कडू हे हजर आहेत

तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अहमदनगर कॉलेज कडे केलेल्या अर्जासंदर्भात माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " मी एम. ए. II पार्ट मे २००४ बै. क्र. २२८५ Economics of growth & Development या विषयाची अंतर्गत परिक्षा दिली परंतु गुणपत्रिकेवर Micro Economics या विषयास दिले गेले, निकाल जाहीर झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत पुणे विद्यापीठाकडे अ. नगर कॉलेजने काय पाठपुरावा केला याची संपूर्ण माहिती पाहिजे. "

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोठल्याही प्रकारचा

पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना दिली नसून यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी अर्ज करुन सुमारे सव्वा वर्षाहूनही जास्त काळ लोटूनही त्यांना अद्याप मूळ अर्जातील माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने त्यांच्या मुलीचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊन त्यांची अपरिमीत हानी झालेली आहे. त्यामुळे संबंधितावर अधिनियमातील तरतुदी प्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही परंतु अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या मुलीच्या गुणपत्रिकेवर दुरुस्त्या करण्यासंदर्भात विद्यापीठाशी पत्रव्यवहार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी या

अहमदनगर कॉलेजच्या विद्यार्थीनी असून त्या मे २००५ मध्ये एम. ए. भाग-२ या अर्थशास्त्र या विषयाच्या परिक्षेस बसल्या होत्या, या परिक्षेत त्यांनी एकॉनॉमिक्स ऑफ ग्रोथ ॲण्ड डेव्हलपमेंट या विषयाची परिक्षा दिली. परंतु त्यांच्या गुणपत्रिकेवर सदर विषयाचे गुण न देता ते मायक्रो एकॉनॉमिक्स या विषयाचे दिले गेल्याचे त्यांना आढळले. या संदर्भात त्यांनी गुणपत्रिका दुरुस्तीकरिता दिनांक २३-०६-२००६ रोजी अहमदनगर कॉलेजकडे तक्रार अर्ज केला होता. या अर्जाचा पाठपुरावा करण्याकरिता अहमदनगर कॉलेजने विद्यापीठाशी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती अपिलार्थीस हवी होती व त्याकरिता त्यांनी दिनांक ०४-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता व तदनंतर दिनांक १६-११-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे प्रथम व व्दितीय अर्जास अधिनियमातील तरतुदीपमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने ज्या संदर्भात ही माहिती मागविली होती तो संदर्भ व माहिती अपिलार्थीस त्यांच्या शैक्षणिक भवितव्याच्या (कॅरिअर) दृष्टीने आवश्यक होती. तथापि या विषयाच्या गांभीर्याची जन अपिलीय अधिकारी यांना काहीही व या घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर कधीही जाण झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती साधी व सरळ स्वरुपाची होती व ही माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील उपलब्ध मनुष्यबळाचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागण्याची सुतरामही शक्यता नव्हती. तथापि येथे जन माहिती अधिकारी यांच्यातील इच्छाशक्तीचा अभाव याच एकमेव कारणामुळे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत होऊनही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठी प्रथम

अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी प्रथमपासून उपेक्षा केल्याचे आयोगास दिसून येत आहे. आज देखिल आयोगाच्या सुनावणीस त्यांनी स्वतः हजर न होता त्यांच्या महाविद्यालयातील कनिष्ठ लिपिक पातळीवरील कर्मचा-यास पाठविले आहे हे पाहता आयोगाचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची उपेक्षा केली आहे हे विधान अधिकच दृढ होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे त्यांचे इतर सहकारी व कर्मचारी जबाबदार आहेत त्यांनाही माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना या कामी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक व कर्मचारी तितकेच जबाबदार आहेत. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जास प्रतिसाद न देता अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली करावा. विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांनी या शास्तीची कर्मचारीनिहाय

विभागणी यथायोग्यरित्या हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसात करुन संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी हे वरील शास्तीचा भरणा नियमाप्रमाणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे व यासंदर्भात आपला अनुपालन अहवाल मे २००८ पासून दरमहा नियमीतपणे शास्तीची संपूर्ण रक्कम संबंधीतांनी कोषागारात भरेपर्यत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा भंग केल्याचेही निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई केली असती तर कदाचीत त्यांना राज्य माहिती आयोगापर्यत येण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसते. त्यांनी त्यांच्या या कृतीव्दारे आपल्या कार्यशैतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या वर्तनाची नोंद सचिव (शालेय शिक्षण) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठी अर्ज करुनही त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यात वरील निकालपत्रात विवेचन केल्याप्रमाणे करावा.

४. विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे वरील शास्तीचा भरणा नियमाप्रमाणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे व यासंदर्भात आपला अनुपालन अहवाल मे २००८ पासून दरमहा नियमीतपणे शास्तीची संपूर्ण रक्कम कोषागारात भरेपर्यंत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ कु. शेख फरहत मिराबक्ष, नशेमनव्हिला, वाबळे कॉलनी चौक, फकीरवाडा, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य अहमदनगर कॉलेज, पोस्ट बॉक्स क्रमांक २१, स्टेशन रोड अहमदनगर — ४१४ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई — ३२ यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) १७ आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, मराठी चर्चच्या बाजुला कॅम्प, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५९

निर्णय दिनांक : ०९-०४-२००८

१ श्री. सुनिलकुमार रामकिशन राठी, : अपिलार्थी
व्यंकटेश, विमल विहार सोसायटी,
नंदूरबार जिल्हा नंदूरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
निफाड जि. नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक, कृषी अधिकारी, नाशिक

### निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुनिलकुमार रामकिसन राठी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, निफाड जि.नाशिक श्री. उदय मोतीराम पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. राजेंद्र सोनु निकम (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,रजेसंबंधीचे नियम व त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावरील कार्यवाहीसंबंधी, दि. १.७.१९९८ ते ३०.०७.२००३ पर्यंतच्या कालावधीतील एकूण १० मुद्यांवर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. तालुका कृषि अधिकारी यांनी अर्जित/वैद्यकिय कारणास्तव रजा मागितल्यास त्यांच्या अशा प्रकारच्या रजा मंजूरीचे मंजूरी प्राधिकारी कोण आहेत?

२. तालुका कृषि अधिकारी यांनी वैद्यकिय कारणास्तव किती दिवसांची रजा उपभोगल्यास त्यांना वैद्यकिय मंडळाकडे वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले जावू शकते ?

३. तालुका कृषी अधिकारी यांना वैद्यकिय मंडळाकडे पाठविण्याचे अधिकार आपणास (म.उपविभागिय कृषि अधिकारी) आहेत काय ?

४. जर तालुका कृषि अधिकारी यांनी वैद्यकिय कारणास्तव उपभोगलेली रजा नियमाप्रमाणे त्यांना वैद्यकिय मंडळाकडे वैद्यकिय तपासणीसाठी पाठविण्यास आवश्यक कालावधीपेक्षा कमी असल्यास त्यांना वैद्यकिय मंडळाकडे वैद्यकिय तपासणीसाठी पाठविता येईल का ? पाठविता येत नसल्यासही त्यांना पाठविल्यास असे पाठविण्यास जबाबदार अधिकारी यांचेवर कोणत्या प्रकारे जबाबदारी निश्चित होते व कोणती कारवाई त्यांचेवर केली जाते ? पाठविता येत असल्यास ते कोणत्या नियमान्वये पाठविता येते त्याची नियमांसह माहीती द्यावी ?

५. तालुका कृषि अधिकारी यांना वैद्यकिय मंडळाकडे तपासणीसाठी पाठविणे नियमाप्रमाणे आवश्यकच झाल्यास त्यांना कोणते प्राधिकारी वैद्यकिय मंडळाकडे पाठविण्यास सक्षम आहेत ? तसे पाठविण्यासाठी त्यांनी आदेश कधी व कोणाच्या नावाने काढावा लागतो, वैद्यकिय मंडळाकडे पाठविण्यामागे काय प्रयोजन असते ?

६. तालुका कृषि अधिकारी वैद्यकिय कारणास्तव रजा उपभोगून त्यांचे मुळ पदी नेहमीप्रमाणे हजर झाले आणि हजर झाल्यापश्चात त्यांना वैद्यकीय मंडळाकडे जाण्याचे आदेश मिळाल्याने ते वैद्यकिय मंडळाकडे गेल्यास ते कर्तव्यार्थ (दृद ड्डद्यह्र) वैद्यकिय मंडळाकडे गेल्याचे ठरते किंवा कसे ?

७. तालुका कृषि अधिकारी यांनी अर्जित रजा किंवा वैद्यकिय कारणास्तव रजा एक पेक्षा जादा वेळेस त्यांच्या आवश्यकतेनुसार वाढविली असल्यास एकुण उपभोगलेल्या रजेचे आवेदनपत्र व रजा मंजुरीचा प्रस्ताव त्यांनी केव्हा सादर करावा लागेल ?

८. असा तालुका कृषि अधिकारी यांचा रजा मागणीचा प्रस्ताव आपल्याकडे प्राप्त झाल्यावर आपण तो मंजूरी प्राधिकारी यांच्याकडेस किती कालावधीत पाठविणे आवश्यक आहे ? तो आपण शिफारस करुन मंजूरीसाठी पाठविल्यानंतर मंजूरी प्राधिकारी यांनी त्यास किती दिवसांत मंजूरी प्रदान करणे त्यांचेवर बंधनकारक आहे ?

९. सन १९९८ ते २००३ दरम्यान तालुका कृषि अधिकारी, निफाड यांनी आपणाद्वारे कोणकोणत्या प्रकारच्या रजेची किती व कोणत्या कालावधीसाठी मागणी केलेली होती ? त्यांचे रजेचे आवेदन पत्र व प्रस्ताव आपण रजा मंजूर करणारे प्राधिकारी यांना केव्हा व कोणत्या पत्रान्वये पाठविले त्याचा सविस्तर तपशिल व ज्या पत्रान्वये ते पाठविले त्या आपल्या पत्राच्या व

तालुका कृषि अधिकारी, निफाड यांच्या रजेचे आवेदन पत्रे व मूळ प्रस्तावाच्या साक्षांकित प्रति मला देण्यात याव्यात.

१०. वरिल मुद्दा क्र. ९ मध्ये नमुद केलेल्या कालावधीतील कोणकोणत्या प्रकारच्या व कालावधीच्या रजा मंजूरी प्राधिकारी यांनी मंजूर केल्या आहेत? ”

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५०/- इतके भरण्याचे या पत्राद्वारे त्यांनी सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने सदर शुल्क दि. ३१.३.२००६ रोजी मनिऑर्डरद्वारे जन माहिती अधिकारी यांना पाठविले ते जन माहिती अधिकारी यांना दि. ४.४.२००६ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. १२.४.२००६ नुसार अपिलार्थीस माहिती पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस दि. १५.४.२००६ रोजी प्राप्त झाली. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.४.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी जादा शुल्क मागितल्याबद्दल, त्यांच्याकडून अवास्तव शुल्काची मागणी केल्याबद्दल व त्याद्वारे अपिलार्थीवर अनाठायी आर्थिक भार टाकल्याबद्दल माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची त्यांनी विनंती केली आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना मिळालेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे व त्यांना साक्षांकित प्रत प्राप्त न झाल्याचे व प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या या अर्जामध्ये शेवटी नमुद केले आहे.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२९.६.२००६ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपिल मान्य केले

असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब लावल्याचे, टाळाटाळ केली असल्याचे व अपिलार्थीची दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याचे नमुद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१०.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अनावश्यक व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमुद करुन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नुसार कार्यवाही करण्याचे आयोगास विनंती केली आहे.सदर अपीलाची आयोगाचे मुंबई कार्यालयात दि. २.११.२००६ रोजी नोंद झाली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेवर संपूर्ण माहिती देण्यासाठी शुल्क रु. १५०/- जमा करुन घेतले, तथापि अपिलार्थीस माहिती देतांना मात्र त्यांनी अनावश्यक माहिती दिली. सदर माहिती अपूर्ण आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे दि. १२.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरवून त्यांना संपूर्ण माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी दि. २.३.२००६ रोजी केलेल्या अर्जावर अधिनियमाद्वारे आवश्यक असलेले रु. १०/- चे कोर्ट फी स्टँप अपिलार्थीने डकविले नव्हते, आवश्यक ते कोर्ट फी स्टँपसह अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे दि. १६.३.२००६ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सर्व कार्यवाही केली आहे. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ९ चे संदर्भातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या अर्जाद्वारे केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मध्ये उपलब्ध असल्याचे शेवटी स्पष्ट केले.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद केला की, त्यांना या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून कोणताही युक्तीवाद करावयाचा नाही.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजुनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ माहितीचा अर्ज करतांना सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षित असलेल्या स्वरुपात विचारलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ पुस्तिका व इतर माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि.१२.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे.अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ९ च्या संदर्भातील माहिती वगळता, उर्वरित माहिती अधिनियमातील 'माहिती' या शब्दाशी पूर्णपणे सुसंगत जर नसली तरी अपिलार्थीस माहिती सहजपणे उपलब्ध होण्याकरिता अपिलार्थी यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी देणे हे फारसे अवघड होते, असेही नाही. अधिनियमाचा मूळ हेतू लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यास काही हरकत नाही, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीमधून अपिलार्थीने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यापेक्षा सरळ उत्तराने ती अपिलार्थीस सहज प्राप्त होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे मूळ अजाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला असल्याने त्यांचेवर शास्तीची कोणतीही कार्यवाही नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्या येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना सात दिवसांचे विनामूल्य पुरवावी.

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | ०९-०४-२००८ | राज्य माहिती आयोग, |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. सुनिलकुमार रामकिशन राठी,व्यंकटेश, विमल विहार सोसायटी, नंदूरबार जिल्हा नंदूरबार

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, निफाड जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, कृषी अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२१८

निर्णय दिनांक : ०९-०४-२००८

१ श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे, तक्रारदार
स.नं. ४६९, आशिर्वाद, :
स्टेट बँक कॉलनी, मालदाड रोड,
संगमनेर जि. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, श्रीरामपूर,
जि. अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, श्रीरामपूर श्री. मावची सेगा हुरजी ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. १०.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी, तहसीलदार श्रीरामपूर यांचेकडे मागणी केलेली कोणतीही माहिती मुदतीत मिळत

नाहीत, कोणतीही कागदपत्रे  मिळत नाहीत, माहितीसाठी केलेले अर्ज ते स्वीकारत नाहीत. रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले असता, 'घेत नाही म्हणून परत', अशा शेऱ्याने परत केले जातात. उत्तरवादी यांना याबाबत समज देण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या तक्रारीची आयोगाचे मुंबई कार्यालयात दि. १६.३.२००६ झाली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी असे सांगितले की, त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेला माहितीसाठीचा अर्ज परत आला असून, उत्तरवादी यांचे कार्यालयाने त्या पत्राचे पाकीट स्वीकारले नाही. तसेच इतरही माहिती मागितली असता, ती देण्यात येत नसल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत उत्तरवादी यांना याबाबत विचारले असता, त्यांनी असा युक्तीवाद केला की, आता त्यांचे कार्यालयामध्ये माहितीचा अर्ज स्वीकारण्यासंबंधी संबंधित लिपीकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत, तसेच तक्रारदार यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तक्रारदार यांना मिळालेल्या माहितीबाबत काही आक्षेप आहेत काय,असे विचारले असता तक्रारदार यांनी काही आक्षेप नसल्याचे सांगितले. फक्त त्यांचे बंद पाकीटात असलेल्या अर्जाशी संबंधित माहिती मिळावी, अशी त्यांनी विनंती केली. सुनावणीचे वेळी सदर बंद पाकीट फोडून त्यातील माहितीचा अर्ज उत्तरवादी यांचेकडे सुपूर्द करण्यात आला, सदर अर्जाद्वारे तक्रारदाराने  मागितलेली माहिती त्यांना ३० दिवसांचे आत देण्याचे उत्तरवादी यांनी शपथपत्राद्वारे आयोगास लिहून दिले आहे.

या प्रकरणी तक्रारदाराचे पोस्टाकडून परत आलेल्या पाकीटावरील पोस्ट खात्याच्या शेरा लक्षात घेता, शेऱ्यासंबंधी उत्तरवादी यांना विचारले असता ते या कार्यालयात नव्याने रुजू झाले असून, तत्कालीन लिपीकाची सुध्दा इतरत्र बदली झाली असल्याचे त्यांनी सांगितले, संबंधित लिपीकाने पोस्टमनकडून माहितीच्या अधिकाराखाली माहितीसाठीचे अर्ज स्वीकारण्यास दिलेला नकार लक्षात घेता, संबंधित लिपीकावर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमित होताच दोन

महिन्याचे आत पूर्ण करुन तद्नंतर  एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

तक्रारदारास त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाबाबत माहिती मिळण्यासाठी उत्तरवादी यांचेकडे सुपूर्द केलेल्या अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती ३० दिवसांचे आत तक्रारदारास विनामूल्य पुरवावी. असे उत्तरवादी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात  येत आहे.
२. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी, माहिती अधिकाराच्या अर्जाशी संबंधित टपाल स्वीकारण्यास नकार देणाऱ्या संबंधित लिपीकावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.
३. तक्रारदाराच्या उत्तरवादी यांचेकडे आज सुपूर्द केलेल्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०९-०४-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे,स.नं. ४६९, आशिर्वाद,स्टेट बँक कॉलनी, मालदाड रोड, संगमनेर जि. अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, तथा तहसीलदार, श्रीरामपूर,जि. अहमदनगर. यांना  या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६०

निर्णय दिनांक १०-०४-२००८

श्री. हेमंत हरीभाऊ जगताप, : अपिलार्थी
१०३६, जिजामाता रोड, दहीपल,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अपर कोषागार अधिकारी,
जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष
भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा कोषागार अधिकारी,
जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष
भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हेमंत हरीभाऊ जगताप (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय श्री. ओहाळ संदेश तुळशीराम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय सौ. संध्या यशवंत पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. अशोक रंगनाथ राऊत हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. अशोक रंगनाथ राऊत वरिष्ठ लिपीक जिल्हा कोषागार कार्यालय, नाशिक यांच्याविषयी ते सेवेत रुजू झाल्यापासून ते दिनांक ३०-०६-२००६ पर्यतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. सेवेत केव्हा रुजू झाले व सेवानिवृत्ती केव्हा ?

२. बेसिक पगार व वार्षिक उत्पन्न किती ?

३. सेवेत रुजू झाल्यापासून नाशिकमध्ये किती वर्ष ?

४. व अन्य ठिकाणी असेल तर किती वर्ष सेवा केली ? कुठे ? "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर एकूण ४ मुद्दयापैकी २ मुद्दयावर अपिलार्थीस माहिती पुरविली असून अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ संदर्भात श्री. राऊत हे त्यांच्या कार्यालयात कार्यरत नसल्याने व त्यांची तहसील कार्यालय संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे बदली झाल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू

शकले नाहीत व तसे त्यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपैकी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना पुरविली असून उर्वरीत २ मुद्दयावरील माहिती श्री. राऊत यांची बदली त्यांच्या कार्यालयाकडून झाली असल्याने, श्री. राऊत यांची बदली ज्या कार्यालयात झाली आहे त्या कार्यालयाचा पत्ता देऊन अपिलार्थीस उर्वरीत माहिती श्री. राऊत यांच्या बदली झालेल्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहितीसाठी केलेल्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी सदर माहिती त्यांना न देऊनही दिली असल्याचे कळविले असल्याकारणाने त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पोस्टाने माहिती पाठविली

असल्याचे आयोगास सांगितले आहे. तथापि त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे म्हटले आहे, तथापि हे विधान चुकीचे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार ते श्री. राऊत हे सध्या ज्या कार्यालयास नोकरीस आहे त्या कार्यालयाकडे गेले असता त्या कार्यालयातून श्री. राऊत हे मूळचे कोषागार कार्यालयाचे अधिकारी असल्याने त्यांनी मागितलेली माहिती जिल्हा कोषागारात उपलब्ध होऊ शकेल असे संबंधितांनी सांगितले व परिणामी अपिलार्थी हे आवश्यक माहिती मिळण्यापासून वंचित राहिले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची अपेक्षा करुन ते सदर माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी व्यक्तिशः उपस्थित न राहिल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली. अपिलार्थी यांनी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे त्या व्यक्तीची बदली २००२ मध्ये संजय गांधी निराधार योजना, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे उपलेखापाल या पदावर झाली असल्याने व त्यांची बदली झालेल्या कार्यालयाला त्यांची सेवापुस्तिका पाठविली गेली असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ संबंधातील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये तशी कल्पना दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहित दिली ाहे. सदर माहिती त्यांना साध्या पोस्टाने पाठविण्यात

आली. त्यांचा अपील निर्णय अपिलार्थीस त्याच पत्त्यावर पाठविला होता तो मात्र अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थीने कबूल करीत आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांचे माहितीचे पत्र प्राप्त झाल्याचे अपिलार्थी कबूल करत नाहीत. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या त्यांच्या सेवापुस्तिकेत असल्याने त्रयस्थ पक्षाची सेवापुस्तिका ज्या कार्यालयाकडे आहे त्या कार्यालयात अपिलार्थीने मागितलेली माहिती मिळू शकेल. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली आहे तो त्रयस्थ पक्ष, त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिवशी कार्यरत नव्हता. त्रयस्थ पक्षाची दिनांक ०७-०२-२००२ रोजी त्यांच्या कार्यालयातून बदली झालेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात ज्या त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे ते त्रयस्थ पक्ष जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत नव्हते. अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तीक नस्तीवरुन त्यांना पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे, की, त्रयस्थ पक्ष यांच्या कार्यालयात कार्यरत नसल्याने त्रयस्थ पक्षाविषयी त्यांना अपिलार्थीस उर्वरीत २ मुद्दयावरील माहिती देता आली नाही हे, आयोग ग्राह्य धरत आहे. येथे असेही दिसून येते की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे गेल्याचा कोणताही पुरावा ते आयोगास उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०५-०७-२००६ रोजीच्या पत्राचे वेगळे रजिस्टर आयोगास दाखविले. तथापि यावरुन अपिलार्थीस त्यांनी सदर माहिती पोस्टाने

पाठविली किंवा कसे हे स्पष्टपणे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राची त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीत नोंद घेतली असती तर कदाचीत तो अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ पुरावा ग्राह्य धरता आला असता तथापि माहितीच्या अधिकाराखालील जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जासदर्भात त्यांनी वेगळे रजिस्टर ठेवले असून त्यामध्ये अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक, अर्जदाराचे नाव, अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक एवढेच रकाने नमूद केले आहेत. सदर रजिस्टर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय सोयीसाठी ठेवले असल्याचे दिसून येते. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित पत्राची नोंद त्यांच्याकडील जावक नोंदवहीत ठेवणे जरुरीचे होते तथापि त्यांनी असे केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस ज्या २ मुद्दयावर माहिती दिल्याचे म्हटले आहे ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. या प्रकरणी आता विलंब झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्ष सध्या ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयाकडून त्रयस्थ पक्षाची सेवापुस्तिका मागवून घेणे व त्यावरुन अपिलार्थीस उर्वरीत माहिती पुरविणे उचित ठरेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मध्ये त्यांनी त्रयस्थ पक्षाचा बेसिक पगार कळवावा मात्र त्यांचे वार्षिक उत्पन्न जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविण्याची आवश्यकता नाही कारण सदर माहिती दिल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबतीत अंगतूक हस्तक्षेप केल्यासारखे होऊन अधिनियमातील कलम ८ (त्र) चा भंग होईल असे आयोगास वाटते. तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे हे व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे आयोगास वाटत नाही. सदर माहिती अपिलार्थीस त्यांच्या स्वतःसाठी हवी असल्याने त्रयस्थ पक्षाचे वार्षिक उत्पन्न सोडून मुद्दा क्रमांक २ व उर्वरीत २ मुद्दयावरील सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे

आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने सदर माहिती हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, सुट्टीचे दिवस व वेळ सोडून, व्यक्तिशः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूपूरःस्सर अथवा कोणत्याही असद्‌हेतून माहिती न पुरविल्याचे आढळून न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत हरीभाऊ जगताप, १०३६, जिजामाता रोड, दहीपल, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६१

निर्णय दिनांक १०-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद निसार मगबुल,<br>व्दारा- साप्तहिक भडकत्या ज्वाला<br>कार्यालय, मु. पो. तालुका राहूरी मेन<br>रोड, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक आयुक्त<br>अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,<br>अहमदनगर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह आयुक्त, नाशिक विभाग अन्न व<br>औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सय्यद निसार मगबुल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य श्री. गिरीश खुपचंद वखारीया (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, नाशिक विभाग अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य श्री. प्रभाकर निळकंठ रावखंडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००६ ते १९-०५-२००६ या कालावधीतील मिरिंडा शितपेयासंदर्भात केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात झालेल्या कारवाईसंबंधी माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ १. वरील प्रकरणी करण्यात आलेल्या कायदेशीर कारवाईचा संपूर्ण अहवाल देणे.

२. या प्रकरणी कायदेशीर कारवाईस विलंब होत आहे का ? होत असल्यास का ? याविषयीचा खुलासा मिळावा. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांनी सूचना केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०२-०३-२००७ रोजी ३० रुपये इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी

कायम ठेऊन त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मोफत देण्याची व माहिती न देणा-या अधिका-याविरुध्द कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील पत्र दिनांक ०२-०४-२००७ नुसार माहिती पाठविली असल्याची कल्पना दिली व सदर माहिती वेळेत न पाठविल्यामुळे संबंधीत कर्मचा-यावर शास्ती लावण्याचे निर्देशीत केले असल्याचे अपिलार्थीस अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीप्रीत्यर्थ दिनांक १४-०२-२००७ रोजी प्रथम अर्ज केला होता. तद नंतर जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार त्यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ३० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुनही त्यांना वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी

राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांना दिनांक २०-०२-२००७ रोजी प्राप्त झाला. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये ३० त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. सदर शुल्क अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दिनांक ०२-०३-२००७ रोजी भरले. अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक ०९-०३-२००७ रोजी त्यांनी तयार केली होती व रजिस्टर पोस्टाने पाठविण्यासाठी संबंधीत लिपिकास दिली होती. तथापि संबंधीत लिपिकाने सदर पत्र विनाकारवाई त्यांच्याकडे तसेच ठेऊन दिले व अंतीमतः त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०४-२००७ रोजी सदर पत्र रजिस्टर पोस्टाने पाठविले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००७ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कायदेशीर कारवाईचा संपूर्ण अहवाल मागितला होता. त्याप्रमाणे त्यांनी या प्रकरणी केलेल्या संपूर्ण कारवाईचा अहवाल त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे ज्यावेळी प्रथम अपील केले त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. सुनावणी घेण्याचे तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्या लक्षात कदाचीत आले नसल्याची शक्यता त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर व्यक्त केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी

माहितीतील मुद्दा क्रमांक २ हा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्याव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व मते अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील फक्त मुद्दा क्रमांक १ हाच आयोग विचारात घेत आहे. आज झालेल्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट झाले की, अपिलार्थीस संपूर्ण अहवालाची अपेक्षा होती. अपिलार्थीने आयोगासमोर असे स्पष्ट केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदर अहवालामध्ये काढलेले निष्कर्ष कोणत्या कागदपत्राच्या आधारे काढले आहे ती कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या पत्रातील संदर्भ केलेले अहवाल हवे आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण या शब्दाचा अर्थ वेगळा लावून अपिलार्थीने मागणी केलेल्या विनंतीतील ‘‘संपूर्ण’’ घटनेचा अहवाल दिला आहे. ‘‘संपूर्ण’’ या शब्दाचा जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी वेगवेगळे अर्थ लावल्याने अपिलार्थीस सदर माहिती अपूर्ण मिळाल्याचे वाटत आहे. अपिलार्थीच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ च्या तरतुदीअन्वये जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी विनामूल्य माहिती देणे भाग आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्या दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये निर्देशीत केलेल्या सर्व अहवालाच्या प्रती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसाचा विलंब लागल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना

सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी या सर्वांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक हे देखील या विलंबास तितकेच जबाबदार ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (१० दिवसासाठी) एकूण रुपये २५०० /- (अक्षरी- रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी एकाच हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली करावा. सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, नाशिक यांनी यथायोग्यरित्या त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी. सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी हे वरील शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात नियमीतपणे करतील असे पहावे व यासंदर्भात आपला अनुपालन अहवाल ०१ जून २००८ रोजी आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा भंग केल्याचेही निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई केली असती तर कदाचीत त्यांना राज्य माहिती आयोगापर्यत येण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसते. त्यांनी त्यांच्या या कृतीव्दारे आपल्या कार्यशैतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या वर्तनाची नोंद सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे (१० दिवसासाठी) एकूण रुपये २५०० /- (अक्षरी- रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निकालपत्रात विवेचन केल्याप्रमाणे करावा.

४. विभागीय सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे वरील शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात करतील असे पहावे व यासंदर्भात आपला अनुपालन अहवाल ०१ जून २००८ रोजी आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद निसार मगबुल, व्दारा- साप्तहिक भडकत्या ज्वाला कार्यालय, मु. पो. तालुका राहूरी मेन रोड, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, नाशिक विभाग अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६२

निर्णय दिनांक १०-०४-२००८

श्री. सुरेशचंद्र पुरुषोत्तम पाथरकर, : अपिलार्थी
१० पद्मकल्प निलमणी हौसिंग
सोसायटी, स्टेट बॅक कॉलनी,
राजीवनगर, नाशिक-९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख
चोपडा तालुका चोपडा जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव
जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेशचंद्र पुरुषोत्तम पाथरकर व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख मोतीलाल रामदेव धुर्मेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून २००४ ते २२-०६-२००६ पर्यतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " आमची आई गं. भा. शालीनीबाई पुरुषोत्तक पाथरकर ह्या तारीख १०-१०-१९९१ रोजी मयत झाल्या. त्यांचे नांव अधिकार अभिलेखातून कमी करणेबाबत तसेच आमची बहीण सौ. सुमन उर्फ सुमती मधुकर कुलकर्णी ही तारीख १५-७-१९९९ रोजी पिंपळस (रामाचे) ता. निफाड येथे मयत झाल्याने तिचे नाव कमी करुन वारसाचे नाव लावणेबाबत तारीख ४-६-२००४ रोजी नगर भूमापन अधिकारी चोपडा शहर यांचेकडे अर्जदाराने अर्ज केलेला होता. त्यावरुन परिरक्षण भुमापक चोपडा शहर यांनी तारीख १४-७-२००४ रोजी फेरफार दि. क्र. २५२५ घेवून म. ज. म. अ. १९६६ चे कलम १५० (२) अन्वये नोटीस २१४१०६१ तारीख १९-१०-२००४ रोजी काढल्या होत्या. त्यास अनुसरुन संबंधीतांनी तारीख २-११-२००४ व ४-११-२००४ रोजी उत्तरे पाठविली होती. याबाबत पुढे काय कार्यवाही झाली याबाबत म. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख चोपडा यांना तारीख ४-३-२००५, २७-४-२००५ व ८-६-२००५ अशी स्मरणपत्रे पाठवून विचारणा केली होती. तत्राप आजपावेतो एकाही ओळीचे उत्तर मिळालेले नाही. सबब माझे तारीख ४-६-२००४ चे अर्जानुसार मयतांची नावे कमी करुन वारसांची नावे लावण्याबाबत झालेल्या आदेशाची व त्यानुसार दुरुस्त झालेल्या सि. स. नं. १५३१ व १५७२ अ च्या मालमत्तेच्या रजिस्टर कार्डाचे उतारे पाठविण्यात यावेत. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीपोटी रुपये ११७ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००६ रोजी मनीऑर्डरने पाठविले. तथापि सदर मनीऑर्डर तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी घेण्याचे नाकारले असे उपस्थित अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना शुल्क देण्याची तयारी दर्शवूनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांना कारवाई करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १८-०५-२००६ रोजी पारीत केले. सदर आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या नकला त्यांना विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. सदर अपील निर्णयाची एक प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख चोपडा यांना अग्रेषित केली आहे. मात्र या आदेशाची प्रत अपिलार्थीस हवी असल्यास तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे त्यांनी नियमाप्रमाणे फी भरुन ती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सुचविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची सदरची कृती आक्षेपार्ह आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना माहिती अधिकार अधिनियमामध्ये या निर्णयापोटी कोठलेही शुल्क आकारण्याची तरतूद अधिनियमामध्ये नाही. असे असतांनाही जन अपिलीय अधिकारी यांनी या

प्रकरणी अपिलार्थीस नियमाप्रमाणे फी भरुन अपिलाच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस देऊ करणे ही त्यांची कृती अधिनियमातील तरतुदीशी पूर्णतः विसंगत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अधीक्षक भूमी अभिलेख जळगाव यांनी त्यांच्याकडील अपिलात दिलेल्या निर्णयाची प्रत नियमानुसार त्यांच्याकडूनच प्राप्त व्हावी. व त्यांनी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख चोपडा यांच्याकडून सदर अपील निर्णयाची प्रत घेण्याचे त्यांचे आदेश मागे घेण्यास सूचना त्यांना द्याव्यात असे म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केलेल्या कागदपत्राच्या नकला त्यांना विनामूल्य मिळवून द्याव्यात व संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. याच व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी या प्रकरणामध्ये संबंधीतांकडून त्यांना झालेला मानसीक त्रास, छळवाद, टपाल खर्च, टायपिंग खर्च, झेरॉक्स खर्च इत्यादी खर्चाची भरपाई त्यांना देण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत तथापि त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी त्यांचे म्हणणे फॅक्सव्दारे पाठविले असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, आयोगाकडील दिनांक २५-०३-२००८ ची नोटीस जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याने त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून प्रकरणाची पुन्हा माहिती घेतली आहे व या प्रकरणी त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्राप्त झाली. या माहितीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२००६

च्या निर्णयाच्या प्रतीचा समावेश आहे. प्रस्तुत प्रकरण त्यांनी मूळतः दिनांक ०४-११-२००४ पासून सुरु करुन त्यांना या प्रकरणी ३ वर्षे ५ महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थीने या पत्रामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, त्यांच्या सारख्या जेष्ठ नागरिकाला झालेल्या मानसीक त्रासाबद्दल व ससेहेलटीबद्दल यांना पश्चताप होत असला तर अपिलातील त्यांच्या मागणीबाबत त्यांची काही तक्रार नाही. फक्त माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत अतिदक्ष राहण्याची सक्त ताकीद त्यांना देण्यात यावी. त्यांच्या या शेवटच्या मुद्दयावर राज्य माहिती आयोगाने आदेश द्यावेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०२-०४-२००८ रोजी रुजू झाले असून अपिलार्थीने ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी श्री. कांबळे ए. ए. हे अधिकारी जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले होते. ते सध्या तालुका निरिक्षक भूमी अभिलेख इगतपुरी या कार्यालयात कार्यरत आहेत. अपिलार्थीने पाठविलेली रुपये ११७ ची मनीऑर्डर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी का स्विकृत केली नाही यासंदर्भात त्यांना आता स्पष्टीकरण देता येणार नाही. त्यांच्या कडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने ११७ रुपये इतकी रक्कम पाठविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सदर रक्कम स्विकृत केली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास त्यांना माहिती प्राप्त करुन

घेण्यापोटी मनीऑर्डर करण्याचे पूर्णतः अधिकार आहेत त्यामुळे अपिलार्थीची मनीऑर्डर स्विकृत न करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयाच्या प्रती अपिलार्थीने तालुका निरिक्षक भूमी अभिलेख चोपडा यांच्याकडून प्राप्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर दिनांक १८-०५-२००६ चे आदेशवजा पत्र हे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले आहे मात्र त्यांनी ते योग्य त्या पध्दतीने न पाठविता या पत्राची नक्कल अपिलार्थीस हवी असल्यास त्यांनी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून नियमाप्रमणे फी भरुन प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची कृती वर उल्लेखिल्याप्रमाणे पूर्णतः चुकीची असून जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांचे दिनांक १८-०५-२००६ चे आदेश वजा पत्र, हे आदेश निर्गमीत होताच त्यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०२-०२-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज करुनही त्यांना आवश्यक माहिती दिनांक ०२-०४-२००८ रोजी म्हणजे २ वर्षे २ महिने इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. या विलंबाचे कोणतेही कारण आयोगास समर्थनीय वाटत नाही. किंबहुना अशा प्रकारच्या विलंबास कोणतेही कारण मूळात असूनच शकत नाही असे आयोगाचे मत आहे. तेव्हा संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी देऊ केलेले शुल्क नाकारुन या आपल्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा

प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे फॅक्सव्दारे पाठविलेल्या पत्राव्दारे कबूली दिली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी वर सूचित केल्याप्रमाणे कारवाई करणे जरुरीचे आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या दिनांक १८-०५-२००६ रोजीच्या पत्राची एक अतिरिक्त मूळ प्रत हे आदेश निर्गमीत होता अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य पाठवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांनी प्रचलीत सेवानियमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेशचंद्र पुरुषोत्तम पाथरकर, १० पद्‌मकल्प निलमणी हौसिंग सोसायटी, स्टेट बॅक कॉलनी, राजीवनगर, नाशिक-९.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख चोपडा तालुका चोपडा जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, जुन्या विधान भवनासमोर, नवीन प्रशासकीय बिल्डींग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६३

निर्णय दिनांक १०-०४-२००८

श्री. सुरेश लक्ष्मण तांबोळी, : अपिलार्थी
बि. नं. ४३७ ब/५, हाटदरवाजा, गिरीराज
मेडिकल जवळ, नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, नंदुरबार,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, नंदुरबार,
जिल्हा नंदुरबार

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश लक्ष्मण तांबोळी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. संदीप बी. आहेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नंदुरबार श्री. वसावे

अरमानसिंग रामजी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. सोनार हरीश सुरशे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची शेतजमीन फेरफार क्रमांक १२५८० संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ शेती स. नं. ७/२, ७/३, ७/५, ७/५ पै. फेरफार नं. १२५८० च्या अंतर्गत ९/१२ नोटीस, अर्ज, वाटणीपत्र, प्रतिज्ञापत्र व सूची क्र. २ च्या संपूर्ण नकला १-१-१९९८ च्या ड पत्रकावरील (गा न नं. ६) नोंदीवरुन संबंधीत संपूर्ण नकलांची छायांकीत प्रत मिळावी संबंधीत नकलांची फी भरण्यास तयार आहे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही कागदपत्रे ड वर्गातील अभिलेखे असून अपिलार्थीने मागणी केलेल्या फेरफार क्रमांक १२५८० नंदूरबार बाबतची कागदपत्रे अभिलेख्यात आढळून न आल्याने त्याच्या प्रमाणित नकला ते अपीलार्थीस पुरवू शकत नसल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २४-०९-२००६ रोजी पारीत केले. या आदेशा

मध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले असून अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या नोंदीच्या पुनरिक्षणाबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्याबाबत अपिलार्थीस त्यांनी सूचित केले आहे. तसेच या प्रकरणातील जबाबदार कर्मचा-यावर कारवाई प्रस्तावित करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त न होण्यामध्ये संबंधीत लिपीक जबाबदार नसून तत्कालीन तलाठी नंदुरबार श्री. सोनटक्के व तत्कालीन सर्कल इन्स्पेक्टर श्री. साबळे हे जबाबदार आहेत. आस्तित्वात नसलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी त्यांच्या जमिनीच्या फेरफार पत्रकात बदल केलेला आहे त्यामुळे वारसा हक्काने त्यांना प्राप्त होणा-या जमिनीच्या मालकीमध्ये बदल होऊन त्यांना आपल्या हक्काच्या जमिनीपासून वंचित रहावे लागले आहे. या प्रकरणी श्री. पठाण व एस. पी. पाटील तलाठी नंदुरबार हे देखील जबाबदार आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या नंदूरबार येथील फेरफार क्रमांक १२५८० ची नोंद दिनांक ०१-०१-१९९८ रोजी घेण्यात आली. सदर नोंद तत्कालीन मंडळ अधिकारी श्री. साबळे यांनी प्रमाणित केलेली आहे. फेरफार क्रमांक १२५८० मधील नोंद तलाठी

नंदुरबार यांनी ०१-०१-१९९८ रोजी प्रथमतः घेतली तदनंतर ती तत्कालीन मंडळ अधिकारी श्री. साबळे यांनी दिनांक २६-०१-१९९८ रोजी प्रमाणित केली. सदर नोंद मंजूर करतांना मंडळ अधिकारी यांनी नोटीस, ९/१२ ची नोटीस, अर्ज व वर्दी यावरुन ती प्रमाणित केली असल्याचे दिसून येते. संबंधीत तलाठी यांनी मंडळ अधिका-यांने ज्या अर्जावरुन नोंद प्रमाणित केली आहे अशी सर्व कागदपत्र तहसील कार्यालया मधील अभिलेखामध्ये जमा करावयाची असतात परंतु तहसील कार्यालयामध्ये संबंधीत तलाठ्याने अशा प्रकारची कोणतीही कागदपत्रे जमा केल्याची नोंद नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने माहितीसाठी अर्ज करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती वरील नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध होऊ शकत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक २०-१०-२००७ रोजी रुजू झाले आहेत. प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २४-०९-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले व नोंदीच्या पुनरिक्षणासंदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पुररिक्षण अपील अर्ज करण्यास सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजमितीस उपलब्ध नाही. संदर्भिय जमिनीच्या फेरफारावर तत्कालीन तलाठी, सर्कल इन्स्पेक्टर यांनी केलेल्या नोंदी ज्या कागदपत्रा च्या आधारे केलेल्या आहेत ती कागदपत्रे अपिलार्थीस आवश्यक आहे तथापि अशा प्रकारचे कागदपत्रे मुळातच अस्तित्वात नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

युक्तिवादामध्ये वरील प्रमाणे स्पष्ट केले आहे. अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देतांना अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे अभिलेख शाखेत जमा झाली नसल्याची खात्री करुन घेतली असल्याचे आज सुनावणीमध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले गेले. वादग्रस्त नोंद दिनांक ०१-०१-१९९८ रोजी तत्कालीन तलाठी यांनी घेऊन सदर नोंद तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी दिनांक २६-०१-१९९८ रोजी घेतली आहे. तत्कालीन तलाठी यांनी त्यासंबंधीची कागदपत्रे आवश्यकता पडल्यास फेरिस्तची नक्कल सादर केली आहे. त्यावर अभिलेख लिपिकाची कागदपत्रे जमा केल्याची स्वाक्षरी आहे. मात्र अशी नोंद अभिलेख शाखेच्या फेरिस्त बुकात दिसत नाही. यावरुन अभिलेख लिपीक यांना खरोखरच सदर कागदपत्रे प्राप्त झाली होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यास अशा प्रकारे तत्कालीन तलाठी व सर्कल इन्स्पेक्टर हे जबाबदार असल्याचे येथे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात हर त-हेने प्रयतन केल्याचे दिसून येते. तथापि मूळ माहितीच आस्तित्वात नसल्याने त्यांना ती माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आली नाही असे येथे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये संबंधीत जबाबदार व्यक्तीवर कारवाई प्रस्तावित करावी असे निर्देश दिले होते. त्यानंतर यासंदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तहसीलदार नंदुरबार यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपला अहवाल पाठविला आहे. सदर कारवाईच्या सद्यःस्थितीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी या प्रस्तावावर उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली असल्याचे दिसून येत नाही असे आयोगास सांगितले आहे. सबब उपविभागीय अधिकारी नंदुरबार यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी तहसीलदार यांच्याकडून संबंधीत जबाबदार व्यक्तीवर कारवाई करण्याच्या त्यांच्या दिनांक २६-१२-

२००६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावावर हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत निर्णय घेऊन त्यावर योग्य ती कारवाई करावी. अपिलार्थी यांच्या मते त्यांना सदर माहिती प्राप्त न होण्यास संबंधीत तलाठी व सर्कल इन्स्पेक्टर हे जबाबदार आहेत. त्यांचे नांवे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगाच्या समोर उघड केली आहेत. अपिलार्थीच्या जमिनीच्या मालकीचा हक्क त्यांच्या नकळत डावला जाणे ही बाब गंभीर आहे असे आयोगाचे मत आहे. सबब जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी या प्रकरणी वैयक्तीक लक्ष घालून अपिलार्थीस योग्य तो न्याय द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या फेरफाराचे पुनरिक्षण करण्याची सूचना दिली आहे व अपिलार्थीने यासंदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तसे अपीलही केले आहे. वास्तविकतः या प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांनी सद्यस्थितीत या कागदपत्रांची पाहणी करुन आपला निर्णय देणे आयोगास अपेक्षित आहे. त्याचबरोबर त्यांना आता अपिलार्थीच्या या अपिलावर निदान तातडीने (३ ते ४ महिन्यात) निर्णय घेऊन अपिलार्थीच्या या प्रकरणी योग्य तो न्याय द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश लक्ष्मण तांबोळी, बि. नं. ४३७ ब/५, हाटदरवाजा, मु. पो. तालुका जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ उपविभागीय अधिकारी, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८८

निर्णय दिनांक : १०-०४-२००८

१ श्री. मानव मल्हारराव घोडके, तक्रारदार
'राजहंस', श्रीगोंदा जि.अहमदनगर. :

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी
सहायक प्रकल्प अधिकारी,
जिल्हा ग्रामीण विकास योजना,
अहमदनगर.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. मानव मल्हारराव घोडके (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास योजना, अहमदनगर श्री. मोहन खेमा जाधव व जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास योजना, अहमदनरगर श्री. बाळासाहेब मुरलीधर मोहन (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २७.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांचेकडील दि. ५.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. त्यांचे या अर्जावर उत्तरवादी यांनी दि. १७.१२.२००५ रोजी अपिलार्थीस काही माहिती दिली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ज्या योजनांची अंमलबजावणी केली जाते त्या योजनांच्या माहिती पोटीचे शुल्क रु.१०००/- त्यांचे कार्यालयात जमा करण्यासाठी सूचित केले. तथापि उत्तरवादी यांचे या पत्रावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. २३.२.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे प्रथम अपील केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे अपिल करुनही त्यांना अपेक्षित असलेली माहिती, हरतऱ्हेने त्यांनी प्रयत्न करुनही उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झाली नाही. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी एकूण ६ महिन्याहून जास्त कालावधी व्यपगत झाला, तसेच त्यांचे राहण्याचे ठिकाण ते अहमदनगर हा ६५ किमी. चा प्रवास त्यांना वारंवार करावा लागला तरीही माहिती मिळाली नाही व या सर्व प्रकारास जबाबदार असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांचेवर माहिती विहित कालावधीत न देणे, तक्रारदारास उत्तर न देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य ती कार्यवाही व्हावी, त्यांना आर्थिक नुकसान भरपाई द्यावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळावी.

तक्रारदार यांच्या या अर्जावर उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ही संस्था कोणत्याही प्रकारचे काम स्वतः करत नसून राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांसााठी फंडीग एजन्सी म्हणून काम करते. शासनाच्या विविध योजना, ज्या यंत्रणांमार्फत प्रत्यक्षतः क्षेत्रीय स्तरावर राबविल्या जातात, त्या योजनांकरिता संबंधित यंत्रणांना अनुदान पुरविण्याचे काम त्यांचे कार्यालय करते.

तक्रारदाराने मागितलेली माहिती या क्षेत्रीय स्तरावर केलेल्या कामाशी संबंधित असल्याने त्यांना ती क्षेत्रीय स्तरावरुन प्राप्त करुन घेऊन नंतर ती संकलीत करणे भाग होते. या

प्रकरणी त्यांनी संबंधित यंत्रणांना पत्र पाठवून तक्रारदारास द्यावयाची माहिती एकत्रित करण्याची प्रक्रिया चालू केली होती.तक्रारदाराने या प्रकरणात मुद्दा क्र. २ वरुन उत्तरवादी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील केले होते. तथापि त्यांनी या अपिल अर्जावर रु.२०/- चा आवश्यक तो कोर्ट फी स्टॅम्प न डकविल्याने त्याची पूर्तता करण्यासंदर्भात तक्रारदारास कळविले होते. तक्रारदाराने अपिल करतांना ते चुकीच्या प्राधिकरणाकडे केली होते. या प्रकरणी प्रत्यक्षतः माहिती अधिकारी म्हणून सहायक प्रकल्प अधिकारी (सनियंत्रण), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डी.आर.डी.ए.) अहमदनगर यांची नेमणूक झाली आहे. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती आता त्यांचे कार्यालयात तयार करण्यात आली असून त्यांनी तक्रारदारास त्यांचे कार्यालयातील पत्र दि. २३.३.२००६ अन्वये सदर माहिती पोटी आवश्यक असलेले शुल्क रु. १४/- इतके त्यांचे कार्यालयात भरुन सदर माहिती घेऊन जाणेबाबत सूचविले होते. तथापि तक्रारदार हे माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांचे कार्यालयात हजर झाले नाहीत.

तक्रारदार यांनी आयोगासमोर सुनावणीमध्ये असा युक्तीवाद केला की, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी त्यांचेकडील दि. ५.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे विनंती केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना सदर माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते दि. १०.३.२००६ रोजी सकाळी ११.०० वा. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहिले, तथापि माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी त्या दिवशी उपस्थित नव्हते. त्यांचे कार्यालयातील लेखाधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. (तक्रारदार यांनी ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहिल्याबद्दल

त्यांनी योग्य तो पुरावा आयोगास सादर केला आहे.) त्यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयामार्फत राबविल्यात येणाऱ्या योजनांच्या कामकाजाच्या पध्दतीबाबत माहिती घेण्यासाठी त्यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयाला एक पत्र दिले असून सदर पत्र उत्तरवादी यांचे कार्यालयात दि. १०.३.२००६ रोजी प्राप्त झाल्याबाबत संबंधित लिपीकाने दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येते. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, उत्तरवादी यांचे कार्यालयाकडून भरपूर त्रास दिला गेला. उत्तरवादी यांनी त्यांचे युक्तीवादामध्ये नमुद केलेले रु. १४/- शुल्कासंबंधीचे पत्र त्यांना अद्यापही प्राप्त झाले नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी तक्रारदार यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, त्यांनी, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य तो अर्ज देऊनही, त्यांना उत्तरवादी यांचेकडून संपूर्ण माहिती पुरविण्यात आली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तक्रारदाराने मागितलेली माहिती उत्तरवादी यांचेकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, ती त्यांनी संबंधित क्षेत्रिय यंत्रणेकडून मागवून घेऊन ती एकत्रित करुन तक्रारदारास द्यावयाची होती. या सर्व प्रक्रियेमध्ये तक्रारदारास माहिती देण्याकरिता उत्तरवादी यांना काही वेळ लागणे स्वाभाविक आहे. तथापि उपरोक्त प्रकरणात उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती देण्यासंदर्भात जो विलंब लावला त्याचे खचितच कोणतेही समर्थन असू शकत नाही, उत्तरवादी यांनी आता तक्रारदारास त्यांनी दि. ५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत त्यांनी दि. ५.१२.२००५ च्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी उत्तरवादी यांनी तक्रारदारास माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी अशा प्रकारच्या चुका टाळाव्यात, असे त्यांना

सूचित करण्यात येत आहे. उत्तरवादी यांना आयोगातर्फे देण्यात आलेल्या ताकीदीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधिताचे सेवापुस्तिकेमध्ये घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तद्वतच त्यांचे कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे नाव व हुद्दा दर्शविणारा फलक नागरिकांना सहजपणे दृष्टीस पडेल अशा प्रकारे लावावा, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे. वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत त्यांनी दि. ५.१२.२००५ च्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. उत्तरवादी यांना आयोगातर्फे देण्यात आलेल्या ताकीदीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधिताचे सेवापुस्तिकेमध्ये घ्यावी,

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १०-०४-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मानव मल्हारराव घोडके,'राजहंस', श्रीगोंदा जि.अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६५

निर्णय दिनांक    ११-०४-२००८

१ श्री. विजय कौतिक वानखेडे, : अपिलार्थी
रा. देवपूर, जि. धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषी अधिकारी,
नवापूर जि. नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय कृषी अधिकारी, नवापूर
जि. नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. विजय कौतिक वानखेडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नवापूर जि.नंदूरबार श्री. रतिलाल सिताराम महाले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नंदूरबार, जि. नंदूरबार श्री. रघुनाथ बन्सी आव्हाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००५-२००६ या कालावधीतील त्यांचे कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" म. तालुका कृषि अधिकारी नवापूर, जि. नंदुरबार अंतर्गत सन २००५-२००६ या वर्षात रो.ह.यो. व अन्य योजनांतर्गत तसेच एकात्मिक पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत उपरोक्त शासकिय यंत्रणामार्फत करण्यात आलेल्या येत असलेल्या मातीनालाबांध, मा.ना.बां.दुरुस्ती, मातीबांध, मा.बां.दुरुस्ती,समतल सलगतर,शेततळे, सि.सि.टी.दगडीबांध, सि.बा.बां.मजगी उपरोक्त जलमृदसंधारण विकास कामाची यादी खालील नमुन्यात :- कामाचा प्रकार, कामाचे नांव,कामाचे प्रत्यक्ष ठिकाण,गट नं.कामाची अंदाजपत्रकीय रक्कम, दर टि.सि.एम. प्रत्यक्ष झालेल्या या खर्चाचा तपशिल, प्रत्येक कामनिहाय मजूरांच्या गावाचे नाव कामाचा दर्जा व सदयस्थिती या संबंधीची माहिती . "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. ३.८.२००६ रोजी प्राप्त झाला आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी आयोगास सांगितले. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.९.२००६ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांचेकडील दि. २७.९.२००६च्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दोन दिवसात पाठविण्याचे, जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून आदेश निर्गमित होऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित

होऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.११.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना द्वितीय अपिल अर्जाच्या दिनांकापर्यंत माहिती प्राप्त न झाल्याचे नमुद केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांना वेळेवर माहिती न पुरविताही कोणतीही कार्यवाही केली नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करुन त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास त्यांचे अर्जामध्ये शेवटी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांच्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. ते या पदावर दि. २१.५.२००७ पासून कार्यरत आहेत. ते या पदावर रुजू होण्यापूर्वी श्री. ई.एस.पाटील, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी यांचेकडे जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार होता.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला त्यावेळी खरीप हंगामाचा सीझन चालू असल्यामुळे त्यांच्याकडील नियमित कामाचा भार वाढल्याने ते नियमित कामात गर्क राहिले. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून/अधिकाऱ्यांकडून संकलीत करुन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची असल्यामुळे त्यांनी त्यांचे उपविभागातील सर्व संबंधित क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्यासाठी तोंडी सूचना केली होती. सर्व संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ती दि. ३०.९.२००६ रोजी अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीस माहिती

पुरविल्याचे त्यांचे विधानापृष्ठयर्थ त्यांनी त्यांचे कार्यालयाचे दि. ३०.९.२००६ चे पत्र आयोगास दाखविले. सौ. पुष्पा विजय वानखेडे नावाच्या व्यक्तीची सही असून 'माहिती प्राप्त झाली' असा अभिप्राय त्यावर नोंदविण्यात आलेला आहे. सदर व्यक्ती अपिलार्थीची पत्नी आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीचे वेळी सांगितले. जर अपिलार्थीस दि. ३०.९.२००६ रोजी माहिती प्राप्त झाली होती, तर त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल का केले, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीचे दि. १३.११.२००६ रोजीच्या हस्तलिखित पत्राची झेरॉक्स प्रत आयोगाकडे सादर केली त्यामध्ये त्यांनी आयोगाकडे अनावधानाने द्वितीय अपिल केले असल्याचे म्हटले आहे. सदर पत्र अपिलार्थीने मुख्य माहिती आयोगाचे कार्यालयास लिहिले असल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर पत्राच्या सत्यतेबाबत सदर प्रत प्रमाणित केली नसल्याचे आयोगास दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद केला आहे की,अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज त्यांचेकडे दि. २६.९.२००६ रोजी प्राप्त झाल्यावर त्यांनी तात्काळ त्यावर कार्यवाही करुन दि. २७.९.२००६ रोजीच्या त्यांचे कार्यालयाचे पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांना मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविण्याच्या सूचना केल्या. जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.९.२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे पत्र त्यांचे कार्यालयात त्याच दिवशी प्राप्त झाले. सदर पत्र त्यांचे कार्यालयामध्ये २९९७ या क्रमांकाने दि. ३०.९.२००६ रोजी नोंदवून घेतले आहे. अपिलार्थीस दि. ३०.९.२००६ रोजी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता या प्रकरणी असे दिसून येते की, सर्व साधारण परिस्थितीत अपिलार्थीने दि. ३.८.२००६ रोजी केलेल्या अर्जातील माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस दि. २.९.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे क्रमप्राप्त होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती

त्यांनी दि. ३०.९.२००६ रोजी पुरवून एकूण २८ दिवसांचा विलंब सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी लावलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी या विलंबाप्रित्यर्थ दिलेले समर्थन – ‘खरीप हंगाम चालू होता, त्याकरिता त्यांचे नियमित कामामध्ये या कालावधीमध्ये जादा भार पडल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविता आली नाही’- आयोग अमान्य करीत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अर्जावर करावयाची कार्यवाही हा सरकारी कर्मचाऱ्यांच्या नियमित कामाचा एक अविभाज्य भाग आहे, असे त्यांचे निदर्शनास पुनःश्चं आणून देण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात अर्जदारास माहिती देतांना नियमित कार्यभार वाढला, हे कारण कोणत्याही परिस्थितीत आयोगास समर्थनीय वाटत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहायक व इतर क्षेत्रिय कर्मचारी हे देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, असे अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस २८ दिवस इतक्या विलंबाने माहिती देण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सर्व सहायक हेही तितकेच जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल त्यांनी अनावधानाने केले आहे, असे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. १३.११.२००६ रोजीच्या पत्रात म्हटले आहे. तथापि सदर पत्राची फक्त झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली आहे. या पत्राच्या सत्यतेविषयी कोणताही पुरावा आयोगासमोर आज रोजी नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगास लिहिलेल्या दि. १३.११.२००६ चे पत्र आयोग विचारात घेत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक कर्मचारी यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविल्याचे सिध्द होत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की,कृषी आयुक्त, पुणे यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक/कर्मचारी यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल त्यानंतर

एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस आता दि. ३०.९.२००६ रोजी विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. कृषी आयुक्त, पुणे यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असलेले इतर अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल त्यानंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय कौतिक वानखेडे (डी.आय.ई.) ३३, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर, धुळे – ४२४ ००५.
२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नवापूर जि. नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, नवापूर जि. नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ आयुक्त (कृषि) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६६

निर्णय दिनांक ११-०४-२००८

१ श्री. प्रविण शंकरराव थोरात : अपिलार्थी
रा. पिंपळनेर (रामनगर) ता.साक्री, जि. धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रविण शंकरराव थोरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नंदुरबार श्री. राहुल चौधरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांचे प्रतिनिधी शिक्षण उपनिरीक्षक, श्री. लिंबाजी दौलतराव

सोनवणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुखदेव हरी डेरे  हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शाळा न्यायाधिकरण यांनी दि. १३.१.२००६ रोजी दिलेल्या निकालावर व त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १) शाळा न्यायाधिकरण- नाशिक यांनी दावा क्र. ३१/९९ चा दिलेला दि. १३/१/०६ च्या निकालानंतर आपण आदिवासी एज्युकेशन सोसायटी, करंजी बु ता. नवापूर जि. नंदूरबार या संस्थेवर व मुख्याध्यापक माध्य. विद्यालय करंजी बु ता. नवापूर जि. नंदूरबार यांच्यावर काय कार्यवाही केली ? केली असल्यास कोणती कार्यवाही केली? अथवा केली नसल्यास का केली नाही, त्याबाबतचा तपशिल लेखी स्वरुपात.

२) ‘शासन आदेश क्र. अमाशा/४१८२/२५१८०/क-दि.१२/७/८८ शिक्षण संचालनालय, पुणे-१ नुसार’ दि. १२/६/०६ रोजी मी पाठवलेल्या रजिस्टर पत्रानुसार आपण केलेली कार्यवाही लेखी स्वरुपात -  ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन शाळा न्यायाधिकरणाने त्यांचेकडील दावा क्र. ३१/९९ च्या संदर्भात दि. १३.१.२००६ रोजी दिलेल्या निकालावर काय कार्यवाही केली, याची माहिती अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या दि. १२.६.२००६ रोजीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत या पत्रामध्ये कोठलाही

उल्लेख केला नसल्याचे दिसून येते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मुद्यांपैकी फक्त एका मुद्यावर माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.८.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे म्हटले आहे. तसेच अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागिविली असता सदर माहिती त्यांनी साध्या पोस्टाने पाठविली असल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.९.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेले त्यांचे सुनावणीचे दि. १६.९.२००६ रोजीचे पत्र अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या तारखेनंतर प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे सुनावणीस उपस्थित होऊ शकले नाहीत व परिणामी या प्रकरणाची कोणतीही प्रथम सुनावणी होऊ शकली नाही. (दि. २६.९.२००६ रोजी ठेवलेल्या सुनावणीचे जन अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेले दि. १६.९.२००६ रोजीचे पत्र अपिलार्थीस दि. २८.९.२००६ रोजी व जन माहिती अधिकारी यांना दि. २७.९.२००६ रोजी प्राप्त झाले.)

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.११.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या द्वितीय अपिलावर अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे एकाच खात्यात व एकाच ठिकाणी काम

करत असल्यामुळे त्यांनी जाणुनबुजून, संगनमताने अपिलार्थीस उशिरा पत्र पाठविले व अपिलार्थीची सुनावणीची संधी नाकारली.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. १.७.२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांचेकडील दि. १५.७.२००६ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एका मुद्यावर माहिती पुरविली. अपिलार्थीस दि. १५.७.२००६ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस दि. १२.६.२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल समाविष्ट आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. १०.८.२००६ रोजीचा अर्ज त्यांचेकडे दि. १४.८.२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जावर त्यांनी दि. २६.९.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे दोघेही त्यांचे कार्यालयात उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीचे अपिल अर्जावर ते सुनावणी घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितली होती, यापैकी मुद्या क्र. १ मध्ये शाळा न्यायाधिकरण, नाशिक यांचेकडील दावा क्र. ३१/९९ च्या संदर्भात त्यांनी दिलेल्या दि. १३.१.२००६ रोजीचा निकाल व त्यावर, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व मुद्या क्र. २ द्वारे अपिलार्थीने त्यांचेकडील दि. १२.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जावरील

केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे कडील दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. वास्तविकत: जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भात माहिती पुरविणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेले दि. १५.७.२००६ चे पत्र हे अध्यक्ष, आदिवासी एज्यूकेशन सोसायटी, करंजी बु नवापूर यांनी उद्देशून लिहिले असून त्यांची प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्याची अशा प्रकारची त्यांची पध्दत चुकीची आहे याची जन माहिती अधिकारी यांनी येथे नोंद घेणे गरजेचे आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या दि. १२.६.२००६ रोजीच्या अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांचे वेतन सहकारी बँकेमार्फत अदा करण्यात यावे, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीच्या या विनंतीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांच्या दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रामध्ये कोणताही आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचा, जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा दावा नि:संशयपणे सिध्द होत आहे, असे आयोगाचे मत आहे.जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर केलेला युक्तीवादामध्ये अपिलार्थीच्या मागणीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात त्यांनी केलेला युक्तीवादाचा उल्लेख त्यांचे दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रामध्ये केली आहे, असे म्हटले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचा सदर युक्तीवाद त्यांचे दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता चुकीचा असल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १.७.२००६ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन करता त्यांनी मुद्दा क्र. १ मधील शेवटच्या भागामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे अर्जावर कार्यवाही केली नसल्यास, का केली नाही,

असा खुलासा मागितला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अशा प्रकारचे खुलासे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे या उपमुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खुलासा करण्याची आवश्यकता नाही.

वरील प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन त्यांनी येथे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, शिक्षण संचालक यांनी, जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन त्यानंतर पुढील एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळण्याचे दृष्टीने त्यांनी दि. १.७.२००६ च्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३.	जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणात दर्शविलेल्या त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल शिक्षण संचालक, म.रा.पुणे यांनी त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक	११-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. प्रविण शंकरराव थोरात रा. पिंपळनेर (रामनगर) ता.साक्री, जि. धुळे

२	जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य),जिल्हा परिषद, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	शिक्षण संचालक, म.रा. १७, आंबेडकरमार्ग, पुणे -१ या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४९

निर्णय दिनांक : १५.०४.२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल रहीम अ.हक (बाबू शेख)<br>शिवाजीनगर, शुक्ला डेअरी समोर,<br>जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तथा सहायक आयुक्त,<br>महानगर पालिका, जळगाव, जि. जळगाव | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.)<br>महानगर पालिका, जळगाव<br>जि. जळगाव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अब्दुल रहीम अब्दुल हक (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, जळगाव शहर महानगर पालिका जळगाव श्री. भालेराव बाबूराव फकिरा, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.)

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव श्री. साजीदखान अमानुल्लाखान पठाण ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व त्रयस्थ पक्ष श्री. निलेश सागर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १३.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. निलेश सागर उपआयुक्त, मनपा यांचेसंदर्भात एकूण ९ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) निलेश सागर, उपायुक्त, म.न.पा. जळगाव यांचे शिक्षण किती ? व कोणत्या गावाचे रहिवाशी आहेत.

२) निलेश सागर, उपायुक्त यांना मिळत असलेला दरमहा संपूर्ण वेतन किती ?

३) ते ज्या ठिकाणी राहतात त्या घराचे भाडे महानगर पालिकेकडून किती अदा केले जाते व तशी कायद्यात तरतुद आहे का ? असल्यास कोणत्या कलमान्वये.

४) ते वापरत असलेल्या चारचाकी वाहन कोणाच्या मालकीचे, त्या वाहनाचे भाडे महानगरपालिका किती अदा करते. त्या गाडीसाठी पेट्रोल, डिझेल मनपा मार्फत प्रतिमाह किती दिला जातो व तशी कायद्यात तरतुद आहे का? असल्यास कोणत्या कलमान्वये. नसल्यास कुणाच्या मंजुरीने दिले जाते.

५) त्या गाडीवर असलेला ड्रायव्हर मनपाचा आहे का ? नसल्यास त्या गाडीवर असलेल्या त्या ड्रायव्हरचा पगार व भत्ता महानगरपालिकेकडून प्रतिमाह किती अदा केला जातो. कोणत्या सक्षम अधिकाऱ्याच्या मंजूरीने अदा केला जातो व जो पगार दिला जातो, तो मनपा कोणत्या अधिनियमान्वये दिला जातो.

६) निलेश सागर, उपायुक्त मनपा, जळगाव यांच्या गाडीवर असलेला ड्रायव्हर मनपाचा कर्मचारी नसल्यास तो कामगार कायद्यान्वये कामगार न्यायालयात दावा दाखल केल्यास त्यास जबाबदार कोण ?

७) निलेश सागर,उपायुक्त यांना प्रवास खर्च, लॉजिंग भाडे, रेल्वे प्रवास श्रेणीचे मंजूर दर किती आहे व कोणत्या श्रेणीचे आहे व ते त्यापेक्षा जास्त श्रेणीचे दर घेत असल्यास त्यास मनपा अधिनियमान्वये किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीने दिले असल्यास ते कोणत्या कलमान्वये आहे ? जास्त खर्च मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा नाव व हुद्दा उल्लेख करावा.

८) निलेश सागर, उपायुक्त यांनी पगार व्यतिरिक्त इतर संपूर्ण खर्च रुजू झाल्यापासून आजपर्यंत एकत्रितरित्या किती आहे.

९) निलेश सागर, उपायुक्त यांच्या कामकाजाची वेळ कशा प्रकारची आहे. व ते गैरहजर असल्यास त्याचा पगार महानगरपालिकेकडून अदा केला जातो काय ?"

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. (सदर पत्र अपिलार्थीस दि. १९.५.२००६ रोजी प्राप्त झाले आहे.)

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.५.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.७.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २१.७.२००६ रोजींच्या निर्णयान्वये पारित केले आहेत. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेशित केले आहे की, "अर्जदार यांनी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता,अपिलार्थीस मूळ अर्जातील बहुतांश माहिती पुरविली आहे. तरी देण्यात आलेल्या माहिती संदर्भात

खालील पूरक माहिती देखिल देण्यात यावी. मुद्दा क्र. ७ बद्दल शासनाचे दस्तऐवज असलेला प्रवास खर्च व इतर भत्ते या संदर्भात शासन निर्णयाच्या प्रती अर्जदार यांना पुरविण्यात याव्यात." जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१०.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांचे कोणतेही आदेश त्यांना प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरवितांना माहितीचा अधिकारी अधिनियम २००२ चा संदर्भ दिला आहे. सदर कायदा रद्द झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर चुकीचे, खोडसाळपणाचे व दिशाभूल करणारे दिले आहे, खुद्द जन अपिलीय अधिकारी यांचे संदर्भात त्यांचा अर्ज असल्याने त्यांच्या अर्जाचा कोणताही विचार न करता जन अपिलीय अधिकारी यांनी जाणुनबुजून त्यांच्या अपिल अर्जावर कोणतेही उत्तर दिले नाही. असेही या अर्जामध्ये त्यांनी पुढे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेबाबत माहिती मागितली होती व ती माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली परंतु या संदर्भात मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले होते. स्वतःविषयीच्या माहिती संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः अपिल निर्णय देणे योग्य नाही, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या अपिल अर्जावर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांना कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत. अपिलार्थी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की. जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट, खोडसाळ व दिशाभूल करणारी अशी आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे ज्या ९ मुद्यांबाबत माहिती त्यांचेकडे मागितली होती, त्या सर्व ९ मुद्यांवर त्यांनी त्यांचेकडील दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन सर्व माहिती पुरविली असून ती चुकीची, दिशाभूल करणारी नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर घेतलेल्या दि. १०.७.२००६ रोजीच्या सुनावणीचे आदेश दि. २१.७.२००६ रोजी पारित केले असून, सदर आदेश त्यांनी अपिलार्थीस दि. २.९.२००६ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले. याबाबत जन अपिलीय अधिकारी यांना आदेश पारित केल्यानंतर सदर आदेश इतक्या उशिराने का पाठविले, असे विचारले असता त्यांनी सदर विलंब संबंधित बारनिशी लिपीक यांचे स्तरावर झाल्याचे आयोगास सांगितले.

त्रयस्थ पक्ष श्री. निलेश सागर (स्वतः जन अपिलीय अधिकारी) यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. २६.५.२००६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलाचे वेळी ते जळगाव महानगरपालिकेमध्ये उपआयुक्त (सा.प्र.) या पदावर कार्यरत होते. सदर अपिलाची सुनावणी त्यांनी दि. १०.७.२००६ रोजी घेऊन त्यांचे आदेश दि. २१.७.२००६ पारित केले. सदर आदेश त्यांनी यु.पी.सी.द्वारे अपिलार्थीस पाठविले आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांच्या संदर्भातील असून अर्जदारास त्यांनी संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस अद्यापही काही जादा माहिती हवी असेल, तर त्यांनी त्याची वेगळया अर्जाद्वारे मागणी करावी व त्यांनी मागणी केलेली माहिती, त्यांना देण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या ९ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती अपेक्षिली होती, त्या सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १३.४.२००६ रोजी प्रथम अर्ज केला असता, सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस सदर माहिती दि. १२.५.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अनुज्ञेय कालावधीपेक्षा पाच दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याचे दिसून येते, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्रामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ असा उल्लेख केला आहे. तथापि हा उल्लेख जन माहिती अधिकारी यांच्या नजरचुकीने केला असल्याचे आयोगास सुनावणीचे वेळी स्पष्ट केले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करतांना शासन निर्णय व परिपत्रकांच्या प्रती त्यांना मिळणे अपेक्षित असतांना सदर प्रती त्यांना मिळाल्या नसल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रवासखर्च व इतर भत्ते या संदर्भात शासन निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी देखील सूचित केले आहे. परंतु मूळात जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णयच अपिलार्थी यांना प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल केल्याचे दिसून येत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.५.२००६ रोजीच्या पत्रामध्ये माहिती देतांना ज्या शासन निर्णयाचा आधार घेतला आहे, अशा सर्व शासन निर्णयाच्या प्रती व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्यात याव्यात. अपिलार्थीचे म्हणणे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ असा उल्लेख केल्याने सदर माहिती दिशाभूल करणारी, चुकीची व

खोडसाळपणाची ठरत आहे, हे आयोगास मान्य नाही. सन २००२ हे शब्द नजरचुकीने टंकखित केले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज स्पष्ट केले. अशाप्रकारची चूक टंकलेखकाकडून कामाच्या घाईगर्दीत होणे म्हणजे अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुद्याम पुरविली असे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यास लावलेल्या ५ दिवसांच्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून यापुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये यापुढे त्यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांचे अपिल अंशतः मान्य.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेले शासन निर्णय, परिपत्रके व जन अपिलीय अधिकारी यांचे दि. २१.७.२००६ रोजीच्या आदेशाची प्रत इ. सर्व माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत, त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल रहीम अ.हक (बाबू शेख) शिवाजीनगर, शुक्ला डेअरी समोर,जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगर पालिका, जळगाव, जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) म.न.पा.जळगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. निलेश सागर तत्कालीन उपआयुक्त (सा.प्र.) जळगाव शहर महानगर पालिका, जळगाव यांना उपआयुक्त (सा.प्र.) म.न.पा.जळगाव जि. जळगाव यांचेमार्फत या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५१

निर्णय दिनांक : १५.०४.२००८

१ सौ. जयश्री सुधाकर कुलकर्णी, : अपीलार्थी
३९,गीता सदन, पन्नालालनगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. जयश्री सुधाकर कुलकर्णी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नामदेव जाधव, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २४.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या प्रवासभत्त्यासंदर्भात दि. १३.५.२००६ ते २४.४.२००७ माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"प्रवास भत्त्याबाबत संबंधित सर्व कागदपत्रे"

सदर माहिती अपिलार्थीने साध्या टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे माहिती दिली.

" आपला अर्ज दि. २४.४.२००७ चे उत्तरी आपणास कळविण्यात येते की, आपण मागितलेले प्रवासनिधीची माहिती १३ मे, २००६ ते २४ एप्रिल, २००७ या कालावधीत या कार्यालयास ३८०००/- संगायो चे बजेट प्रवासभत्याची निधी उपलब्ध झाला होता. सदरील निधीतून पंधरा कर्मचाऱ्यांचे प्रवासभत्याचे बिल निर्गमित करण्यात आले आहे. आपण दाखल केलेले प्रवासभत्याचे बिल एकूण ८४२४/- रुपयाचे असल्यामुळे निर्गमित करण्यात आलेले नाही. तसेच आपण दाखल केलेले प्रवासभत्याचे बिल तपासले असता आपण १८.५.२००५ ते २९.१२.२००५ चे बिल एक दम आठ महिन्याचे करुन दाखल केले आहे. सदरील बिल आपण तिन तिन महिन्याचे करुन दाखल केले असते, तर ते तेव्हाच निकाली काढण्यात आले असते. परंतु आपण आठ महिन्याचे एकच बिल पाठविल्यामुळे व त्याची रक्कम जास्तीची असल्यामुळे सदरील बिल निर्गमित करण्यात आले नाही. आता पुढील बजेट आल्यानंतर प्रथम प्राधान्य देवून आपले प्रवासभत्याचे काढण्यात येईल." –

सदर पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रवासभत्ता बीलाची तत्कालीन स्थिती स्पष्ट केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.या अपिलामध्ये त्यांनी त्यांचे म्हणणे विस्ताराने नमुद केले असून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करुन त्यांचे प्रलंबित प्रवासभत्त्याचे बील संबंधिताकडून मान्य करुन घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून काही खुलासे अपेक्षित करुन त्यांनी या प्रकरणी झालेल्या रु.२००/- इतक्या खर्चाची भरपाई करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीस पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.३.२००८ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी त्यांना हव्या असलेल्या माहिती संदर्भात खालीलप्रमाणे लिहिलेले आहे.

> "मी नायब तहसीलदार (संगायो) वैजापूर पदाचा माहे मे ते डिसेंबर.२००५ या ८ महिन्याच्या प्रवास देयक, प्रवास बीले १३.५.२००६ पत्र जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केले, आजपर्यंत प्रवासदेयके वाटप केले नाहीत. "

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज केला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून अरेरावीचे उत्तरे देण्यात आली. त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने टाळाटाळ केली आहे. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीमध्ये बजेट इ. ची माहिती, बजेटसंबंधीची कागदपत्रे व आयुक्तालयाकडून आलेले आदेश याची प्रत आवश्यक होती, तथापि ती माहिती जन माहिती

अधिकारी यांचेकडून उपलब्ध होऊ शकली नाही. दि. १३.५.२००६ रोजी त्यांनी प्रवासभत्ता बील जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (संगायो) यांचेकडे सादर केले. तथापि त्यांना सदर बील दि. १०.३.२००८ रोजी प्राप्त झाले.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. १३.५.२००६ रोजी त्यांचे प्रवासभत्ता बील (संगायो) वैजापूर यांचेकडे दाखल केले होते. तहसीलदाराकडून सदर बील दि. ११.६.२००६ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थी यांनी ज्या वेळी त्यांचे प्रवासभत्ता बील सादर केले त्या वेळी अपिलार्थीपेक्षा देखिल पूर्वीची प्रवासभत्ता बीले अनुदानाअभावी मंजूर करण्याची शिल्लक होती. अपिलार्थीने त्यांचेकडे सादर केलेली बीले कालबाहय झालेली असल्याने,जिल्हाधिकारी कार्यालयातून तपासणी करुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याने व आवश्यक त्या निधीची तरतुद उपलब्ध नसल्याने अपिलार्थी यांचे प्रवासभत्ता बील अदा करण्यास उशीर झाला. अपिलार्थीस त्यांच्या प्रवासभत्त्याची संपूर्ण रक्कम दि. १०.३.२००८ रोजी अदा करण्यात आली आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर सुनावणी का झाली नाही, असे त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीचा सदर अपिल अर्ज संबंधित तहसीलदार यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे कधीही सादर न केल्याने अपिलाची सुनावणी घेण्याचे राहून गेले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेला दि. २४.४.२००७ रोजीच्या अर्जामध्ये निश्चित कोणत्या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित होती, याचा अर्थबोध होत नाही. त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या विवरणामध्ये फक्त -"प्रवासदेयकाबाबत सर्व संबंधित कागदपत्र"- एवढाच उल्लेख केला आहे. त्यांना कोणाच्या प्रवासभत्ता बीलाच्या संदर्भात सदर माहिती हवी होती याचा त्यांनी या अर्जामध्ये उल्लेख केलेला नाही. त्यांना प्रथम अर्जाद्वारे

कोणती कागदपत्रे अपेक्षित होती, याचे स्पष्टीकरण त्यांच्या आज रोजी झालेल्या सुनावणीमधील युक्तीवादामध्ये वरीलप्रमाणे केले आहे. तथापि त्यांनी माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामध्ये अशाप्रकारचा कोणताही उल्लेख आढळून येत नाही. त्यांनी त्यांची मागणी थोडयाशा स्पष्ट स्वरुपात जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या दि. ११.६.२००७ रोजीच्या प्रथम अपिलात केल्याचे दिसून येते, अर्थात या अपिलामध्ये देखिल त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासे अपेक्षित केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल अर्जामध्ये आपले म्हणणे स्पष्ट स्वरुपात मांडल्याचे दिसून येते, तथापि या मध्ये देखिल अपिलार्थी यांनी त्यांची प्रवास देयकांची मान्यता देण्यासंदर्भात आयोगास विनंती केली आहे. थोडक्यात अपिलार्थीने त्यांची वैयक्तिक तक्रार माहिती अधिकारी अधिनियमातील तरतुदीचा आधार घेऊन आयोगासमोर मांडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अर्जात, आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट अशा स्वरुपाची माहिती मागितलेली नाही. सद्यस्थितीत त्यांनी दि. १३.५.२००६ रोजी सादर केलेली प्रवासभत्ता बीले आता मंजूर झाली असून सदर बीलाची पूर्ण रक्कम त्यांना दि. १०.३.२००८ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी आजच्या सुनावणीमध्ये त्यांना विलंबाने बीले प्राप्त झाल्याबद्दल त्यावर द.सा.द.शे.१० टक्के दराने व्याज मंजूर करावे, अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीचे प्रवासदेयक उशिराने मंजूर होण्यास कोणताही एखादा विभाग अथवा व्यक्ती जबाबदार आहे, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीचे प्रवास देयक उशिरा प्राप्त झाले हा सदर सार्वजनिक प्राधिकरणातील व्यवस्थेचा दोष असल्याचे दिसून येते. अपिलार्थींनी त्यांच्या प्रवासभत्त्याचे बील जर वेळीच संबंधितांकडे सादर केले असते तर, त्यांना कदाचित या बीलाचे वेळीच प्रदान होऊ शकले असते. त्यांनी एक गठ्ठा ८ महिन्याचे प्रवासभत्त्याची बीले जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केली. जिल्हाधिकारी कार्यालयाने अनुदान उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस आता देयकांचे प्रदान ते

अनुदानाअभावी एका आर्थिक वर्षात करु शकले नाही व परंतु दुसऱ्या आर्थिक वर्षात अपिलार्थीस सदर देयकांचे प्रदान केले आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या विषयाची मागणी त्यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे करुन सोईस्कर होईल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या तक्रारीचे निराकरण करणे, ही पूर्णतया प्रशासकीय स्वरुपाची बाब असून, या प्रशासन व्यवस्थेमध्ये आयोग आगंतुक हस्तक्षेप करु इच्छित नाही. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती हा माहितीचा विषय होऊ शकत नसल्याने अपिलार्थी यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल फेटाळून लावण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती जयश्री कुलकर्णी, ३९, गीता सदन, पन्नालालनगर,औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती